

# तुझा विसर न व्हावा

## [ श्री नित्यानंद-दर्शन ]

म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरी
सं. क्र. १०९३

मुकुंद परुळेकर, ॲडव्होकेट

REFBK-0011616

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रमांक 39370 ... वि: ...
क्रमांक 1093 ... नों: ...

# तुझा विसर न व्हावा

(श्री नित्यानंद-दर्शन)

REFBK-0011616
REFBK-0011616

लेखक
दिनकर मुकुंद परुळेकर
एलएल्. बी.
ॲडव्होकेट, हायकोर्ट, मुंबई

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 19696

मूल्य
३ रुपये

प्रकाशक :
**दिनकर मुकुंद पर्ळेकर**
ॲडव्होकेट
'लक्ष्मी'—६ वा रस्ता
मुंबई ७१

या पुस्तकाचें उत्पन्न सद्‌गुरु श्री नित्यानंद स्वामी महाराजांच्या पवित्र चरणीं अर्पण केलें आहे—लेखक

मुद्रक :
**वि. पु. भागवत**
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाव वाडी, गिरगांव
मुंबई ४

37390 ... वर्ग
9093 ... नोंः दिः 23/9...

# माझें चित्त तुझे पायीं

आत्मदर्शनानेंच मानव सुखी व्हावयाचा आहे अशा आशयाची शिकवणूक देऊन 'जगाच्या कल्याणा' अहोरात्र तळमळणाऱ्या अवतारी पुरुषाचा—सद्गुरु श्री नित्यानंदस्वामींचा—महिमा मीं काय वर्णावा ? स्तुति सांडून निवांतपणें सद्गुरूंच्या पायीं डोकें ठेवणें यांतच त्यांचा महिमा यथार्थतेनें गाईल्यासारखें होणार आहे. 'धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे' अशी भगवंतांनींच ग्वाही देऊन ठेविली आहे. सर्व धर्मांचें सार आत्मदर्शनांतूनच समजून येणार आहे आणि आत्मसाक्षात्काराच्या प्रकाशांतच मानवाचीं मानीव दुःखें लोप पावणार आहेत अशा आशयाची विश्वधर्मीय शिकवणूक देणाऱ्या विश्वधर्मीय जगद्गुरु श्री नित्यानंदस्वामी महाराज यांच्या चरणीं हें सेवेचें अल्पस्वल्प दुर्वादळ मी अर्पण करीत आहें. ज्ञानेश्वर महाराजांच्या शब्दांत, अहंकाराचा धूप जाळून नाहंभावानें मी श्री बाबांना या मंगल प्रसंगीं ओवाळतों आणि समरस भावानें श्री बाबांचे मृदुचरण निरंतर आलिंगितों.

२४-३-६१
दुर्गाष्टमी
मुंबई

दिनकर मुकुंद परुळेकर

## आभार

पुस्तकांत छापलेलीं दुर्मिळ छायाचित्रें उपलब्ध करून दिल्याबद्दल श्री नित्यानंदप्रेमी श्री. करुणाकर शेट्टी यांचे आभार.

—लेखक

# पुरस्कार

आत्मज्ञानानें जीवनाची परिणति गांठून केवळ 'उरलों उपकारापुरता,' या न्यायानें धकाधकीच्या जीवनांत मानवजातीला सुख आणि समाधानाचा प्रत्यय आणून देण्यासाठीं जे महापुरुष यदृच्छेनें अवतरत असतात अशा एका महापुरुषाचें चरित्र प्रसिद्ध होत आहे ही एक आनंदाची घटना होय. कलियुगांत सर्व-धर्मीय जड जीवांचा उद्धार करण्यासाठीं आलेला एक अवतारी पुरुष असे जे श्री नित्यानंदस्वामी त्यांच्या दर्शनासाठीं श्री क्षेत्र गणेशपुरी येथील श्री क्षेत्राकडे भारतांतील आणि भारताबाहेरीलहि लाखों जीवांचे पाय वळत आहेत. दूरदूरच्या खेड्यापाड्यांतून दिंड्यांची आणि पालख्यांची गर्दी लोटत आहे. या क्षेत्राबाहेरील समाजमनाची पकड दिवसेंदिवस घट्ट होत चालल्याचें पाहून साहजिकच तिऱ्हाईताला वाटतें कीं येथें असें काय आहे कीं जेणेंकरून हें सर्वांचेंच श्रद्धास्थान होऊन राहावें ?

रखरखीत वाळवंटांत फिरणारें मानवी मन ज्या सावलीच्या शोधांत आहे ती सावली या ठिकाणीं गवसली आहे. भक्तिप्रेमानें आर्द्र झालेल्या भक्तांच्या अंतःकरणाला सुखाचा व समाधानाचा प्रत्यय आणून देणारी माऊली प्रेमाचा पान्हा सोडून राहिली आहे. श्रीभगवान् नित्यानंदस्वामींच्या मनांत, वाणींत, फार काय सर्व क्रियांतून, जी सुखासमाधानाची कृपाप्रसाद करणारी पवित्र विद्युत् खेळत आहे तिचा स्पर्श घडावा आणि 'याचि देहीं याचि डोळां' या न्यायानें या जन्मांत स्वतःचा उद्धार करून घ्यावा यासाठींच दररोज या क्षेत्राकडे लाखों भक्तगणांचे पाय वळत आहेत.

'तुझा विसर न व्हावा' या प्रस्तुत ग्रंथांत ॲडव्होकेट दि. मु. परुळेकर यांनीं श्री बाबांच्या सहवासांत राहून परिश्रमपूर्वक मिळवलेली माहिती देत

असतांना श्री बाबांना मंजूर असलेल्या तत्त्वज्ञानाची जी चर्चा केली आहे ती वाचीत असतांना वाचकांशीं जणुं बाबाच बोलत आहेत असा भास होतो. स्मृतिमंजूषा हें प्रकरण तर या दृष्टीनें विशेष उल्लेखनीय आहे. श्रीमुखांतून बाहेर पडलेले महामंत्रच जणुं 'संसारी जीवांसाठीं बाबांचा संदेश' या प्रकरणांत श्री बाबा संसारी जीवाला करीत असलेला जो उपदेश आलेला आहे तो प्रत्येकानें मनन करण्याजोगाच आहे. सद्गुरूच्या सान्निध्यांत साधक ज्या कृपाप्रसादाची अपेक्षा राखून असतो, तो कृपाप्रसाद म्हणजेच शक्तिपातरहस्य. हें प्रकरण चांगलें उतरलें आहे. 'श्री बाबा आणि चमत्कार' या प्रकरणांत श्रीबाबांची लीला ठायींठायीं दृष्टोत्पत्तीस येते. परिशिष्टांत गुरुभक्ति, नामावलि, पद्यें व आरती हीं आलीं आहेत. कुठलेंहि प्रकरण उघडा, भक्तिप्रेमानें तें भरलेलें आहे. चंद्रापासून अमृतच स्रवतें, त्याप्रमाणें परमानंदरूप झालेल्या महात्म्याच्या सान्निध्यांत नित्यानंदच स्रवतो, अशी गोड अनुभूति या ग्रंथाच्या निकट सहवासानें येण्यासारखी आहे. आणि म्हणूनच प्रत्येक भक्तानें हा ग्रंथ आपल्या संग्रहीं ठेवून, त्याचें मनन करून, नित्यानंद प्राप्त करून घ्यावा. श्री गुरुदेवाचें ध्यान, स्मरण, चिंतन, संकीर्तन करतां करतां गुरुदेवाच्या उपदेशानेंच आपापलें चित्त रंगविण्यांत साधकाचें खरें हित आहे. अशा प्रसंगीं गुरुदेव साधकाच्या सन्निधच असणार आणि साधक अशा रीतीनें उगमाजवळ नित्यानंदांत लीन होणार, एवढेंच जातां जातां म्हणावेसें वाटतें.

गांवदेवी<br>गणेश पुरी<br>दुर्गाष्टमी. २४-३-१९६१

श्री मुक्तानंद स्वामी

# Introduction.

I feel flattered by Shri Parulekar's request to write an introduction to this remarkable book. Shri Parulekar has depicted in short the life, philosophy and message of the greatest of living Saints Jagadguru Swami Nityanand. Swami Nityanand as knowledgeable persons know, is verily an Incarnation of the Great God Shiva--the fountain head of Yoga. There is one common desire dominating the hearts of all living creatures—a desire to be happy. All activity, whether of men or of beasts and birds is directed to this one end–viz., to be happy. But happiness is the one thing that eludes everybody. After a long struggle you feel you have caught it ; but that very moment it escapes your grasp, and leaves you miserable and unhappy. We do not realize that we ourselves are the cause of our unhappiness. It is the ceaseless activity of the mind that breeds all our unhappiness. The only effective way to get happiness is to stop the mischievous working of the mind—to make it still and steady—(तटस्थ) as Swami Nityanand describes it. But this task of making the mind still is indeed stupendous. It can only be achieved by Yoga—the science of happiness. Swami Nityanand is a past-master in the Science of Kundalini Yoga. He possesses the rare power, by his mere look of arousing your Kundalini and of initiating you to Yoga. By the silent work which he has been doing for years the Great Swami has initiated hundreds of his devotees to Kundalini Yoga and has helped them on the path to real happiness. It is the life, the teachings and the mission of this great Sage of Ganeshpuri, that is the subject of this book. Shri Parulekar is pre-eminently fitted for the task which he has undertaken. He

is a rare specimen of humanity—full of devotion to God and love for his creatures. The words which he has written have flown from his heart. The thoughts he has expressed, have descended to him from a High Plane unknown to the human mind. There is not the least doubt that this rare book will enlighten many minds and will benefit many souls, struggling on the path of emancipation.

Glory to the Great Sage of Ganeshpuri—
Jagadguru Swami Nityanand ! !

Ganesh Prasad,
Sleater Road,
BOMBAY-7.
DURGASHTAMI, 24-3-61.

R. B. KOTWAL,
B.A., LL. B.
Advocate, High Court.

# ‘परिचय’

माझे प्रिय मित्र श्रीयुत परुळेकर यांनीं श्री सद्‌गुरु नित्यानंद पुण्यस्मरणार्थ लिहिलेल्या या छोटयाशा पुस्तकाचा पुरस्कार करण्याचें काम मजवर सोंपविलें आहे. त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

नित्याच्या नीरस जीवनांतून मानवाला अतिरंजित, अतींद्रय सुख-सागर वगैरे शब्दांनीं वर्णिलेल्या सृष्टींत आपल्याबरोबर घेऊन जाण्याची परमात्मशक्ति ज्या श्रेष्ठ पुरुषाच्या ठिकाणीं असते त्यासच ‘महात्मा’ ही संज्ञा प्राप्त होते. ‘नर करणी करे सो नरका नारायण बन जाता है’ ह्या वचनांत ग्रथित केलेलें आश्वासन केवळ सत्यावर आधारित आहे हें आपल्या लक्षांत येत नाहीं. महापुरुषांचा अनुभव प्रमाण धरून वर उद्धृत केलेलें हें वचन मानवाच्या शरीर, मन व बुद्धीच्या मागें जी अमर, अखंड चैतन्यमय अशी दिव्यशक्ति आहे तिचें निदर्शक आहे. त्या शक्तीचा अनुभव महापुरुषाच्या सान्निध्यांतच अतिसुलभतेनें आपणांस येतो व म्हणूनच अशा महापुरुषांच्या सहवासासाठीं विवेकी सज्जन धडपडत असतात. आधिभौतिक शास्त्रांना ज्याप्रमाणें प्रयोग-शाळेंत सापडलेल्या सिद्धांताचा आधार असतो, त्याप्रमाणेंच आध्यात्मिक प्रांतांतल्या अनुभवांना महापुरुषांच्या ठायीं सतत वसत असलेला दिव्य साक्षात्कारच प्रमाण असतो. स्वतःला झालेला हा दिव्य साक्षात्कार क्षणमात्रांत दुसऱ्या लायक माणसाला देतां येणें ही शक्ति फक्त श्रेष्ठ महात्म्यांच्याच ठिकाणीं असते. ‘आपणासारखे करिती तात्काळ नाहीं काळवेळ तयालागीं’ असे महात्मे विरळे व त्यांना शोधीत जाणारे सज्जन आणि पुण्यपुरुष पण विरळे.

केवळ एखाद्या विशिष्ट भूमीचें, प्रांताचें, आजूबाजूला राहणाऱ्या लोकांचें भाग्यच म्हणून उच्च पर्वतांतील गुहेंत तपश्चर्या करणारा एखादा महात्मा

अशा ठिकाणीं अवतीर्ण होतो व ती भूमि आपलें निवासस्थान करून राहतो व त्या भूमीला निव्वळ तीर्थाचें स्वरूप प्राप्त करून देतो. आपल्या बेंबींत कस्तुरी असतांना ज्याप्रमाणें कस्तुरीमृग ती न जाणून तिच्या शोधार्थ वणवण फिरत असतो व स्वतःची खरी स्थिति न कळून कस्तुरीच्या अस्तित्वाबद्दल साशंक होतो, अगदीं त्याचप्रमाणें आध्यात्मिक सत्यशोधार्थ वणवण फिरणाऱ्या सज्जनांची स्थिति असते. 'तुझें आहे तुजपाशीं परि तूं जागा चुकलासी' किंवा 'आहे नारायण जवळीच' अशा उक्तींतून ध्वनित केलेल्या वर्णनाप्रमाणें—सज्जन केवळ आपल्याच ठिकाणीं असलेल्या सत्याच्या शोधार्थ वणवण फिरतात. इतकेंच नव्हे तर जवळपास वसत असलेल्या व क्षणांत त्या सत्याचा अनुभव देणाऱ्या महापुरुषाविषयीं माहिती मिळूनसुद्धां त्याच्या शक्तीविषयीं साशंक वृत्तींत राहतात व जन्ममृत्यूच्या फेऱ्यांतून सोडवून आनन्दमय अशा स्थितींत विनासायास घेऊन जाणाऱ्या महान् भाग्यास मुकतात. अशी कांहींशी स्थिति आम्हां मुंबईकरांची झाली आहे.

मुंबईपासून अगदीं थोड्या मैलांवर प्रसिद्ध वज्रेश्वरी मातेचें मंदिर असून तेथून पलीकडे जवळजवळ एक मैलावर 'गणेशपुरी' या नांवाचें खेडेवजा एक टुमदार गांव आहे. त्या गांवांत 'कैलास' ह्या नांवानें ओळखला जाणारा पूज्य नित्यानंद स्वामींचा आश्रम आहे. साऊथ कॅनरा येथील 'काननगड' या गांवांतून ८००–८५० मैल प्रवास पायीं करून आज जवळजवळ २८ वर्षांपासून हा महात्मा गणेशपुरींत वस्ती करून राहिला आहे.

विठ्ठलासारखी काळीसांवळी पण भव्य अशी स्वामींची मूर्ति आहे. ते नेहमींच स्वस्वरूपांत निमग्न असतात, व म्हणून फारच कमी बोलतात. सभोंवतालीं शेंकडों माणसें दर्शनोत्सुक स्थितींत विनम्र भावानें उभीं असलेलीं दिसतात. स्वामी क्वचितच आपले नेत्र पूर्ण उघडून एखाद्या महाभागाकडे पहातात. परंतु त्या क्षणींच महासागराची एखादी

तुफान लाट किनाऱ्याचा भेद करून आंत घुसावी किंवा एखाद्या दिव्य प्रकाशाची ज्योत अंधारांत शिरावी त्याप्रमाणें ब्रह्मानन्दाची दिव्य उर्मी एकाएकीं अशा महाभागाच्या हृदयांत व जगाच्या आदि-अन्तामागें सतत उभा असलेल्या आदिपुरुषाचें त्यास दर्शन घडविते. त्या क्षणींच त्या भाग्यवान पुरुषास, "जनम्‌जनम्‌की आग बुझी है बुझी है कर्म की धार। जनम् मरण की बेडी फुटी है। तुटी है द्वंद की तार॥" असा क्षणार्धांत अनुभव येतो.

श्रीयुत परुळेकर यांचें हें पुस्तक आपणांस असा दिव्य अनुभव देणाऱ्या चरणापाशीं खेचून नेईल व व चिरंतन सुखाचा मार्ग दाखवील अशी खात्री बाळगून हा पुरस्कार पुरा करतों.

आपला नम्र

**केशव कृष्ण प्रधान**

बी. ए., एल्‌एल्. बी.

ॲडव्होकेट

राजाराम भवन
शिवाजीपार्क रोड ५
माहीम, मुंबई १६
दुर्गाष्टमी, २४-३-६१


३९३१६
१०९३

# अनुक्रमणिका

१. ती अपूर्व भेट
२. देव मागायला कोण आलाय् का?
३. कलियुगांत अवतरलेला देव
४. परमश्रेष्ठ अवधूतच
५. संसारी जीवांसाठीं बाबांचा संदेश
६. गुरुदेवांचें अमर तत्त्वज्ञान
७. स्मृति-मंजूषा
८. कृपाप्रसाद
९. श्रीबाबा आणि चमत्कार
१०. भक्तिगीतें
११. परिशिष्टें
१२. आरती
१३. श्री. नित्यानंद नामावलि



गुरुः साक्षात् परब्रह्म
तस्मै श्री गुरवे नमः ।




श्री कैलास निवास

राहिला नाहीं. दुःखी अंतःकरणानें ते श्री बाबांकडे आले. गणेशपुरीला एक अन्नसत्र घालावें अशी भावना त्यांच्या मनांत बळावली. त्यांनीं एक गोण तांदूळ व इतरहि वस्तू आणविल्या. सर्व बाबांना सांगूनच. जेवण तयार होत असतां श्री बाबा धांवत धांवत आले आणि म्हणाले कीं पांच इसमांचें आणखी जेवण तयार करा. या भक्तांना त्याचा अर्थबोध ताबडतोब होणें अर्थातच शक्य नव्हतें. श्री बाबांची तशी आज्ञा असल्याचें पाहून त्यांनीं पांच इसमांचा आहार तयार करून ठेवला. ठरल्यावेळीं श्री बाबांनीं पांच इसमांसाठीं तयार ठेवलेल्या पत्रावळी आपल्या हातांनीं उचलून नेऊन वैकुंठ आश्रमाबाहेर कुंडाजवळील एका झाडाजवळ नेऊन ठेवल्या. सर्व लोक श्री बाबा काय करीत आहेत हें आश्चर्यानें पाहूं लागले. श्री बाबांनीं पांच पत्रावळी ठेवल्या असतील नसतील तोंच पांच कावळे आले. प्रत्येक कावळ्यानें आपापल्या पत्रावळीवरील ठेवलेला खाद्यपदार्थ पूर्ण खाईपर्यंत श्री बाबा जवळच उभे राहून पाहात होते. सर्वांनाच आश्चर्य वाटण्यासारखी घटना. नेमक्या पांचच पत्रावळी आणि नेमके पांचच कावळे. कावळे उडून गेल्यावर श्री बाबांनीं मान फिरविली आणि समोर उभ्या असलेल्या त्या भक्ताकडे पाहून म्हणाले कीं ‘ तुझा संकल्प पुरा झाला....जा तूं आतां....’ सदरहू इसम दुसरे दिवशीं मुंबईस परतला. ज्या दिवशीं तो मुंबईस परतला त्या दिवशीं त्याला सडकून ताप भरला. जसजसा त्याचा ताप वाढूं लागला तसतशी त्याच्या डोळ्याची दूख वाढूं लागली. हा काय नवीन प्रकार आहे म्हणून ही बाबांची कांहीं तरी लीला असेल अशी दृढभावना बाळगून त्यानें डॉक्टरांना फोन केला. डॉक्टरांना त्याच्या डोळ्याची परिस्थिति ठाऊक असल्यामुळें ‘डोळ्याची तुम्ही आशा धरूं नका. ताप अन्य कारणामुळें असेल. ताप उतरल्यावर डोळे दाखवावयाचीच इच्छा आहे तेव्हां सवडीनें या,’ असा डॉक्टरानें जबाब दिला. या भक्ताचा ताप एकदोन दिवसांतच उतरला. परंतु

डोळ्यांत वेदना होऊं लागल्या. तो डॉक्टरांकडे गेला. डॉक्टर आज पाहूं लागले आणि आश्चर्यानें विचारूं लागले, 'अरे हा काय चमत्कार! मोतीबिंदु पिकूं लागला आहे. आतां जर ऑपरेशन केलें तर तुला दृष्टि येईल—' आणि खरोखरीच पुढें ऑपरेशन झालें आणि त्या भक्ताला दृष्टि आली. श्री बाबांची लीला अगम्य हेंच खरें.

३ × × × विद्यमान व्यापारी आपल्या मुलीसमवेत श्री क्षेत्र गणेशपुरीस आले. श्री बाबा जुन्या धर्मशाळेंत आपल्या नेहमींच्या जागीं बसले होते. या मुलीनें व त्या मुलीच्या बापानें श्री बाबांना नमस्कार केला. 'आज राहा' अशी आज्ञा होतांच धर्मशाळेंतील शेवटच्या खोलींत त्यांनीं मुक्काम केला. दुपारची वेळ संपली असेल नसेल तोंच मुलीला शौचाची भावना होऊं लागली. त्या अगोदर तिला आंव पडतच होती. श्री बाबांच्या आश्रमांतून समोरील डोंगराच्या पायथ्याशीं असलेल्या गर्द झाडींत शौचाला जाण्याचा रिवाज होता. कारण आजच्यासारखी तेव्हां सोय नव्हती. शौचाला जाण्यासाठीं ती मुलगी उठली तोंच श्री बाबा एकदम गरजले 'कुठें चाललीस?....एकटी जाऊं नकोस.' श्री बाबांनीं हातांत काठी घेतली व तिच्याबरोबर निघाले. त्या मुलीला याचा कांहीं बोध होईना. गर्द झाडीजवळ पोहोंचतांच समोर पाहिलें तर एका मोठ्या दगडाजवळ सापांची जाळी पसरलेली. त्या दगडाजळच आसपास लोक शौचाला बसत. श्री बाबांनीं आपल्या काठीनें 'निघून जा इथून' असा गरजून इषारा करतांच साप कुणालाहि त्रास न देतां निघून गेले. 'जा आतां' असें मुलीला सांगून श्री बाबा आश्रमांत परतले. 'मागें पुढें उभा सांभाळीशी', ही नामदेवोक्ति बाबांच्या बाबतींत प्रत्ययास येत नाहीं काय?

४ × × × मुंबईंतील एक प्रसिद्ध डॉक्टर. श्री बाबांचे जुने भक्त. त्यांच्या जवळच्या नातेवाईकांचा शाळेंत जाणारा छोटा मुलगा एकाएकीं हरवला. सर्व ठिकाणीं शोधाशोध सुरू झाली. कुठें कुठें म्हणून



खुशालनगर (पृष्ठ ८)



पापनाशिनी गंगा (पृष्ठ ११)

पत्ता लागेना. शेवटीं हे डॉक्टर व नातेवाईक मंडळी श्री बाबांकडे आली. सकाळी शाळेंत गेलेला मुलगा एकाएकीं नाहींसा व्हावा, मुंबईंत सर्वत्र शोधाशोध करूनहि सांपडूं नये यामुळें त्या मुलाचे आई-वडील चिंताग्रस्त होऊन श्री बाबांकडे आले व दुःख कथन करूं लागले. 'चिंता नको. पाठल्या धर्मशाळेंत पहा—' असें श्री बाबा म्हणाले. ही मंडळी धांवत धांवत कुंडाला लागून असलेल्या धर्मशाळेंत गेली. पाहातात तर काय, एका खोलींत एका गोणपटावर हा मुलगा शांत झोंपला आहे. त्याच्या आईनें जाऊन प्रेमभरानें त्याला उठवून पोटा-सरशीं धरलें आणि 'तूं इकडे कसा आलास' म्हणून चौकशी केली. त्या मुलानें सांगितलेली कथा तर बुद्धिवाद्यांना थक्क करून टाकण्या-सारखीच आहे. तो मुलगा सांगूं लागला कीं, शाळेंतून बाहेर पडल्यावर कोणी एक मवाल्यासारखा वेष असलेला इसम मला भेटला. त्यानें मला उचललें व एका गाडींत बसविलें. मी रडूं लागलों. ती गाडी ठाण्याच्या पुढें जाऊं लागल्याचें पाहून मी मोठ्यानें रडूं लागलों व श्री बाबांच्या नांवानें हांका मारूं लागलों. मला धरून ठेवलेल्या दोन इसमांपैकीं एक म्हणूं लागला कीं, अरे याला नको नेऊं या आपल्या बरोबर. अंबाडीजवळ गाडी येऊन पोहोंचली तेव्हां हा इसम म्हणूं लागला कीं या मुलाला पुढें न नेतां आपण गणेशपुरीला नेऊन सोडूं या. आश्चर्य असें कीं, त्या इसमांनीं त्या मुलाला गणेशपुरीला आणून सोडलें आणि आपण पोबारा केला. या मुलानें गणेशपुरी पाहिलेली नव्हती. तेव्हां हा सर्व नवीनच प्रकार पाहून तो ओक्साबोक्षीं रडूं लागला. गणेशपुरींतील कांहीं भक्तांनीं त्याची विचारपूस केली. कुणी तरी त्याला जेऊं घातलें आणि थकवा आल्याचें पाहून त्याची आश्रमांत झोंपण्याची व्यवस्था केली. श्री बाबांच्या कानांवर ही बातमी गेली. 'ठीक' एवढेंच बाबा म्हणाले. त्यानंतर त्या मुलाची कुटुंबीय मंडळी आल्यानंतरचा इतिहास वर दिलाच आहे. श्री बाबांचें उच्चारलेलें नांव त्या दुष्ट बुद्धीनें

प्रेरित झालेल्या इसमांच्या मनांत परिवर्तन घडवून आणण्यास कसें कारणीभूत झालें हें सहज दिसून येण्याजोगें नाहीं का?

५ प्रसिद्ध वकील मंडळी–त्यामध्यें एक माजी हायकोर्ट जज्ज–या मंडळींपैकीं एका तरुण वकिलानें श्री बाबांना विचारलें कीं, 'समिट परिषद किंवा शिखर परिषद शेवटीं अयशस्वीच झाली. रशियाचे पंतप्रधान श्री क्रुशेव्ह यांनीं तर त्यावेळच्या अमेरिकन अध्यक्षांशीं, श्री आयसेनहॉवर यांच्याशीं, हस्तांदोलन करावयाचेंहि नाकारलें? अशानें जागतिक शांति कशी प्रस्थापित व्हावयाची? या सर्व अशांततेच्या परिस्थितींत शीतयुद्धाची संरक्षणाच्या नांवाखालीं जोपासना चालू आहे. जिथें सर्व जगच पेटलें आहे तिथें हिंदुस्थानचें पंचशीलेचें तत्त्वज्ञान कोण ऐकणार?' विचारलेला प्रश्न वस्तुतः राजकीय स्वरूपाचा होता आणि म्हणूनच कीं काय तेथील वकील मंडळींतील कांहींना तो सुरुवातीला रुचलाहि नसावा. श्री बाबा हंसत हंसत म्हणूं लागले 'हां हां पॅरिस कॉन्फरन्स....पॅरिस् कॉन्फरन्स्....' असे उद्‌गार काढून आश्चर्य हें कीं यू-टू विमानाची पाडल्यापासूनची इत्थंभूत हकिकत त्यांनीं सांगून म्हटलें कीं भारताचें तत्त्वज्ञान अशांततेच्या वातावरणांत सांपडलेल्या जागतिक नौकेला आशेचा किरण होऊन राहिलें आहे. भारताला उर्जितावस्था यावयास आणखी वीस वर्षांचा काळ हवा. श्रीबाबांना कधींहि वर्तमानपत्र वाचतांना कुणीहि पाहिलेलें नाहीं. आपली जागा सोडून ते कधीं बाहेर गेल्याचेंहि कुणीहि पाहिलें नाहीं. असें असूनहि पृथ्वीच्या पाठीवरील सर्व घडामोडींची समग्र माहिती त्यांच्या संग्रहीं असल्याचें पाहून माजी न्यायाधीश बाहेर आल्यावर म्हणाले, 'राजकीय प्रश्न विचारलेला पाहून सुरुवातीला मला जरी आनंद झाला नाहीं तरी श्रीबाबांना जागतिक परिस्थितीची अद्यावत माहिती असल्याचें पाहून हा अंतर्ज्ञानी अवधूत असल्याची प्रचीति आली.

अनुक्रमांक ........... वि: ................
ग्रंथांक ........... नों: दि: ................

६ प्रसिद्ध वकीलमंडळी—उन्हाळ्याच्या सुट्टींत एकत्र बसली असतांना 'सरकार करीत असलेले कायदे' या विषयावर बोलतां बोलतां श्री बाबा एकदम म्हणाले 'शरीरावर बंधन, मनावर बंधन, सर्वच बंधनें—' फाजील सवलती नकोत पण गैरवाजवी बंधनेंहि नकोत. हें मनुष्यस्वभावाच्या विरुद्ध होय. श्री राजाजींच विचार या दृष्टीनें व्यवहार्य आहेत. प्रचलित कायदे, कायद्यांची वारेमाप निर्मिति, राजाजींचे विचार ही सर्व माहिती श्री बाबा सहजगत्या सांगत असलेले पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटलें.

७ × × × वकील, मु. मुंबई. श्री बाबांनीं गणेशचतुर्दशीच्या दिवशीं कैलासांत वास्तव्य करणाऱ्या भक्तगणांना रात्रौ ११ च्या सुमारास मोदक, पेढे, बर्फी आदि वस्तूंनीं भरलेला प्रसाद दिला. हे भक्त डोळे चोळत चोळत पुढें ठेवलेला सर्व प्रसाद पोटांत मावण्यासारखा नाहीं असें पाहून कुणाच्या लक्षांत येणार नाहीं अशा बेतानें तो प्रसाद कागदांत गुंडाळून कैलासच्या वरच्या मजल्यावरील हॉलमध्यें झोंपाव-यास गेले. या गृहस्थांना वाटलें कीं आपण सर्व प्रसाद खाल्ला असेंच सर्वांना (श्री बाबांना सुद्धां) वाटलें आहे. दिलेला प्रसाद शिल्लक न ठेवण्याची प्रथा तर या भक्ताला मोडायची नव्हती परंतु त्याचबरोबर पोट बिघडेल या भीतीनें सर्वच प्रसाद खायची इच्छा नव्हती. या भक्तानें व्यावहारिक तोड काढून हॉलमध्यें स्वतःशींच हंसत हंसत प्रवेश केला. त्या हॉलला लागून असलेल्या खिडकीजवळ एक घड्याळ खालीं ठेवलेलें असून त्या ठिकाणींच त्या भक्तानें आपली बॅग ठेवली होती. त्या बॅगवर प्रसादाची केलेली पुडी त्यानें ठेवली. दिवा मालवून तो भक्त झोंपण्यासाठीं लवंडला तोंच धपकन् कुणीतरी पडल्याचा आवाज झाला. तो भक्त उठून पाहूं लागला तर त्या बॅगजवळ लुक-लुकणारे जनावराचे डोळे दिसूं लागले. डोळे विस्फारून तो पाहूं लागला तर वाघाचें एक पिल्लूं हॉलमध्यें आलेलें. हें जनावर आ करून

इथें आल्याचें पाहून व जवळ कुणी नसल्याचें पाहून या भक्तानें एकदम आरोळी ठोकली. क्षणार्धांत तें जनावर नाहींसें झालें. काय झालें म्हणून पाहण्यासाठीं भक्त मंडळी वर आली तर हा भक्त घामाघूम झालेला. दिलेला प्रसाद न खातां सर्वांची (बाबांचीहि) नजर चुकवून त्यानें तो वर आणला होता. अंतर्यामीं चाललेली हालचालसुद्धां ज्याला समजूं शकते अशा श्री बाबांनींच तें वाघाच्या पिल्लाचें रूप घेऊन त्याला प्रचीति आणून दिली हें त्या भक्ताला तात्काळ उमगलें.

८ × × × जमीनदार, मु. गणेशपुरी–कांहीं वर्षांपूर्वीं जेव्हां श्री बाबा वैकुंठास आश्रमांत राहात होते तेव्हां एका भक्तानें मुंबईहून गोरगरिबांना अन्नदानासाठीं धान्य पाठविलें होतें. ज्या ट्रकमधून धान्य आलें तो मोटार ड्रायव्हर उद्धटपणानें हातांतील विडी शिलगावीत शिलगावीत आश्रमांत कुठल्याच प्रकारचें अंतर न बाळगतां 'इकडे स्वामी कोण आहे ? सामान लवकर उतरून घ्या. मला अडीच वाजतां मुंबईला पोंचावयास हवें. चला लवकर लवकर उतरून घ्या तुमचें सामान' अशा बेपर्वाईच्या भाषेंत बडबडूं लागला. श्री बाबा समोरच बसले होते. श्री बाबा शांत होते. ते इतर भक्तांना म्हणाले, कीं 'जा, सामान उतरून घ्या....त्याला अडीच वाजेपर्यंत पोंचावयाचें आहे.' भक्तांनीं बाबांच्या आज्ञेप्रमाणें सामान उतरीपर्यंत अगोदरच उशीरां आलेली गाडी अडीच वाजेपर्यंत मुक्कामीं कशी पोंचेल अशी तो उद्धट मोटार ड्रायव्हर शिव्या हांसडीत हांसडीत बडबड करीत होता. सर्व सामान उतरवून घेतलें. मोटार सुरू झाली. २॥ वाजेपर्यंत ती मोटार गणेशरीपुची वेस ओलांडत होती तोंच त्या मोटारीनें पेट घेतला. तो ड्रायव्हर घाबरला. मोटारनें घेतलेला पेट विझविण्याचें जवळ कांहींच साधन नव्हतें. २॥ वाजेपर्यंत त्या मोटारीची राख झाली होती. श्री बाबांशीं आपण उद्धटपणें वागलों याबद्दल परमेश्वरानें आपल्याला ही शिक्षा दिली असावी अशा पश्चात्तापाच्या भावनेनें दग्ध होऊन तो मोटार ड्रायव्हर श्री

बाबांची क्षमा मागावयास आला. जगन्मातेला अन्याय, अनीति, असत्य सहन होत नाहीं. घातपातानें ती त्या अन्यायाचें परिमार्जन करूं पाहते हेंच खरें!

९ × × × मिस्त्री—गणेशपुरीला आज ज्या इमारती दिसत आहेत त्यांतील बहुतेक इमारती उभारणारा हा कारागीर–१९४३ सालीं नाशिक गांवीं राहात असतां श्री बाबांची माहिती कुणीतरी त्याला सांगितल्यावरून दर्शनासाठीं गणेशपुरीस आला. प्रथमदर्शनींच कुंडाजवळ पडलेला एक भला मोठा दगड घेऊन श्री बाबा त्याच्या पाठीं लागले. कृपाप्रसादाचा तो एक मार्ग होता हें त्याला आज पटलें आहे. तो पळत पळत वज्रेश्वरीला आला. हा साधु उन्मत्त वृत्तीचा तर नाहीं ना, असा विचार करीत करीत मोटारीची वाट पाहात उभा असतांना गोरख-मछिंद्राच्या देवळाजवळ आतां दिसत असलेल्या इमारतीचा पाया खणण्याच्या चाललेल्या कामाकडे त्याचें लक्ष गेलें. तें काम नीटसें होत नसल्याचें पाहून उभ्या उभ्या मिस्त्री मार्गदर्शन करूं लागला. इतक्यांत गणेशपुरीहून त्याच मिस्त्रीच्या शोधांत एक भक्त आला. मघाशीं पळत गेलेल्या माणसाला इकडे घेऊन ये अशी आज्ञा झाल्यावरून तो भक्त त्या इसमाच्या शोधांत होता. निरोप मिळतांच मिस्त्री बापडा आणखी घाबरला. हो ना करतां करतां पुन्हा तो श्री बाबांकडे गणेशपुरीस आला. येतांच श्री बाबांनीं लंगोटींतून नोटांचीं पुडकीं काढून त्याच्या अंगावर फेकलीं व म्हणाले, वज्रेश्वरीची धर्मशाळा पुरी कर आणि इकडेच रहा. मिस्त्री किंकर्तव्यमूढ झाला. कारण आपण आलों कशाला आणि आपल्याला श्रीबाबा स्थायिक व्हायला सांगतात काय? महापुरुषाचा रोष नको असा विचार करून त्यानें आपण आतां नाशकास परत येत नाहीं असा निरोप धाडला आणि तो इथेंच स्थायिक झाला. पुढें ती धर्मशाळा पुरीहि झाली. एके दिवशीं आतां ज्या ठिकाणीं नंदेश्वर हॉटेल आहे त्याजागीं त्याच्या पायाला सापानें कडकडून चावा घेतला.

व्याकूळ होऊन तो गडबडा लोळूं लागला. सर्वांनीं त्याला उचलून श्री बाबांकडे नेलें. श्री बाबांना अंतर्ज्ञानानें हा सारा प्रकार समजला होता. हा रडत गडबडा लोळत होता आणि बाबा हंसत होते. 'मी आतां जातों' असें म्हणत तो गडबडा लोळूं लागला. 'अरे कुठें जातोस— गणेशपुरीला मुंबईसारख स्वरूप येणार. इथें अनेक इमारती तुझ्या हातून बांधल्या जावयाच्या आहेत. कोणीं तुला कुठेंहि नेत नाहीं. भिऊं नकोस.' श्री बाबा पुढें म्हणाले, 'ती बामची डबी उघडून पायाला लाव— तुझ्या नव्हे माझ्या—आणि चोळत रहा.' साप आपल्या पायाला चावला आहे आणि बाबा स्वतःचा पाय बामनें चोळावयास सांगत आहेत, हा काय प्रकार आहे! संबंध रात्र तो श्री बाबांच्या पायाला बाम लावून चोळत होता. सबंध रात्रींत एकंदर चारपांच बाटल्या बाम बाबांच्या पायाला चोळला. पहांटे चार वाजतां 'आतां पुरे, जा—' असें बाबा म्हणाले आणि मिस्त्रीच्या वेदना कमी झाल्या. काळ आला होता परंतु श्रीबाबांच्या कृपाकटाक्षानें तो परत गेला असें कृतज्ञतेनें अजून मिस्त्री सांगतो.

१० × × × मिस्त्रीला एकदां सडकून ताप भरला. काय करावें सुचेना. वज्रेश्वरीहून गणेशपुरीला यावयास साधन असें नव्हतेंच. जेमतेम मुक्काम करीत करीत श्री बाबांकडे आला. श्री बाबा खांद्यावर शाल टाकून कुडकुडत असल्याचें पाहून 'बाबा, बरें नाहीं का?' म्हणून मिस्त्री म्हणूं लागला. बाबा म्हणाले 'शरीर भोग-दुसरें काय?' इतक्यांत श्री बाबांनीं आपल्या खांद्यावरची शाल दूर फेकली व मिस्त्रीला म्हणाले, 'पहा तिकडे.' तो त्या पडलेल्या शालीकडे पाहूं लागला. हुडहुडी भरल्यासारखी त्या निर्जीव शालीची हालचाल होऊं लागली. श्री बाबांची हुडहुडी जाऊन बाबा तटस्थ दिसले. हा काय चमत्कार, म्हणून बाबांना त्यानें विचारलें. तेव्हां बाबा म्हणाले, 'शरीरभोग अशा रीतीनें काढून दुसरीकडे ठेवला तर शरीरभोग भोगून संपविण्यासाठीं जीवाला पुन्हा जन्म घ्यावा

लागेल. व्याजबट्ट्यानें हा भोग पुढल्या जन्मीं फेडावा लागेल. जा आतां आणि चोविसाव्या दिवशीं भेटावयास ये.' शरीरभोगाची आपण तक्रार करावयास आलों आणि अंतर्ज्ञानानें जाणून श्री बाबांनीं आपणास आत्मज्ञानाची नवीन दृष्टि दिली हें पटून तो मिस्त्री परतला. तेविसाव्या दिवशीं त्याचा ताप खरोखरीच उतरला आणि चोविसाव्या दिवशीं त्याला भेटावयास बाबांकडे आणलें. 'संपला ना भोग' असें बाबा हंसत हंसत म्हणाले.

११ × × × मिस्त्री–'भावना' बिल्डिंग बांधण्याअगोदर त्या इमारतीला लागून असलेल्या सरोवराकडील झाडें पाडतांना एकाएकीं साप बाहेर पडत असल्याचें आढळून आलें. मिस्त्री घाबरून श्रीबाबांकडे आला. 'जा हें दूध घेऊन आणि पाज तें त्यांना...मुकाट्यानें जातील तीं जनावरें. मारूं नकोस!' बाबांनीं आज्ञा केली. मिस्त्रीनें त्याप्रमाणें केलें आणि आश्चर्य हें कीं ते सर्व साप एकत्र येऊन दूध पीत असल्याचें अनेकांनीं उघड्या डोळ्यांनीं पाहिलें. दूध पिऊन ते सर्व साप एका ओळीनें आपली वाटचाल करूं लागले. पुढें कुणालाच कांहींहि त्रास झाला नाहीं; बाबांची लीला अगम्य आहे.

१२ × × × एक भक्त एका साधूचा एक शिष्य आल्याचें ऐकून हे भक्त त्यांच्या दर्शनासाठीं गेले होते. या भक्तांना अगदीं सुरुवातीला कुठेंहि साधु आल्याचें समजतांच त्याच्या दर्शनासाठीं जाण्याची संवय असे. असेंच एकदां त्यांना समजलें कीं, × × × होऊन गेलेल्या एका सिद्ध पुरुषाचा शिष्य आला आहे. हे भक्त ताबडतोब तिकडे गेले. दर्शन वगैरे घेऊन दुपारीं श्री बाबांच्या दर्शनासाठीं गणेशपुरीस गेले. आश्चर्य हें कीं, त्या दिवशीं वैकुंठ आश्रमांतील हॉलचा दरवाजा श्री बाबांनीं बराच वेळ उघडला नसल्यामुळें सर्व भक्तगण दरवाजापाशीं खिन्न अंतःकरणानें 'ताटी उघडा नित्यानंदा' अशा भावनेनें उभा होता. हे भक्तहि त्या भक्तगणांत सामील झाले. बऱ्याच वेळानंतर श्री बाबांनीं

दरवाजा रागारागानें उघडला व म्हणाले 'सतरा साधू, सतरा बुवा—कशाला सर्व ठिकाणीं फिरायला हवें? निष्ठा एकदांच ठेवावी आणि ती पक्की असूं द्यावी.' जमलेल्या भक्तगणांपैकीं एकानें म्हटलें, 'बाबा! आमच्याकडून अशी चूक झाली नसतांना आपण असा कां रोष करीत आहां?' श्री बाबा म्हणाले, 'तूं एकटाच उभा आहेस का इथें? तुझ्या शेजारीं कुणीच नाहीं का?' आश्चर्य असें कीं, त्या इसमाला खेटून हे भक्त उभे होते. आपली चूक ह्यांना कळून आली व त्या दिवसापासून गांवांत येणाऱ्या प्रत्येक बुवा, साधूकडे जाण्याचें त्यांनीं सोडून दिलें.

१३ × × × पीएच्. डी.—एस्. टी. ओ. मधील एक अधिकारी—हे गृहस्थ आजारी असलेल्या आपल्या बायकोला घेऊन श्रीगणेशपुरीला निघाले. प्रथम ते वसईला उतरले व पायींच गणेशपुरीला निघाले. दुपारची वेळ—सूर्य अगदीं टाळूवर आला होता. उन्हांतून चालतां चालतां या भक्तांच्या पत्नीला एकाएकीं वांत्या होऊं लागल्या व ग्लानि येऊं लागली. पायींच श्री बाबांच्या दर्शनाला जावयाचें असा या सात्त्विक दांपत्याचा संकल्प असल्यामुळें शारीरिक वेदना सहन करूनहि ही मंडळी गणेशपुरींत दाखल झाली. चौकशी करतांच असें समजलें कीं आज दुपारपासून श्री बाबा अस्वस्थ असून त्यांना त्याच सुमारास एकाएकीं ढाळ होऊं लागले. शारीरिक कष्ट घेऊन वाहनांची सोय असतांना सुद्धां पायींच प्रवास करणाऱ्या भक्तांचें हें वेडें प्रेम पाहून श्री बाबांना गहिंवर आला. अशा भक्तांना एकाएकीं झालेल्या आजाराची सुरुवात होतांच तीरासारखे श्री बाबा जणुं धांवत गेले आणि भक्ताचा आजार स्वतःवर ओढून घेतला. कारण नंतर आणखी चौकशी करतां असें आढळून आलें कीं श्री बाबांना ज्या सुमारास एकाएकीं ढाळ सुरू झाले त्याच सुमारास या भक्तांच्या पत्नीला होणाऱ्या वांत्या थांबल्या आणि पूर्ववत् प्रकृति होऊन आनंदानें, हंसत खेळत ही मंडळी गणेशपुरीस येऊन पोहोंचली.

१४ × × × एस्. टी. ओ.मधील बडे अधिकारी–पीएच्. डी. या भक्तांनीं आपल्या निवासस्थानीं श्री बाबांची एक भली मोठी प्रतिमा भिंतीला लागून असलेल्या खिळ्याला अडकवली होती. परिस्थिति अशी होती कीं ज्या दोरीच्या साहाय्यानें ही तसबीर टांगली होती ती दोरी तुटावयास आली होती. अर्थात् या गोष्टीकडे कुणाचेंहि लक्ष गेलेलें नव्हतें. एके दिवशीं पहांटेच्या सुमारास यांच्या बायकोला स्वप्न पडलें व स्वप्नांत श्री बाबांचें त्यांना दर्शन झालें. इकडे दर्शन होत असतांना स्वप्नांतच श्री बाबांचा फोटो खालीं पडतो आहे असें आढळून आलें. त्यांना ताबडतोब जाग आली व उठून श्री बाबांच्या तसबिरीकडे दोघेहि नवराबायको जाऊन पोहोंचलीं. आश्चर्य असें कीं श्री बाबांच्या तसबिरीची दोरी जवळजवळ तुटत आली असून क्षणाचा अवधि जाता तर ती तसबीर खालींच पडली असती असें आढळून आलें. दोघांचेहि डोळे पाणावले व त्या दोघांनींहि श्री बाबांचा फोटो खालीं काढून पुन्हा नवी टणक दोरी बांधून तो भिंतीला अडकविला.

१५ × × × रिटायर्ड ट्रेझरी ऑफिसर, वसई–या भक्तांचा राहता बंगला खाडीला लागून आहे. एके दिवशीं खाडीचें पाणी वाडींत शिरलें व त्यामुळें वाडींत असलेल्या विहिरीचें पाणी खारट झालें. अन्न त्यामुळें अर्थातच शिजेना. यांच्या पत्नीची श्री बाबांवर नितान्त श्रद्धा. या दांपत्यानें श्री बाबांचें मनःपूर्वक स्मरण केलें व श्री बाबांची उदी विहिरींत टाकली व तें पाणी घरांत आणून अन्न शिजवावयास सुरुवात केली. महदाश्चर्य हें कीं, पाण्यांतील खारटपणा नुसता गेला एवढेंच नव्हे तर अन्न ठराविक वेळेपेक्षां अगोदर शिजून आलें.

१६ × × × सरकारी वकील, पनवेल—यांच्या सर्व कुटुंबियांची श्रद्धा श्री. बाबांवर—यांचा सर्वांत धाकटा मुलगा खोकल्याच्या विकारानें खूप आजारी झाला. कांहीं केल्या खोकला थांबेना. सर्व औषधोपचार केले परंतु कांहीं केल्या गुण येईना. शेवटीं हे वकील आपल्या

मुलाला घेऊन गणेशपुरीस आले. रात्रौ वैकुंठाश्रमांत मुक्काम केला परंतु झोंप कांहीं येईना म्हणून बाहेर उभ्या असलेल्या एका टूरिंग गाडीमध्यें या मुलाची झोंपण्याची व्यवस्था करून आपण आश्रमांत जाऊन झोंपले. रात्रौ मुलाला शांत झोंप लागली. सकाळीं श्री बाबांच्या दर्शनासाठीं दोघेहि गेले व श्री बाबांना प्रार्थना करून परत आले. त्या दिवसापासून जो खोकला गेला तो आजतागायत परत उद्‌भवला नाहीं. ही श्री बाबांची कृपा नव्हे तर काय?

१७ × × × वकील, पनवेल. यांच्या सर्वांत लहान मुलाच्या छातींत एकाएकीं भरलें. खूप औषधोपचार केले परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. 'मसक्युलर पेन' म्हणून जरी निदान केलें होतें तरी त्या मुलाला चार पावलें चालणें अशक्य होऊन बसलें. अशा त्रासांत असतांना हा मुलगा प्रेरणेनें गणेशपुरीस एकटाच निघाला. प्रवासाची दगदग, त्यांत हा आजार, म्हणून अनेकांनीं तूर्त न जाण्याविषयीं विनविलें. परंतु हा मुलगा कांहीं केल्या ऐकेना. शेवटीं बाबांची इच्छा असें म्हणून घरांतील मंडळींनीं त्याला एस्. टीं. त नेऊन बसविलें. हा मुलगा इकडे आला व श्री बाबांना आपला त्रास सांगूं लागला. श्री बाबांनीं त्याला कुंडांतील गरम पाण्यांत स्नान कर म्हणून सांगितलें. आश्चर्य हें कीं, स्नान करून बाहेर येतांच त्याला पूर्ववत् हालचाल करतां येऊं लागली व आपल्याला यापूर्वीं छातींत कांहीं त्रास होत होता याची आठवणहि त्याला राहिली नव्हती. कुंडाचें पाणी निमित्त करून श्री बाबांनीं आपल्या कृपेनें त्याला व्याधिमुक्त केलें.

१८ × × × ईगल इन्शुअरन्स् कंपनींस नोकरीस असलेले एक अधिकारी—हे एकदां आपल्या बायकोसमवेत तीन महिन्यांच्या मुलीला घेऊन श्री बाबांच्या दर्शनास आले. श्री बाबा त्या वेळेस वैकुंठाश्रमांत राहात होते. दर्शन घेऊन परत जाते वेळीं श्री बाबा एकदम त्या लहान मुलीकडे पाहून त्या मुलीच्या आईला म्हणाले, 'संभाळून राहायचें,

संभाळून राहायचें.' इतकें बोलून झाल्यावर जवळच पडलेल्या केळ्यांच्या लोंगरांतून एक लहानसें केळें काढून 'मुलीला हें खायला दे' म्हणून बाबांनीं सांगितलें. तीन महिन्यांच्या मुलीला हें केळें कसें खाऊं घालावें अशी आईला काळजी पडली. श्री बाबांची आज्ञा शिरसावंद्य मानावयाची असें ठरवूनहि त्या केळ्यापैकीं अर्धा भाग आईनें तिथेंच खाऊन टाकला व उरलेला अर्धा भाग त्या तीन महिन्यांच्या मुलीला भरविला. दुसरे दिवशीं ही मंडळी मुंबईला परतली. त्या सुमारास ही मंडळी सांताक्रूझ येथें राहात होती. सांताक्रूझला परतल्यानंतर आईला एकाएकीं अॅस्थमाचा जोरदार आजार उद्भवला. त्याच सुमारास या लहान मुलीलाहि ताप भरला. डॉक्टरानें औषध पाठवून दिलें. गडबडींत आईनें नजरचुकीनें स्वतःला दिलेल्या पुड्यांपैकीं एक पुडी मुलीला दिली. मूल त्यानंतर झोंपीं गेलें आहे असें समजून आई बाजूला विश्रांति घेत होती. संध्याकाळीं मुलीचे वडील घरीं आल्यावर 'मुलीला आतां कसं आहे' म्हणून विचारणा करूं लागले. 'झोंपलं आहे बाळ' आई उत्तरली. वडील जवळ गेले व पाहूं लागले तर मुलीचें अंग गार पडत चाललें आहे! सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. असें कां व्हावें अशी विचारणा होतांच चौकशीअंतीं आईला आढळून आलें कीं, नजरचुकीनें आपण आपली अस्थमाची पुडी मुलीला दिली. धांवाधांव सुरू झाली. डॉक्टरांनीं मुलीला हॉस्पिटलांत नेलें. शेवटीं श्री बाबांच्या कृपेनें मुलगी शुद्धीवर आली.

परमेश्वरानेंच मुलीला जीवदान दिलें असें म्हणतां म्हणतां डॉक्टर म्हणाले कीं 'मुलीच्या आईचा जुना अॅस्थमा लक्षांत घेऊन मी नेहमीं फुल डोस देत असतों परंतु याच वेळेस कां कुणास ठाऊक, मी अर्धाच डोस दिला होता. फुल डोस कदाचित् या लहानग्या बाळाच्या पोटांत गेला असता तर हें बाळ आपल्या हातीं लागलें नसतें. देवाची कृपा.' आदले दिवशीं 'सांभाळून रहा'–असे उद्गार काढून श्री बाबांनीं

दिलेलें केळें व त्यांतील अर्धे केळें आपण खाऊन अर्धे मुलीला दिलें होतें या सर्व क्रियेंत श्री बाबांची काय योजना सांठून राहिली होती ती त्यानंतर घडलेल्या प्रसंगानंतर मुलीच्या आईवडिलांना पटली. सद्‌गुरु आपल्या भक्ताचें रक्षण कसें करीत असतात हें यावरून पाहाण्यासारखें आहे.

१९ × × × ईगल इन्शुअरन्स कंपनींतील अधिकारी—हे आपल्या कुटुंबासमवेत आपल्या मूळ गांवीं कुर्ग येथें सुट्टींत गेले होते. पावसाचे दिवस होते तेव्हां. पाऊस धो धो पडत होता. हवाहि सर्द झाली होती. एकाएकीं यांच्या पत्नीला ॲस्थमाचा जोरदार आजार उद्‌भवला. त्यांत हे गृहस्थहि खूप आजारी झाले. ताप कांहीं केल्या उतरेना. चिंतेंत असतांना यांना पहांटे गाढ झोंप लागली. गाढ निद्रेंत त्यांना एक स्वप्न पडलें. स्वप्नांत श्री बाबा येऊन म्हणाले, ‘ भिऊं नकोस....कांहीं होत नाहीं.’ या गृहस्थांना मराठी भाषा अवगत नसून हे शब्द त्यांच्या नीट कानीं पडल्याचें सकाळीं त्यांनीं सर्वांना सांगितलें. दरम्यान त्यांनीं आपल्या मेहुणीला व काकूला श्री बाबांच्याकडे जाऊन करुणा भाकण्यासाठीं विनविलें होतें. ही मंडळी (मेहुणी व काकू) श्री बाबांकडे आली व मनांतलें आपलें दुःख सांगूं लागली. एकदम बाबा उद्‌गारले, ‘तापबिप कांहीं नाहीं....कांहीं होत नाहीं....उद्यां मंडळी येताहेत.’ आणि खरोखरीच इकडे दोघांहि नवराबायकोंना उतार पडला व दुसरेच दिवशीं ती मंडळी मुंबईंत येऊन दाखल झाली.

२० × × × परदेशांतून उच्च शिक्षण घेऊन आलेले एक गृहस्थ—परदेशांत उच्च शिक्षणासाठीं जाण्याअगोदर श्री बाबांच्या दर्शनासाठीं गणेशपुरींत आले. बराच वेळ महाद्वारापाशीं थांबले परंतु त्या दिवशीं दरवाजा उघडला गेला नाहीं. दुसरे दिवशीं विमानानें परदेशांत जावयाची तयारी करून हे गृहस्थ आले असल्यामुळें इच्छा असूनहि अधिक काळ गणेशपुरीस वास्तव्य करणें अशक्यच होतें. खूप

...२०१३...... नों: दि: २७/१/...

वाट पाहिली परंतु दरवाजा उघडण्याचीं चिन्हें दिसत नसल्याचें पाहून हे मुंबईस परतले. परदेशांत जाण्यापूर्वी श्रीबाबांचें दर्शन होऊं शकलें नाहीं याबद्दल त्यांना राहून राहून वाईट वाटत होतें. ठरल्या वेळीं ते विमानांत बसले. प्रवासांत त्यांना गाढ झोंप लागली. श्रीबाबा त्यांना स्वप्नांत दिसले. श्री बाबांनीं त्यांना एक पुस्तक दिलें व त्या पुस्तकाचें नेमकें हेंच पान वाच म्हणून सांगितलें. या गृहस्थांना जाग आली व श्रीबाबांच्या स्वप्नांत झालेल्या दर्शनामुळें खूप आनंद झाला. पुढचें आश्चर्य असें कीं ज्या परीक्षेसाठीं हे गृहस्थ गेले होते त्या परीक्षेसाठीं श्रीबाबांनीं स्वप्नांत येऊन दाखविलेलें पुस्तक (कीं ज्याची माहिती या गृहस्थांना अगोदर नव्हती) खरोखरीच उपयुक्त ठरलें एवढेंच नव्हे तर श्री बाबांनीं स्वप्नांत येऊन दाखविलेलें पुस्तकाचें पान या गृहस्थांच्या आयुष्यांतील पुढील टप्पा गांठण्यासाठीं साधनीभूत ठरलें.

२१ × × × पीएच. डी.-एस्. टी ओ. मधील एक बडे अधिकारी—हे भक्त मध्यंतरीं खूप आजारी झाले होते. यांचा ताप कांहीं केल्या उतरेना. यांच्या मित्रांनीं व श्रीबाबांच्या एका फार जुन्या भक्तानें श्री बाबांना हें कळविलें. तें ऐकून श्री बाबा उद्गारले 'कुठें आहे ताप? तापबिप कांहीं नाहीं.' श्री बाबांचे उद्गार कळविण्यासाठीं हे भक्त मुंबईस गेले. रुग्णाइत भक्ताच्या घरीं पोहोंचतांच असें समजलें कीं, आदले दिवशीं रात्रींच त्यांचा ताप उतरला. चमत्कार असा कीं, ज्या सुमारास ताप उतरला त्या सुमारासच श्री बाबांच्या तोंडून "तापबिप कांहीं नाहीं. कुठें आहे ताप?" असे उद्गार बाहेर पडले होते. सद्गुरूच्या तोंडून बाहेर पडलेल्या संकल्पाची पूर्ति देव कशी तांतडीनें करतो हें पाहाण्यासारखें आहे.

२२ × × × न्यायमूर्ति—हे भक्त विद्वान् असूनहि त्यांच्या बहुविध गुणांचें त्यांच्या क्षेत्रांत चीज होत नसल्याचें पाहून खिन्न झाले होते. अंतरींची व्याधी कुणास सांगावी म्हणून हे श्री बाबांकडे गेले.

न्यायमूर्तींच्या जागेसाठीं अर्ज करावा असें त्यांच्या मनानें घेतलें व अंतःकरणांत गुरुदेवांविषयीं श्रद्धा राखून 'बाबा, मी अर्ज करीत आहें. करूं ना ? उपयोग होईल ना ?' अशी श्री बाबांकडे आर्त स्वरांत पृच्छा केली. श्री बाबा एकदम उत्तरले, 'जा, तुझें काम झालें !' आणि खरो-खरीच दुसऱ्या आठवड्यांत ध्यानींमनींस्वप्नीं नसतांना सुद्धां यांची एकाएकीं नेमणूक झाली. श्री बाबांचें नांव काढतांच अजूनहि कृतज्ञ-तायुक्त प्रेमानें या भक्ताचे डोळे भरून येतात.

२३ × × × खानदानी घराण्यांतील एक वयोवृद्ध स्त्रीभक्त—फार वर्षांपूर्वीं जेव्हां श्री बाबा वैकुंठआश्रमांत राहात होते तेव्हां घड-लेली घटना. आपल्या मुलीला आंवेचा त्रास सुरू झाल्याचें पाहून पहांटे तीनच्या सुमारास मुलीला घेऊन कुंडाच्या पूर्वेला असलेल्या ओढ्याजवळ गेल्या. परत येतांना कुंडाजवळ येतांच सहज पाहतात तों काय ! आकाशांतून पांढरीं वस्त्रें धारण केलेल्या तीन मूर्ति खालीं उतरत आहेत. श्री बाबा कुंडावर बसून जणुं त्या तीन मूर्तींची वाट पाहात आहेत. त्या तीन मूर्ति खालीं उतरल्या व श्री बाबांसमवेत त्या सर्वांनीं स्नानहि केलें आणि पुन्हा वस्त्रें परिधान करून त्या तीन मूर्ति आकाशमार्गानें परत जाऊं लागल्या. हें लोकविलक्षण आश्चर्य पाहून या बाई जागच्या जागींच थबकल्या. श्री बाबांनीं बाहेर येतांना पाहिलें व 'कशाला एवढ्या लवकर आलांत ?' म्हणून रागावून श्री बाबा आश्रमांत परतले.

२४ × × × एक प्रसिद्ध व्यापारी—गणेशचतुर्थीला यांनीं आपल्या घरीं भक्तगणांना तीर्थप्रसादासाठीं बोलाविलें होतें. घरांत आनंदी-आनंद चालला होता. हे व्यापारी प्रसादाच्या पुड्या बांधण्याच्या कामीं बसल्याबसल्या आनंदानें मदत करीत होते. यांची पत्नी मात्र आजच्या पवित्र सणाच्या दिवशीं आपल्या घरीं आनंदाचा सोहळा चालू असतांना श्री बाबा प्रत्यक्ष घरीं येऊं शकत नाहींत म्हणून डोळे

भरून श्री बाबांच्या फोटोकडे पाहात होत्या. पंचारती घेऊन त्या गणपतीच्या मूर्तीला व श्री बाबांच्या मूर्तीला ओवाळूं लागल्या. तों काय ? त्या मूर्तींतून श्री बाबा बाहेर येत आहेत असें त्यांना दिसलें. श्री बाबांचा बस्ट फोटो होता तो. त्या फोटोंत श्री बाबा उभे राहिल्याचें त्यांनीं पाहिलें. श्री बाबांचें हें प्रत्यक्ष घडलेलें दर्शन पाहून त्यांना भक्तिप्रमाचा गहिंवर आला व धांवत धांवत 'बाबा आले, बाबा आले' म्हणून भराभर धावूं लागल्या. 'काय झालें' म्हणून त्यांचे पति विचारूं लागले परंतु त्यांचें अंतःकरण एवढें भरून आलें होतें कीं कांहीं मिनिटें त्यांच्या तोंडून शब्दच फुटेना. कांहीं वेळानें सर्व प्रकार ऐकल्यावर सर्वांनींच श्री बाबांची आरती केली.

२५ × × × प्रसिद्ध औषधी तयार करणाऱ्या कारखान्यांतील मोठे अधिकारी. एके दिवशीं हे गृहस्थ श्री बाबांच्या दर्शनासाठीं गेले. अयाचित आणि अवचितपणें श्री बाबांना भेटण्याचा त्यांना योग आला. श्री बाबांची व त्यांची नजरानजर झाली. अजून हे गृहस्थ सांगतात कीं, बॅटरीचा काळोख्या रात्रीं प्रकाश पाडल्यावर जसा दुरून एक झोत दिसतो तसा प्रकाश श्री बाबांच्या दोन्हीहि बुबुळां-तून बाहेर पडत आहे असें त्यांना दिसलें. अनैसर्गिक असा हा अनुभव होता. तो अनुभवीत असतांना आपली छाती एकसारखी उडत होती असें हें गृहस्थ सांगतात.

२६ × × × एक प्रसिद्ध व्यापारी. या गृहस्थांनीं नवें घर बांधल्यावर गृहप्रवेश करतांना श्री बाबांची अनुपस्थिति त्यांना जाणवत होती. दोघांहि पतिपत्नींची तीव्र इच्छा कीं, श्री बाबा या समारंभासाठीं हजर राहावेत. श्री बाबांकडे तशी विनंती करतांच 'हं' एवढेंच काय तें बाबा म्हणाले. इकडे ही मंडळी मुंबईला परतली. घरांत होम चालला असतांना यांच्या पत्नीला समोर श्रीबाबा बसले आहेत असें दिसलें. बाबा....बाबा.... म्हणून या बाई ओरडतच उठल्या. डोळ्यांतून

प्रेमाश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. भक्ताची इच्छा लिंगदेहानें दर्शन देऊन पुरी केल्याचें अजूनहि हीं पतिपत्नी आठवतात.

२७ × × × चुनाभट्टी येथें राहाणाऱ्या एक भक्त. या बाईला मुलगा नव्हता. सुशिक्षित आणि सुविद्य घराण्यांत मुलगा नाहीं ही परिस्थिति त्यांना जाणवत असे. वैकुंठाश्रमांत गेल्या वेळीं श्री बाबांनीं त्यांची एकनिष्ठ भक्ति पाहून ओटींत नारळ टाकला. दुसऱ्याच वर्षी घरांत मूल रांगूं लागलें. मुलाला घेऊन या बाई श्री बाबांच्या दर्शनास आल्या. 'आतां तुला आनंद झाला ना ? मग ठेव या मुलाचें नांव आनंद' असें मुलाला हातांत खेळवतां खेळवतां श्री बाबांनीं सांगितलें.

२८ × × × हाच मुलगा एकदां खूप आजारी झाला. नानाविध औषधोपचार केले. सर्व उपाय हरले. मुलाच्या आईची श्री बाबांवर फार श्रद्धा. इतर कुटुंबियांचीही सुद्धां. ताप कांहीं केल्या उतरत नाहीं असें पाहून या बाई त्या लहानग्या बालकाला घेऊन थेट गणेशपुरीस आल्या. श्री बाबांच्या पुढ्यांत कुणीतरी तबला आणून ठेवला होता. श्री बाबा वकंठाश्रमांत चबुतऱ्यावर बसले होते. श्री बाबांना पाहून या बाईंना प्रेमाचें भरतें आलें. आपल्याशिवाय आतां अन्य कुणी नाहीं अशी भावना अंतःकरणांत गोळा होऊन डोळ्यांतून अश्रूंची धार लागली. श्री बाबांनीं अंतर्ज्ञानानें सर्व प्रकार या अगोदरच जाणला होता. त्या मुलाला आपल्या मांडीवर घेऊन ते एकदम ओरडले, 'ऊठ रे ! जायचं नाय....राह्यचा दुनियेमध्यें....' आईकडे पाहून म्हणाले, 'रडतेस कशाला ? ज्यानें दिला त्याला काळजी.' श्री बाबांच्या त्या उद्‌गारानें बाईला धीर आला. दोनच दिवसांत मुलाला बरें वाटून तो साफ बरा झाला.

२९ × × × याच मुलाला पुढें पोटाजवळ एकतऱ्हेचा फोड आला. खूप औषधोपचार केले. डॉक्टर बालिगांसारख्या निष्णात तज्ञांनीं ऑपरेशनशिवाय अन्य मार्ग नसल्याचें सांगितलें. बरें, ऑपरेशननंतर



गुरुबनांतील श्रीबाबांनीं पावन केलेलें कुंड



गुहाक्षेत्र ते गुरुवन

या मुलाला खडखडीत बरें वाटेल अशी खात्रीहि कुणी देईना. इकडे बाबांना अंतर्ज्ञानानें हा प्रकार समजला. या बाईची मुलगी श्री बाबांना कळविण्यास गणेशपुरीस आली. 'मुलाला इकडे घेऊन ये...' इतकेंच काय तें बाबा बोलले. मुलाला घेऊन त्याची आई गणेशपुरीस आली. श्री बाबांनीं मुलाला उचलून विचारलें, 'कुठें आहे फोड ? कुठें आहे फोड ?' तीन वेळां पोटावरून हात फिरवून म्हणाले 'जा, कुंडाच्या पाण्यानें स्नान घाल !' चार दिवस त्याप्रमाणें केलें व आश्चर्य हें कीं पांचव्या दिवशीं फोड नाहींसा झाला. मुलाची आई मुलाला घेऊन मुंबईस परतली. पुन्हा सर्व तज्ज्ञांना दाखविलें : सर्वांनीं आश्चर्य व्यक्त करून म्हटलें, 'बाई, तूं कुठलें औषध या मुलाला दिलेंस....आम्हांला तरी सांग.' 'गणेशपुरीच्या देवाचें —' बाई गहिंवरून म्हणाली.

३० × × × हाच मुलगा वर्षाचा असतांना श्री बाबांच्या आज्ञेवरून पंधरा दिवसांसाठीं मुलाची आई व मुलगा गणेशपुरीस येऊन राहिली होतीं. श्री बाबांच्या आश्रमापासून फर्लांगावर नुकत्याच बांधलेल्या एका हॉटेलांत यांचा मुक्काम होता. मुलाला पाळण्याची हौस. पाळणा नसल्यामुळें मूल सबंध दिवस रडूं लागलें. काय करावें हें मुलाच्या आईला सुचेना. इकडे आश्रमांत बाबा म्हणतात, 'अरे मूल रडत राहिलंय. जा, जाऊन एक पाळणा आणून द्या त्याला !' खरोखरच एक इसम जाऊन पाळणा घेऊन आला. भक्ताची श्री बाबा अहोरात्र काळजी घेत असतात हें सांगतांना मुलाची आई अजून गहिंवरते.

३१ × × × या बाई उडपी येथें नुकत्याच गेल्या होत्या. काननगडची यात्रा पुरी करून येत असतां उडपी येथील कृष्णमंदिरांत या गेल्या. तिथें प्रसाद वाटीत असतांना त्यांनीं आपला हात पुढें केला. तों काय ? पाठून श्री बाबा ओरडत आल्याचें त्यांनीं पाहिलें. 'तिला प्रसाद देऊं नका. तिचा प्रसाद गणेशपुरींत—' हें सर्व क्षणार्धांत घडलें. भास तर नाहीं ना झाला, असें या बाईंना वाटलें. त्या घाईघाईनें परतल्या. तडक

गणेशपुरीस आल्या. गणेशपुरीस आल्यावर श्री बाबांच्या दर्शनास गेल्या. तों काय ? हंसत हंसत श्री बाबांनीं 'हा धर प्रसाद' असें म्हणत गीतेची एक प्रत दिली. हा लोकविलक्षण अनुभव पाहून या बाईंच्या डोळ्यांतून प्रेमाश्रू वाहूं लागले.

३२ × × × एक भक्त : या वर्षी झालेल्या महाशिवरात्रीच्या उत्सवाला काननगड येथें मुंबईहून जवळ जवळ दोनएकशें मंडळी गेली होती. महाशिवरात्रीच्या आदले दिवशीं श्री बाबा सहजगत्या संध्या-काळीं ६ च्या सुमारास इकडे काननगड येथें त्या वेळीं काय चाललें आहे हें जणुं आपण देखावा पाहात आहोंत त्याप्रमाणें बोलत होते. 'ते पहा मुक्तानंदस्वामी–सभोंवतीं खूप मंडळी बसली आहेत. उद्यां कार्यक्रम कसा पार पाडावयाचा असें विचारीत आहेत....त्या गुहेंत पहा कशीं भराभर माणसें शिरत आहेत....' वगैरे वगैरे. श्री बाबा सांगत होते, 'ती पहा गाडी आली....' काननगडहून दोन दिवसांनीं श्री. कोतवाल व प्रधान वकील विमानानें परतले. हा भक्त जाऊन श्री बाबांनीं सांगित-लेलें वर्णन त्यांना सांगूं लागला. वर्णन तंतोतंत खरें असल्याचें पाहून श्री बाबा सर्व ठिकाणीं एकाच वेळीं वावरूं शकतात याची सर्वांना प्रचीति आली.

३३ × × × एक भक्त. या भक्तांचा एकुलता एक मुलगा. मुलाच्या सुशिक्षित आणि सुविद्य आईची श्री बाबांवर अनन्य भक्ति. एके दिवशीं नेहमींप्रमाणें श्री बाबांचें ध्यान केल्यावर आई सहज मुलाला सांगूं लागली, 'बाळ ! तूं बाबांची सतत आठवण ठेव. एक वेळ तुझ्या आईवडिलांना विसरलास तरी चालेल. कारण त्यांचा तुला जितका उपयोग होणार नाहीं तितका श्री बाबांच्या केवळ स्मृतीनें होईल. अकरा वर्षांच्या मुलाला त्याची आई तत्त्वज्ञान सांगत असल्याचें पाहून मुलाचे वडील 'एवढ्या लहान वयांत कसलें त्याला तत्त्वज्ञान शिकवतेस ?' म्हणून डाफरले. आई म्हणाली, 'असं कां बोलावंसं वाटतं मला समजत

नाहीं. परंतु श्री बाबांचा यांत कांहीं तरी हेतु असावा.' चवथ्याच दिवशीं हा मुलगा एकाएकीं बेपत्ता झाला. सगळीकडे शोधाशोध सुरू झाली. घरांत सर्वच माणसें रडूं लागलीं. आई मात्र शांत होती. तिची बाबांवर अनन्य श्रद्धा होती. वडीलहि श्री बाबांवरील अचल श्रद्धेच्या बळावरच तटस्थ वृत्तीनें शोधाशोध करीत होते. पहांटेस हा मुलगा परतला व असें आढळून आलें कीं या मुलावर शाळेंतून बाहेर पड-ल्यावर कोणीतरी मोहिनी विद्येचा प्रयोग करून मुंबईबाहेर नेलें होतें. 'मी सतत बाबांचें स्मरण करीत होतों. मला त्या माणसानें कांहीं न करतां नाला सोपारा स्टेशनवर सोडलें. गाडींत बसून मी घरीं आलों. श्री बाबांचें स्मरण करीत असल्यामुळें मला मुळींच भीति वाटली नाहीं' असें त्या मुलानें परतल्यावर सांगितलें. तीनच दिवस अगोदर त्याच्या आईला 'बाबांना विसरूं नकोस, त्यांचें सतत नांव घे' असें सांगण्याची जी बुद्धि झाली तिचा अर्थ या घटनेनें सर्वांना उमगला आणि कृतज्ञतेनें मंडळी श्री बाबांच्या दर्शनाला गेली.

३४ × × × बुद्धिवादी भक्त. 'जीवनाची वाटचाल करीत असतांना भेटणाऱ्या प्रतिकूल अनुभवांमुळें कित्येक वेळां माझें मन हबकून जात असे. गाडी सुरळित चालली आहे तोंपर्यंत ठीक. एरवीं एखाद्या प्रतिकूल अनुभवाची वाटेंत गांठ पडल्यावर एरवीं टवटवीत दिसणारें मन कोमेजण्यास वेळ लागत नसे. गरीब पक्षकारांचीं दुःखें पाहून, अनाथ अपंग विधवांचे भेडसावणारे प्रश्न पाहून, कित्येक वेळां मन इतकें खिन्न होत असे कीं जीवनांत असा एक क्षण उभा राहिला कीं ज्यावेळेस या दुबळ्या मनाची मनस्वी चीड आली आणि त्या रागांतच "बाबा, माझें हें दुबळें मन काढून त्या जागीं निष्कोप व निश्चयी मनाची प्रतिष्ठापना करा' असे मागणें करण्यास बाबांकडे गेलों. मे महिन्यांतले ते दिवस. त्यावेळेस बाबा नवीनच बांधलेल्या कैलास हॉलमध्यें येत असत. आज बराच वेळ झाला परंतु बाबांचें दर्शन

होण्याची वेळ टळत चाललेली पाहून वाईट वाटत राहिलें. 'ताटी उघडा नित्यानंदा' अशी मनांतून एकसारखी प्रत्येक भक्तानें प्रार्थना करावयास सुरुवात केली. क्षण लोटला नसेल, इतक्यांत चट्दिशीं दार उघडलें गेलें. माझ्या आनंदाला पारावार उरला नाहीं. आनंदातिशयानें "बाबा' म्हणून मोठ्यानें शब्द उच्चारले गेले. बाबांची माझी नजरानजर झाली. माझी मागणी बाबांना समजली कीं काय न कळे, बाबा माझ्याकडे नजर रोखून पाहात असतांना माझ्या रक्तप्रवाहांत कांहीं तरी तेजाचा एक किरण झपाट्यानें जात आहे अशी मला प्रत्यक्ष अनुभूति आली. सबंध शरिराच्या मज्जाजंतु संस्थेला Nervons system ला जणुं हादरा बसावा व त्या संस्थेची पुनर्रचना व्हावी असा प्रत्यक्ष अनुभव आला. झालें. मी मटकन् खालीं बसलों. थोड्या वेळानें मी भानावर आलों व कैलास हॉलच्या बाहेर आलों. आश्चर्य वाटेल, परंतु हॉलमध्यें शिरण्यापूर्वीं ज्या मनाची मला किळस येत चालली होती तें मन जाऊन त्या जागीं सुदृढ मनानें जागा घेतली होती. त्यानंतर कांहीं वर्षे लोटलींहि. माझ्या जुन्या मनाचा मी जेव्हां जेव्हां विचार करतों तेव्हां तेव्हां माझें मलाच हंसूं येतें. सध्यां परिस्थिति अशी आहे कीं कुठल्याहि परिस्थितींत माझ्या मनाची घडी विस्कटत नाहीं. सुखांत मला हर्षहि होत नाहीं, दुःखांत मला दुःखहि वाटत नाहीं. जें कांहीं घडत असतें त्याकडे तटस्थ वृत्तीनें पहाण्याची मला संवय झाली आहे. अंवतीभंवतीं जरी आग पेटलेली असली तरी कर्तव्याचा विसर न पडतां, मनावर तिचा यत्किंचितहि परिणाम होत नाहीं. ही मानसिक शक्ति कुठून आली असें जेव्हां मला विचारण्यांत येतें तेव्हां माझें मन वरील प्रसंगाकडे धांव घेतें व सांगतें कीं 'ही सर्व बाबांची कृपा.'

३५ × × × बुद्धिवादी भक्त. 'एका पहांटे मला एक स्वप्न पडलें. त्या स्वप्नांत मी एका रस्याच्या कडेला एक साधु पाहिला. त्या रस्त्याच्या बाजूला पडलेल्या विटांवर फुंकर घालून, तो म्हणाला, 'अरे! ही अक्षरें

वाच. ही तुझी भाषा. त्यांत मला कांहीं कळत नाहीं.' जाग आल्यावर मला त्या स्वप्नाचा अर्थबोध होईना. सकाळीं कचेरींत गेल्यावर मला फोन आला. चौकशी करतां फोनवरील व्यक्तीनें आपण सरकारी खात्यांत अधिकारी असून कांहीं कामानिमित्त त्यांना माझी भेट घ्यावयाची आहे म्हणून त्यांनीं सांगितलें. कुळकायद्याबाबत आपल्याला कांहीं अडचण असून त्याबाबत माझें मत हवें आहे असें ते म्हणाले. सध्यां रजेचे दिवस असल्यामुळें मी ऑफिसांत भेटूं शकत नाहीं, तथापि रजेंत मी माझ्या वडिलांच्या घरीं ठाणें येथें भेटूं शकेन असें मी म्हणालों. अहो, ठाणें माझ्या वज्रेश्वरीच्या रस्त्यावरच आहे. मी संध्याकाळीं श्रीबाबांकडे जात आहें तेव्हां वाटेंत गाडी थांबवून आपली भेट घेणें मला सहज शक्य आहे, असें फोनवरून बोलणारे गृहस्थ म्हणाले. 'अहो, माझें स्वतःचें काम नाहीं, वज्रेश्वरीचें काम आहे' असें ते म्हणतांच मी मटकन् खालीं बसलों. मला पहांटेचें स्वप्न आठवलें आणि विचार करूं लागलों कीं त्या स्वप्नाचा या गोष्टीशीं कांहीं संबंध तर नसेल ना? संध्याकाळीं ठरल्या वेळीं ती व्यक्ति भेटली व गणेशपुरी येथील कांहीं शेतकी जमिनीबाबत निर्माण झालेली कुळकायद्यांतील अडचण त्यांनीं मला सांगितली. कायद्याला सोडून कांहीं न होऊं देण्याविषयीं श्री बाबांची आज्ञा असल्यामुळें मीं आपल्याकडे आलों आहें असें ते म्हणाले. मी कायद्यांतलें पुस्तक चाळूं लागलों व हवी असलेली माहिती मला मिळालीहि. मोठ्या आनंदानें ती मी त्यांना देऊन म्हटलें कीं 'पहांटेस मला स्वप्नांत एक साधु भेटून म्हणाला कीं, ही भाषा तुझी आहे, माझी नाहीं. विटांवर फुंकर मारून अक्षरें दाखविणारा श्री बाबांशिवाय दुसरा कोण असणार?' याची मला खात्री पटली आणि त्या आनंदांतच मी श्री बाबांचें स्मरण करून पुढच्या कामाला लागलों.'

३६ × × × एक बुद्धिवादी भक्त. '१९५८ सालीं रामनवमीच्या

अगोदर सात दिवस मी देवस्थळींच्या अध्यात्मरामायणाचें पारायण करीत होतों. संकल्प असा केला होता कीं, सप्ताहाची परिसमाप्ति मी नव्यानें घेतलेल्या भाड्याच्या घरांत करावयाची. ईश्वरी संकेत अर्थातच वेगळा होता. रामनवमीच्या आदल्या दिवशीं जागा पुरी होत आली किंवा काय म्हणून पाहावयास गेलों तर दुर्दैवानें ती पुरी होण्यास आणखी कांहीं महिने लागतील याची खात्री पटली. क्षणभर मन खिन्न झालें आणि तसाच घरीं परतलों. रामायण मात्र पुरें करावयाचें राहिलें नाहीं. नवमीच्या दिवशीं पहांटेस स्वप्नांत पद्मासनांत मी श्री बाबांना पाहिलें. आपला हात डाव्या मांडीवर ठेवून त्या हातावरून उजवा हात फिरवीत फिरवीत ते मला बोलावत असल्याचें दिसलें. सकाळीं उठल्यावर मी सरळ गणेशपुरीचा रस्ता धरला. गणेशपुरीच्या रस्त्यावरच माझे एक मित्र मला भेटले. सहजगत्या ते म्हणाले कीं, चला बाबांच्या दर्शनाला. काय आश्चर्य ! माझा हात धरून ते थेट मला श्री बाबांकडे घेऊन गेले. बाबा विश्रांतीसाठीं उजव्या कुशीवर लवंडले होते. बाबांची व माझी दृष्टादृष्ट झाली. आणि आश्चर्य हें कीं बाबा जे उठले ते पद्मासन घालून आपला डावा हात उजव्या हातानें चोळत चोळत माझ्याकडे हंसत हंसत पाहूं लागले. स्वप्नांत ज्या अवस्थेंत मी श्री बाबांना पाहिलें तीच अवस्था पाहून मला भरून आलें. मी कितीतरी वेळ श्री बाबांच्या पायाजवळ बसलों होतों. माझें कुशल विचारून उपदेशाचे दोन शब्द सांगून मला बाबांनीं निरोप दिला. 'सद्भावना ठेव,' इतकेंच बाबा बोलले. मौनी साधु न बोलतांच कार्य करीत असतो याची अनुभूति मी परत जातांना श्री बाबांकडून घेऊन जात होतों. परतत असतांना आदले दिवशींच्या खिन्नपणाची माझी मलाच लाज वाटत होती. केवळ बाबांच्या दृष्टिक्षेपानें मनाची विस्कटूं पाहाणारी घडी स्थिर राहावी यापेक्षां आणखी समाधान तें काय असूं शकेल ?'

३७ × × × एक बुद्धिवादी भक्त. 'देवाचा अनुभव आणून देणारें पवित्र नाम सद्गुरूकडून मिळाल्याशिवाय सर्व फुकट आहे याची बोचणी वारंवार लागून राहिली. श्री बाबांनीं दिलेल्या अनुभवांनीं माझी श्रद्धा जरी दृढ होत गेली तरी त्यांच्या मुखानें गुरुमंत्र मिळाल्याशिवाय सर्व कांहीं वायां आहे याची जाणीव येऊन मला कित्येक दिवस मानसिक त्रास होत होता. वस्तुतः मी विठ्ठलभक्त आणि रामकृष्णहरि हा श्री तुकाराम-महाराजांना देवाचा अनुभव आणून देणारा दिव्य मंत्र कित्येक वर्षें प्रेमानें म्हणत होतों परंतु अनुभव असा कांहीं नव्हता. पुरंदरदास ज्याला दिव्य नाम म्हणतो अशा गुरुमुखांतून मिळालेल्या नामाशिवाय आपण आध्यात्मिक वाटचाल कशी चालावी याची मनाला एकसारखी चिंता लागून राहिली. मनाच्या या अवस्थेंत असतांना एके दिवशीं पहांटेस श्री बाबा स्वप्नांत आले व मला ऊठ ऊठ असें म्हणूं लागले. माझ्या कानाकडे आपलें तोंड वळवून ॐ ॐ ॐ असें तीन वेळां उच्चारून मला एक नवीनच मंत्र दिला. वस्तुतः मी विठ्ठलभक्त असूनहि त्या मंत्रामध्यें अधिष्ठात्री देवतेंत विठ्ठलाबरोबर श्री शंकराचाहि समावेश केला होता. आश्चर्य हें कीं सकाळीं मला जाग आली ती सुद्धां तो मंत्र उच्चारीत असतांनाच. माझें सारें अंग शहारलें होतें. कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीं श्री बाबांना भेटण्यास निघालों. ईश्वरी कृपेनें त्या दिवशीं अगदीं सकाळींच मला दर्शन घडलें. श्री बाबांची व माझी नजरानजर झाली. श्री बाबांनीं हसून हातानें सत्य आहे म्हणून सुचविलें. मी घरीं परतलों. मंत्र उच्चारीत असतांना या मंत्राविषयीं मला इतकी जवळीक वाटूं लागली कीं, एक सुप्त स्मृति जागृत होत असल्याचा मला अनुभव येऊं लागला. मी हा मंत्र केव्हां तरी उच्चारीत होतों अशी सुप्त आठवण उलगडूं लागली. माझ्या मानसद्रव्यांत या मंत्रानें जी एक चेतना निर्माण करून मला ज्या अनुभवांचें दर्शन घडवून दिलें आहे त्यापासून मिळणारा आनंद मी कोणत्या शब्दांत वर्णावा? मानियेला

स्वप्नीं गुरूचा उपदेश । विश्वास धरिला दृढ नामी ॥ या न्यायानें दृढ श्रद्धेनें मी त्या नामाचें मानसिक उच्चारण करूं लागल्यापासून माझ्या मानसिक जीवनांत अपूर्व क्रांति झाली आहे एवढें खरें. कुठेंहि असो, त्या नामाचें मानसिक उच्चारण इतकें व्यवस्थित सुरू असतें कीं मनाला आपला जुना जोडीदार मिळाला व तो या सद्गुरूनें प्राप्त करून दिला, या लीलेनें अंतःकरण भरून अष्ट सात्विकभाव कित्येक वेळां दाटूनहि येतात. विशेष काय सांगावें ?'

॥ भक्तिगीतें ॥

भज नित्यानंदम् ॥ सततम् ॥ ध्रु० ॥
शांतं दांतं निरीहमनघम् ॥
मुनिमात्मारामम् ॥ १ ॥
त्रितापशमनं कलिमलहरणम्
परमानंदकरम् ॥ २ ॥
करुणाकारं कल्याणकरम् ॥
पातकपुंजहरम् ॥ ३ ॥
यत्स्मरणं यद्भजनं सत्यम् ।
सुखसंतोषकरम् ॥ ४ ॥
योगेश्वर गुरुरूपं गेयम्
निर्जन कृतवासम् ॥ ५ ॥
रामेऽस्तु कृपा ते समदृष्टे ।
उद्धर दीनजनम् ॥ ६ ॥

नित्यानंदपदीं ॥ रम तूं ॥ ध्रु० ॥
निर्मल निश्चल केवळ चिद्घन ।
ब्रह्मात्मा उदधी ॥ १ ॥
मन बुद्धीपर हृदयस्थातें
विसरुं नकोस कधीं ॥ २ ॥

तनु भावातें त्यागुनि धरि बा
सोऽहं शिवबुद्धी ॥ ३ ॥
सोडुनी मी ममतादि विकारा
स्मर चित्तीं आधीं ॥ ४ ॥
आत्माराम सुमंगलदाता ।
हरि आधि-व्याधी ॥ ५ ॥

शुद्ध केवलात्मा तोचि नित्यानंद । जेथें विषयछंद लेश नाहीं ॥ १ ॥
नाहीं देहभाव जाणीव नेणीव । स्वसुख वैभव दुजेवीण ॥ २ ॥
आत्म्याशीं रमणें, बोलणें, पाहणें । अनुभूती घेणें ऐक्यरूपें ॥ ३ ॥
मौनाचेंही मौन, ध्यानाचेंही ध्यान । मनाचें उन्मन ब्रह्मरूप ॥ ४ ॥
सीतापती राम योग सुखधाम । तोचि पूर्णकाम सदोदित ॥ ५ ॥

अहर्निश भावें भजा नित्यानंदा । सोडोनिया मदा कामादिका ।
संसाराचें सुख अनित्य मायिक । देई दुःख शोक अंतीं जीवा ।
नको नको मना गुंतूं या संसारीं । मिळे क्षणभरी विसावा ना ।
म्हणोनी श्रीराम सर्वदा स्मरावा । भावें आळवावा सीतापती ।

अनुष्टुभ् वृत्तम् श्लोक

नित्यानंदं महात्मानं गणेशपुरवासिनम् । ब्रह्मनिष्ठं सदा तुष्टं पुष्टं पूर्णं परं भजेत् ॥ १ ॥ इति शम्—

# (१) गुरुभक्ति

भक्ति म्हणजे प्रेम. आत्म्यावरील जो आत्यंतिक जिव्हाळ्याचा संबंध तोच आपल्या श्रीगुरूवर असणें, ह्यालाच भक्ति समजली गेली आहे. ही भक्ति प्रेमस्वरूप आहे. योग कर्मादि साधनावांचून, इच्छारहित, अनन्य भावानें चित्तवृत्ति श्रीगुरुचरणीं लागणें, इहलौकिक व पारलौकिक सुखाचेंच काय, मोक्षसुखापासून चित्तानें तोंड फिरवून आपल्या परमप्रिय श्रीगुरुचरणीं जाऊन बसणें, ममता आणि जगतांतील सर्व पदार्थांवरील आसक्तीपासून निवृत्त होऊन, चित्त प्रेमभरानें श्रीगुरुचरणीं लीन होणें अशा स्थितीला अनन्य प्रेम भक्ति मानलें गेलें आहे.

ही जिव्हाळ्याची भक्ति अमृतस्वरूप आहे. श्रीगुरूशीं जिव्हाळ्याचा संबंध जोडणें हेंच अमृत. श्रीगुरूवरील अनुरक्ति प्रेम, अमृतालाहि गोडी आणणारें आहे. ह्या प्रेमामृताचा वाटेकरी अमर होय.

लौकिक वासना म्हणजेच मरण. अनन्य भक्ताच्या हृदयांत श्री गुरूच्या शुद्ध प्रेमाशिवाय इतर वासनेला जागा नाहीं. त्याची एकच वासना—श्रीनित्यानंद. त्या भक्ताच्या दृष्टीचें देखणें—श्रीनित्यानंद, कानाचें ऐकणें—श्रीनित्यानंद, तोंडाचें बोलणें—श्रीनित्यानंद, देणें घेणें एवढेंच काय, एकूण सर्व वासना श्रीगुरुचरण—नित्यानंदाव्यतिरिक्त नाहींत अशा दुर्मिळ परमानंदमय, मुनिजनांच्या चित्ताला मोहिनी पाडणाऱ्या वासनेच्या हृदयावर, तो भक्त जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मुक्त होत असतो. त्या भक्ताचें हृदय श्रीगुरुदेवाचें मंदिर. प्रेमळ भक्त आणि श्रीगुरूशीं प्रेमानें मोहरलेली अनन्यता अमर आहे. हीच परा, उच्च व गोड भक्ति.

ज्या भक्तानें वरीलप्रमाणें गुरुप्रेमामृताचें सेवन केलें, तो महान सिद्ध आहे. अणिमादि सिद्धि प्राप्त करून चमत्कारांचें थोतांड माजविणारा सिद्ध नव्हे. परम प्रेमळ भक्त मोक्ष प्राप्त करून देणाऱ्या सिद्धीचीहि फिकीर करीत नाहीं. कारण सर्वांचें मूळ शुद्धस्वरूप व सर्वत्र भरून असलेल्या स्वरूपाची प्राप्ति असल्यामुळें, क्षुद्र व विनाशी सिद्धीची त्याला नावडच असते. कारण तो पूर्णानंद पिऊन तृप्त झालेला असतो. तो भक्त गुरुभक्तीनें पुष्ट होऊन, देवादिकांना दुर्लभ असणाऱ्या ब्रह्मानंदाप्रत—पूर्णानंदाप्रत—पावून संत राहतो. त्यामुळें त्याची सर्व इच्छा नष्ट झालेली असते. जगांतील लोक, भोगी, त्यागी लालचावून आपआपल्या रुचीप्रमाणें, जगांतील प्रेम, ऐश्वर्य, सौंदर्य, माधुर्य, बल, यश, ज्ञान व वैराग्य प्राप्त करून आनंद मानतात. पण हा आनंद आत्मानंदापुढें किती क्षुद्र ! तिन्ही लोकांतील पदार्थांची प्राप्ति, परमानंद नित्यानंद प्रेमाच्या समुद्रांतील एका बिंदूशींहि बरोबरी करूं शकणार नाहीं.

भगवान नित्यानंद ज्या प्रेमाच्या आकर्षणानें भक्तांच्या हृदयांत आनंदामृतानें भरून राहातात, त्या प्रेमाची किंमत काय करावी? तो भक्त आठहि प्रहर आनंदाच्या मस्तींत तल्लीन राहतो. असा भक्त गुरु-कृपा–प्रेमाचे साधनांत तल्लीन असतां, जरी मोक्षप्राप्तीच साधन राहून गेलें तरी त्यास शोक वाटत नाहीं. त्यास जाणीव एकच असते कीं आपलें प्रेम वृद्धिंगत राहावें.

ज्या भक्ताला गुरुकृपामृताची प्राप्ति झाली त्याचे सर्व संशय फिटून गेले. तो सर्व विश्व आपल्या गुरुदेवाची लीला समजून संशयरहित असतो. त्याला ज्या ज्या ठिकाणीं जाण्याची मनीषा होते तेथें तो जाऊं शकतो. त्याला सर्व जग आपल्या प्रिय गुरुदेवाच्या रूपांनीं पूर्ण भरून असल्याची अनुभूति येत असते. अशी जगांत कुठली वस्तु आहे कीं जींत गुरुदेवरूपाची व्यापकता नाहीं? अशी कुठली जागा आहे कीं

जेथें गुरुदेवाचें अस्तित्व नाहीं? कारण प्रकृति आणि पुरुष यांचें उगमस्थानहि गुरुदेव आहेत. तो भक्त सारें विश्व गुरुमय जाणतो. सर्व विश्वाचा मूळ आधार चैतन्यघन गुरुदेव आत्मा आहे. वेदाला ज्याचें वर्णन करतां करतां थकून, शेवटीं नेति–नेति, बोलण्याची पाळी आली तो 'ओंकार' शब्दाच्या साडेतीन मात्रांच्या पलीकडे असून नामरूपाचें मूळ आहे. त्याच्या पोटीं सर्व विश्व सामावलें आहे. हें गूढ, अक्षय अविनाशी तत्त्व श्रीगुरुदेव, आपण आहांत. आपणच सर्व धर्मीचें मूळ असून, सहज व अविकारी आहांत. सर्व विश्वाचें नियमन करणारें छत्तीस तत्त्वांच्या पलीकडचें सदतिसावें तत्त्व आपण असून सारीं छत्तीस तत्त्वरूपें पण आहांत.

ह्या साऱ्या संसाराचें मूळ आपले गुरुदेव आहेत असें समजून गुरुभक्त आपला सारा संसार गुरुमय बनवितो. पाण्यापासून वेगळ्या दिसणाऱ्या लाटा अभिन्न—पाणीच असतें. त्याचप्रमाणें जगामध्यें अशी एकहि वस्तु नाहीं कीं जी गुरुदेवावांचून निराळी आहे व ज्या ठिकाणीं गुरुदेवाचें अस्तित्व नाहीं. अशा विश्वव्यापी गुरुदेव स्वरूपाला जाणणारा भक्त कोठेंहि राहून गुरुभक्ति करूं शकतो व अंतःकरणांतील प्रेमभावनांनीं भजन करतो. असा भक्त, देश, काल वर्तमानालाहि गुरुस्वरूपापासून भिन्न समजत नाहीं. ज्याप्रमाणें वायु आकाशरूप बनून आकाशांतच संचार करतो, तद्वत् भक्त जगद्रूपाला गुरुदेवमय अंतरांत बाणवून, आपल्या ज्ञानानें तिन्ही लोकीं आनंदानें राहतो. पण एवढें निश्चित कीं यच्चयावत् भूतमात्रामध्यें दृष्टिगोचर असणारें गुरुदेवस्वरूप समजणें हीच खरी भक्ति आहे.

श्रीगुरुदेवकृपाप्रेमाचा हृदयांतील प्रभातकाल भक्ताला वेडा बनवितो. प्रेमळ भक्त गुरुप्रेमाच्या मदामध्यें धुंद राहून अखंड दिवस आणि रात्र श्रीगुरूचें गुणगान करीत असतो. श्रीगुरूचेंच नाम ऐकणें व त्याचेंच चिंतन करणें हें त्याला एक व्यसनच लागून राहातें. ज्याप्रमाणें एखादा

वेडा मनाला वाटेल तें करतो व बडबडतो, त्याप्रमाणें तो भक्त गुरुप्रेमानें मत्त होऊन गुरुप्रणीत ज्ञानाच्या चर्चेंत तल्लीन असतो. गुरुमूर्तीवरील असणाऱ्या जिव्हाळ्याच्या प्रेमानें, भक्त अंतरांत हळवा बनतो. मग उन्मादानें व अलौकिक सात्त्विक भावांनीं युक्त होऊन तो एखाद्या पिसाटासारखा कधींकधीं पोट धरधरून हंसतो, कधीं रडतो, कधीं धांवत सुटतो, कधीं उंच स्वरानें गाणें गात राहतो, तर कधीं नाचण्यांत दंग असतो.

अशा उन्मत्त भावदशेमध्यें नाचतां नाचतांच गुरुस्वरूप बनून जातो. अशा अवस्थेप्रत पोहोंचल्यावर त्याचें शरीर व चित्त, स्तब्ध व शांत होतें. अशा भक्ताचें जीवन आनंदमय बनून कृतकृत्य होतें. ह्यालाच आत्माराम म्हणतात. अशा स्थितीमध्यें राग, द्वेष, माझें, तुझें, लहान, मोठा, हा भेदभाव राहात नाहीं.

अशी गुरुमय स्थिति प्राप्त झाल्यावर त्याचें द्वैत ज्ञान मावळतें. हेंच अद्वैत प्रेम गुरुभावामध्यें मिळाल्यावर प्रेमळ भक्ताचें निराळें अस्तित्व नष्ट होतें. अशी अवस्था प्राप्त करून देणारी प्रेमस्थिति त्यागस्वरूप आहे. मग अशा भक्तीमध्यें धन, पुत्र, दारा व स्वर्गादि सुखोपभोग मिळविण्याची गोष्टच राहो, फार काय, मोक्ष मिळविण्याचीहि इच्छा नसून, ह्या भक्तीचा मोबदला म्हणून कांहीं प्राप्त करून घेण्याची आकांक्षा सुद्धां शिल्लक राहात नाहीं. ही भक्ति जर इच्छाहेतूनें युक्त असेल तर तो एक सार्थ व्यापार आहे.

"ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते ।
आद्यन्तवन्तः कौन्तेय न तेषु रमते बुधः ॥"

अर्थ : कारण अर्जुना, इंद्रिय–विषयाच्या संयोगानें जे सुखोपभोग प्राप्त होत असतात, ते उत्पत्ति व विनाश पावणारे (अतएव) दुःख-परिणामी असल्यामुळें, त्या (अनित्य) सुखोपभोगांत ज्ञानी पुरुष रमत नाहीं.

वास्तविक इंद्रियद्वारें मिळणारें सुख, सुख नसून तें दुःखच आहे. ज्यानें श्रीगुरूचें प्रेमामृत मिळविलें, तोच खरा सुखी व ज्याला तें मिळालें नाहीं तो विषयसुखाच्या फेऱ्यांत अडकून पडला. जास्त क्षुधेनें प्रक्षुब्ध झालेला मनुष्य तूस अगर धान्याचा कोंडा खातो किंवा तहानेनें व्याकुळ झालेला रेताड जमिनीलाच पाणी समजून वाळूंत शहामृगाप्रमाणें तोंड खुपसतो, तसेंच ज्यानें श्रीगुरुप्रेमदर्शन घेतलें नाहीं त्यानें आत्मसुख गमावून दरिद्रताच मिळविली. त्याला विषय-सुखांत, रागद्वेषांत व मोहांत आवड वाटते. जो ज्ञानी श्रीगुरूच्या नामस्मरणानें देहाचे सर्व विकार शुद्ध करतो, त्याचे रागद्वेषादि विकार पूर्ण नाश पावतात. ज्या भक्ताच्या हृदयांत परमानंद, परब्रह्म पूर्ण रूपानें विराजमान आहेत तेथें रागद्वेषादि भावाला जागा कोठली असणार ? श्रीनित्यानंद–आनंदाचा अंतरांत उपभोग घेत असतां ती तन्मय अवस्था अहंकाराला पळवून लावते. त्या गुरु-प्रेम-रसाच्या तन्मयतेंत जीवात्मा त्यांना गाढ आलिंगन देतो. त्या क्षणींच तो गुरुदेव नित्यानंदाबरोबर एकरूप होतो—जसें पाणी पाण्यामध्यें एकरूप होतें, अगर वायु आकाशांत मिळाल्यावर एकरूप होऊन जातो. वायु आणि आकाश निराळेपणानें रहात नाहींत. द्वैत उरत नाहीं, भक्त आणि गुरुदेव एकरूप झाल्यावर सारे भेदभाव व विषमता नष्ट होतात व त्याचें स्वरूप केवळ नित्यानंद बनतें. याप्रमाणें भेदभावाचा अंत झाल्यावर अखंड परमानंद शिल्लक राहतो. मग दृष्टीला तो आनंदाची मूर्तीच दिसूं लागतो.

प्रेमांत त्याग सहजच सिद्ध आहे. कारण जीव परमानंदस्वरूप परम प्रेमरूप परब्रह्माचा चिद्अंश आहे. पण जीव विषयांबरोबर वाहून प्रेमधारा दूषित करतो. त्या दूषित प्रेमानें तो दुःखी होऊन काम-रूपामध्यें जखडून पडून राहतो. तो (जीव) परमात्म–स्वरूपाचा दिव्य प्रकाश अंतरतो म्हणून जीवाची विषयाभिमुख झालेली गति पालटून, ती आत्माभिमुख करण्याकरितां आनंदमय परम प्रेमरूप दिव्य

स्वरूप नित्यानंद प्रकाशाची आवश्यकता आहे. ज्याची मनाला गोडी लावावी तेथें तें चिकटून राहातें. हा मनाचा स्वभावच. जें मन विषया-मध्यें बुडून राहिलें, तें विषयांतून निघाल्याशिवाय नित्यानंद प्रेम-सागराला कसें जाऊन मिळावें! अमृताची गोडी चाखल्यावर विषय-सुखाची इच्छा कोण करणार?

प्रेमाचा उदय होण्याकरितां भजन हें एकमेव साधन आहे. अखंड गुरुनामाच्या भजनचिंतनानें गुरुप्रेमामृत मिळतें. भजन हें साध्य व साधन दोन्ही आहे. जो श्रीगुरुप्रेमामृत प्राप्ति करून घेतो, त्याचें भजन स्वाभाविक, अखंड आहे. ज्याला श्रीगुरुप्रेमाची प्राप्ति करून घेणें आहे, त्यानें अखंड गुरुनामस्मरण करण्याचा अभ्यास करणें अवश्य आहे. जो साधक सगुण भजन आणि त्याग केल्याशिवाय मुक्तीची इच्छा करतो तो मोठी चूक करीत असून, स्वतःला फसवीत असतो. दीर्घकाल-पर्यंत सतत श्रीगुरूचें ध्यान व नामस्मरण प्रेमानें व आदरानें केल्यावर प्रेमरूप भक्तीचा उदय होतो. म्हणून ह्या साधनांनीं साध्य संपत्ति प्राप्त करून घेण्याची अत्यंत जरुरी आहे.

प्रेमभक्तीच्या साधकानें दुःसंगतीपासून नेहमीं दूर रहावें. दुःसंगतीमुळें आसुरी संपत्तीच्या दुर्गुणांकडे व दुराचारांकडे मन ओढलें जातें. दुःसंग-तीमुळें मनुष्यांतील सद्गुणांचा नाश होऊन, त्याचा सर्वस्वीं नाश होतो.

मन्थरेच्या कुसंगतीमुळें प्रेमळ, सुशील, देवी कैकयी, महाराजा दशरथ, भरत व अयोध्यावासी प्रजाजन यांच्या :दुःखाला व शोकाला कारण झाली. पण शेवटीं तिलाच वैधव्यदुःख सहन करावें लागलें. प्राणप्रिय पुत्र भरताचें प्रेम गमवावें लागलें. महाभारतांतील भयंकर हत्याकांड शकुनीच्या दुःसंगतीचें कारण नव्हे काय?

म्हणून सुखाची इच्छा करणाऱ्या मनुष्यानें दुराचार व दुर्गुण यांपासून दूर राहणें उत्तम.

परमात्मा, प्रेम, आनंद, आत्यंतिक सुख, ब्रह्मानंद व नित्यानंद हीं चित्‌ब्रह्माची एक एक नांवें आहेत. वाणीनें ब्रह्माचें वर्णन करणें अशक्य आहे. वेददेखील ब्रह्माचें वर्णन करतां करतां थकून, नेति-नेति म्हणून गप्प बसले. तसेंच श्रीगुरुप्रेमामृताचें वर्णन वाचेला करणें अशक्य आहे. संसारांत प्रत्येकाच्या अनुभवास येणारी गोष्ट आहे कीं, प्रिय वस्तु मिळाल्यावर, एखादी स्वतःविषयीं चांगली बातमी ऐकल्यावर किंवा मधुर गायन ऐकल्यावर, हृदयांत आनंदाचा अनुभव येतो. पण त्याचें वर्णन बोलून दाखवितां येत नाहीं. ज्या प्रेमाचें वाणीनें वर्णन करतां येतें तें प्रेमाचें बाह्यरूप आहे. प्रेम अनुभवसिद्ध आहे. ज्यानें प्रेमसागरांत बुडी मारली, तो प्रेमाचा कांहीं अनुभव सांगूं शकत नाहीं. जसा मुका गूळ खाल्यावर प्रसन्न दिसतो व हंसतो, पण गुळाचा स्वाद सांगूं शकत नाहीं. कारण त्या प्रेमाची गोडी बोलून दाखविण्यास भाषाच नाहीं. जेव्हां हृदयांत परमानंद भरून राहतो तेव्हां सारें ज्ञान पळून जातें आणि स्वतः मूक बनतो. हें प्रेम गुणरहित, कामनारहित, प्रत्येक क्षणाला वाढणारें, सूक्ष्मापेक्षांहि सूक्ष्म, अनुभवरूप आहे. हें प्रेम हृदयाच्या खोल गुहेंत राहणारा चिदात्मा श्रीगुरुनाथहि आहे.

हें प्रेम अत्यंत आनंदमय आहे. अशा उच्च प्रेमाच्या दिव्य रसामध्यें बुडी घेऊन, प्रेमानंदमय बनलेला प्रेमी सर्वत्र आपल्या प्रेममय, आनंदमय, सर्वव्यापी श्रीगुरुदेवाला पाहतो. ह्याव्यतिरिक्त दुसरी इतर वस्तूच त्याला दिसत नाहीं.

त्याचें सबंध शरीर केवळ त्याच रूपाचा अनुभव घेतें. त्याचीं सर्व इंद्रियें त्याच रूपाचा विषय घेऊन राहतात. डोळे सदोदित संपूर्ण विश्वाला नित्यानंदमय पाहतात. कान सदा मधुरापेक्षां मधुर असा '**ॐ नमो भगवते नित्यानंदाय**', महामंत्र श्रवण करतात. जीभ एकरूपानें या गुरुनाममंत्राचा रस चाखत राहते. आणि शरीर सर्वत्र ह्या रसमय, प्रेममय नित्यानंदाचा अनुभव घेत राहातें. वायूमध्यें

असणारा स्पर्श, अग्नीमधील ज्योति, पाण्यामधील प्राणवायु आणि पृथ्वीमधील गंध केवल नित्यानंदच आहेत. सर्व ठिकाणीं भिन्न भिन्न रूप धारण करून नित्यानंदस्वरूपच दाखवीत आहेत. सर्वत्र हें प्रेम, आनंदहि आनंद समस्त विश्व प्रेममय, आनंदमय, श्रीनित्यानंदमय दाखवीत आहे. सर्वस्त्रीं आनंदानें, सौंदर्यानें, माधुर्यानें भारावून गेलेले भक्त आणि देव, मधुर आहे. दृश्य आणि द्रष्टा प्रेममय आहे. मी तूं सर्व आनंदमय. आनंदमय, रसमय गुरुनाथाची व्यापकता सर्वस्त्रीं मधुर आहे.

असा प्रेमळ भक्त अशा अवस्थेमध्यें, महान दिव्य प्रेमामृतामध्यें गढून राहतो. अशी स्थिति प्राप्त झाल्यावर, तो अनिर्वचनीय आहे. हें प्रेम भक्ति अथवा पराभक्तीचें स्वरूप आहे. हेंच महान् ब्रह्म आहे. हाच आनंद आहे, हीच सर्व आनंदाची परमावधि. यापलीकडे कांहीं नाहीं, कांहीं नाहीं. हेंहि नित्यानंद आहे. ते सध्यां चिन्मय शरीर धारण करून श्री गणेशपुरी येथें लीला दाखवून, खेळ खेळून आहेत. अनेक नर, नारी, यती, मुनी, लहान, मोठे, पुण्यात्मे, पतित, सुखी, दुःखी, आणि इतर सर्व प्रफुल्लित मनानें त्यांचें दर्शन घेऊन स्वतःस धन्य मानून घेत आहेत.

बोला! **पतितपावन श्रीसद्गुरु नित्यानंदस्वामीमहाराज की जय!**

अहो परमपूज्य श्रीगुरुदेव, आपण सर्व विश्व आहांत, विश्वात्मा आहांत आणि विश्वाच्या अतीत आहांत!

चराचर विश्व आपल्यांनीं पूर्ण आहे....!

(प. पू. श्री मुक्तानंद स्वामीकृत 'गुरुदर्शन' (हिंदी) या पुस्तकाचा मराठी अनुवाद.)

## २. नामजप

लेखकाचें श्री मुक्तानंद स्वामींशीं 'नामजपाचें महत्त्व' यासंबंधीं संभाषण.

**मी** : स्वामीजी, आपण वेळोवेळीं जे विचार व्यक्त करतां ते मौलिक असतात. त्या विचारांचा संग्रह करून ठेवावासा वाटतो.

**स्वामी** : (हंसत हंसत) विचार समुद्रउल्हसित असतात. सागरावर अनेक तरंग, अनेक लाटा क्षणाक्षणाला उठातात. त्यांतील कुठले तरंग अन् कुठल्या लाटा तुम्ही एकत्रित करणार ?

**मी** : तें खरं, परंतु जे विचारतरंग किंवा ज्या विचारलाटा स्मृतिरूपानें मनाला स्फूर्तिदायक आनंद देऊन आहेत तो आनंद टिकून राहाण्यासाठीं ते मला एकत्र करूं द्या.

**स्वामी** : माझी हरकत नाहीं.

**मी** : 'सार सार सार विठोबा नाम तुझें सार' असा नामाचा महिमा सारे संत मुक्तकंठानें गात आले आहेत. अशा नामांत इतकें काय सांठून राहिलें आहे कीं, जेणेंकरून तें देहाचेंहि सार म्हणून ओळखलें जावें ?

**स्वामी** : नामांत जगदीशाचा विलास आहे. ब्रह्मविलास आहे. नाम हें परमात्म्याचें पूर्णरूप आहे. शुद्धरूप आहे.

**मी** : हें कसें समजावें ?

**स्वामी** : नाम प्रत्यक्ष न जपतां हृदयांत स्फुरत आहे ही ओळख पटल्यावर.

**मी** : नाम हृदयांत स्फुरत आहे हें तरी कसें समजावें ?

**स्वामी** : साधा रोजच्या व्यवहारांतील दृष्टान्त घ्या. पहांटे प्रथम उठल्यावर मी (अहम्) म्हणून मगच उद्योगाला लागतां ना ? निर्विकार

अनुक्रमांक 39396 दि:

क्रमांक 9213 नों: दि:

स्थितींत 'अहम्' असा शब्दोच्चार करून नंतरच इतर सर्व कार्ये करतां ना?

**मी :** यापासून काय सुचविलें जातें?

**स्वामी :** प्राणापान, जें आंत चालू आहे, तोच स्वयमेव आंत होणारा जप. त्यांतील 'अहम्' हें निखळ सत्य, बाकी मी 'अमूक अमूक' हें मानीव आहे याची जाणीव असूं द्यावी. जो परमात्मा अणुरेणूंत भरून राहिला आहे तोच परमात्मा चैतन्यरूपानें प्रत्येकाच्या शरिरांत खेळत आहे. काया ही पंढरी। आत्मा हा विठ्ठल। नांदतो केवळ पांडुरंग.

**मी :** आपण म्हणतां कीं या परमात्मस्वरूपाची जाणीव असूं द्यावी. म्हणजे नेमकें काय करावें?

**स्वामी :** निर्विकल्प स्थितींत 'मी' (सोऽहम्) हा शब्द ज्या स्थानांतून उदित होतो किंवा स्फुरण पावत असतो तें निर्मितीचें स्थान म्हणजेच परमेश्वराचें वसतिस्थान.

**मी :** वास्तविक हें 'जुनें ठेवणें' प्रत्येकाजवळ असूनहि प्रत्येकजण केवळ पाषाणमूर्तींत देव पाहून भ्रमांत पडला आहे, असेंच नव्हे का?

**स्वामी :** मृगमद नाभिसी असतां नेणुनि भ्रमतां भ्रमतां मेलें रे। कस्तुरीचें गुप्तधन आपल्यांत असतांना त्याच्या शोधार्थ बाहेर पडणारा हरिण आणि अज्ञानानें अंतरात्म्याचा विसर पडलेला मानव या दोहोंत फरक कुठला?

**मी :** परब्रह्म आपल्यावांचून वेगळें नाहीं अशी वास्तविक परिस्थिति असतांना मानवाला हा भ्रम कां पडावा?

**स्वामी :** हा भ्रम किंवा मोह त्रिगुणांमुळें झाला असावा.

सत्त्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसंभवाः।
निबध्नंति महाबाहो देहे देहिनमव्ययम्॥

**मी :** हा भ्रम नाहींसा तरी कसा व्हावा?

**स्वामी :** वृत्ति निस्त्रैगुण्य झाली कीं.

**मी :** ती तशी होण्यासाठीं मानवानें काय करावें ?

**स्वामी :** त्यासाठींच माउलीनें 'तें नाम सोपें रे' दाखवून दिलें आहे.

**मी :** नामजपांत कांहीं प्रकार सांगितले आहेत काय ?

**स्वामी :** होय. स्थूलमानानें तीन प्रकार सांगतां येतील. जो केवळ मुखानें करावयाचा असा रसना अथवा वैखरी जप. जो मनानें करावयाचा असा सूक्ष्म मानसिक जप कीं जो उपांशु जप म्हणून ओळखला जातो. आणि यापेक्षांहि सूक्ष्मतर, सूक्ष्मतम असा अजपाजप कीं जो अहोरात्र आंत चालूच आहे. येकांती मौन्य धरून बैसे। सावध पहातां कैसें भासे। सोहं सोहं ऐसे शब्द होती।

**मी :** नामानें नामीचें अनुसंधान करण्यासाठीं जपांत हे प्रकार कां निर्माण करावेसे वाटले ?

**स्वामी :** पात्रतेमुळें हा फरक साधकाच्या बाबतींत करावा लागतो. एखादा इसम विमानानें प्रवास करतो तर दुसरा गाडीनें तर तिसरा पायींच करावयास निघतो. हा भेद अधिकारांत होत असतो. साधनेंत पात्रतेप्रमाणें भिन्नता ही करावीच लागते. अधिकार तैसा करूं उपदेश। साहे ओझें त्यास तैसें देऊं।

**मी :** हें मला समजलें. परंतु एक अडचण अशी विचाराबीशी वाटते कीं नाम हें मुळांतच स्वयंभू आहे तर मग तें कुठल्याहि प्रकारानें उच्चारीत राहिल्यानंतर परमात्मदर्शन कां होऊं नये ? यासाठीं गुरूची मदत अटळ कां ?

**स्वामी :** परमार्थसाधनेंत गुरूचें स्थान अनन्यसाधारण आहे.

**मी :** गुरूचे मुखांतून निघालेल्या बीजनामाला इतकें महत्त्व कां ?

**स्वामी :** गुरूशिवाय नाम देवाचा अनुभव आणून देण्यास असमर्थ ठरतें म्हणून. गुरूकडून मिळालेल्या नामाला सबीज म्हणतात कारण परमेश्वराचा अनुभव आणून देणारें बी त्या नामांत पेरलें गेलेलें असतें.

**मी :** गुरु आपल्या मुखानें साधकाला नाम देऊन काय करीत असतो ?

११५९६

**स्वामी** : सद्गुरु आत्मसाक्षात्कारी होऊन परमात्म्याच्या रूपांत संमिश्र झाला असल्यामुळें मंत्ररूपानें तो साधकांत प्रवेश करीत असतो. कर्णपथानें गुरु साधकाच्या लिंगदेहांत दिव्यशक्तीच्या स्फुलिंग टाकीत असतो. गुरूनें दिलेलें नाम अशा रीतीनें दिव्यशक्तीचें वाहक होऊन साधकाला साक्षात्कारपथावर घेऊन जात असतें.

**मी** : हें सर्व ठीक झालें. परंतु आजच्या जगांत भोळ्या साधकांना खरा गुरु सांपडावा कसा? कित्येक वेळां समाजांत येणाऱ्या दांभिक साधूंच्या किंवा बोकेसंन्याशांच्या प्रतिकूल अनुभवांमुळें गुरु करण्यास भाविक साधकाचें मन एकदम धजत नाहीं. परंतु गुरु मिळाल्याशिवाय मन निवतहि नाहीं. अशा परिस्थितींत खऱ्या गुरूची निवड कशी करावी?

**स्वामी** : आपण म्हणतां हें खरें आहे. मी एवढेंच म्हणेन कीं, गुरु सुकृताच्या चष्म्यांतून शोधला जाऊं शकतो किंवा साधन करीत असतां आपोआप भेटला जाऊं शकतो किंवा ज्याच्याकडे अनेक प्रामाणिक साधक जातात असा गुरु अनुभवानें प्राप्त होऊं शकतो.

**मी** : खऱ्या गुरूचीं थोडक्यांत लक्षणें सांगाल काय?

**स्वामी** : खरा गुरु लक्षणातीत आहे. शुद्ध लक्षण परमानंद. परमात्म्याच्या रूपांत संमिश्र झाल्याशिवाय गुरुत्व शोभून दिसत नाहीं. असा गुरु लक्षणांच्या पलीकडे असतो. निर्विकल्प स्थिति हेंच गुरूचें लक्षण आणि तेंच परमात्म्याचें लक्षण.

**मी** : आपण मघाशीं म्हणालांत कीं गुरु आपली शक्ति किंवा शक्तीचा एक अणु साधकांत टाकीत असतो. ही क्रिया नाममंत्राशिवायहि घडली जाऊं शकत असेल तर नाम घेण्याची आवश्यकता तरी कां राहावी? गुरूची नुसती कृपा असली म्हणजे झालें.

**स्वामी** : साधनानें जेव्हां शिष्यांत पात्रता निर्माण होते तेव्हांच गुरु शक्तिपात घडवून आणतो. त्याअगोदर ती शक्ति प्रवेशित करण्याचा आग्रह गुरु धरीत नाहीं.

**मी** : गुरुकृपा केव्हां होऊं शकते?

**स्वामी** : शिष्यांत पात्रता निर्माण होते तेव्हां.

**मी** : दृष्टांतानें गुरूचें रूप दाखवाल काय?

**स्वामी** : हो. गुरु हा कुंभकार आहे. भवरोगनिवारक वैद्य आहे किंवा पैलतीराला सुखरूप नेणारा नावाडी आहे.

**मी** : नामस्मरणाचे आपण जे तीन प्रकार सांगितलेत त्यांपैकीं श्रेष्ठ प्रकार कुठला?

**स्वामी** : मानसिक जप सर्वांत श्रेष्ठ.

**मी** : संत दादू, कबीर किंवा शरीफसाहेब या विणकरांचा अनुभव पहावयास गेलों तर असें दिसून येतें कीं श्वास हा नामाच्या विणकामांतील एक धागा मानला गेला आहे. म्हणजे श्वासोच्छ्वासांतील नामस्मरण त्यांच्या दृष्टीनें अधिक श्रेष्ठ ठरतें, नाहीं का?

**स्वामी** : दर मिनिटाला पंधरा या हिशेबानें आपण दिवसांतून २१,६०० वेळां श्वासोच्छ्वास करीत असतों. सांगावयाचा मुद्दा असा कीं जोंपर्यंत या शरीररूपी देवालयांत चैतन्य खेळत आहे तोंपर्यंत नामस्मरणाची धार संतत चालू राहावी हेंच या संतांना सांगावयाचें असल्यामुळें त्यासाटीं सतत नामोच्चार होण्यासाठीं श्वासाचें एक साधन दाखवून दिलें आहे इतकेंच.

**मी** : म्हणजे नामावांचून जाणारा श्वास मोफतच नव्हे का?

**स्वामी** : अलबत.

**मी** : श्वासोच्छ्वासांतून जरी नामस्मरणाची क्रिया चालू ठेवावयाची ठरली तरी त्या क्रियेंत जर प्रेमाचें अधिष्ठान नसेल तर त्या यांत्रिक क्रियेला पारमार्थिक मूल्य आहे काय?

**स्वामी** : या प्रश्नाच्या अनुषंगानें मला सांगावेसें वाटतें कीं तसें पाहावयास गेलों तर नामापेक्षां किंवा परमेश्वरापेक्षां भक्ताचा भावच अधिक श्रेष्ठ ठरतो. पडिलें वळण इंद्रियां सकळा। भाव तो निराळा नाहीं दुजा।

तुका म्हणे केली नेत्रीं ओळखण । तटस्थ तें ध्यान विटेवरी । या तुकोबांच्या अभंगांत इंद्रियांना पडलेलें वळण केवळ यांत्रिक नसून तें भावमिश्रित आहे हें लक्षांत घेण्यासारखें आहे. तात्पर्य, भावविरहित नामस्मरणाच्या यांत्रिक क्रियेला पारमार्थिक मूल्य कसें जोडतां येईल ?

**मी** : गुरूकडून मिळालेलें नाम अंतःकरणांत बाणून प्रेमभरानें उच्चारित राहिल्यामुळें साधकाला मूळ अनुभव कुठला येऊं शकतो ?

**स्वामी** : देवदेवतेचें अधिष्ठान असलेला गुरुमंत्राचा साधक प्रेमभरानें उच्चार करीत असतांना कालांतरानें तो देव किंवा ती देवता रूपाचा आकार घेऊन प्रकट होते.

**मी** : अशी अवस्था प्राप्त करून घेणारा साधक किती भाग्यशाली असला पाहिजे ?

**स्वामी** : कळकळीच्या आणि तळमळीच्या साधकांच्या जीवनांत असा प्रभातकाल उजाडावा अशी इच्छा असेल तर प्रत्येक साधकानें प्रेममिश्रित नामस्मरणाचें मानसिक उच्चारण सातत्यानें चालू ठेवावें हें उचितच नाहीं काय ?

**मी** : खरेंच स्वामीजी ! नामस्मरणासारखें परमेश्वराचा अनुभव आणून देणारें सोपें साधन संतांनीं दाखवून देऊन समाजावर केवढे उपकार केले आहेत ! खरेंच ! ज्ञानोबा म्हणतात त्याप्रमाणें गळितशिर हें कलेवर रे । उदकेंविण सरिता भयंकर रे । रवि-शशिविण अंबर तैसें । हरिविण जिणें असार रे । हरिभक्तीशिवाय सर्व जीवन फुकट आहे. आजच्या धांवपळीच्या जीवनांत केवळ नामस्मरणानें सुद्धां खरा साधक परमेश्वराला सगुण स्वरूपांत प्रकट करून घेऊं शकतो, हेंच आपल्या चर्चेचें सार. आणि असा 'सोनियाचा दिवस' साधकाला 'अमृतें' पहावयास मिळेल तो खरोखरीच आपण म्हणतां त्याप्रमाणें परमार्थाच्या वाटचालींतील प्रभातकाल....!

# ३. स्थितप्रज्ञ होऊं सगळे

जीवनाच्या वाटचालींत भेटणाऱ्या असंख्य सुखदुःखांना निर्भयपणें तोंड देण्यास गीतेनेंच मला शिकविलें. समग्र गीतेचा अर्थ मला समजूं शकला असें मी म्हणूं शकत नसलों तरी माझ्यापुरत्या जीवनांतील आचारविषयक अडचणी गीतेंतील एका भागाच्या द्वारें मी सोडवूं शकलों. तो भाग म्हणजेच दुसऱ्या अध्यायांतील स्थितप्रज्ञाचीं सांगितलेलीं लक्षणें. या श्लोकांत प्रसन्नतेनें जीवन जगण्याची जीवनकला दाखवून दिली आहे. स्थितप्रज्ञावरील एकूण श्लोक मिळून एक जणुं सार्वभौम प्रयोगच सांगितला आहे असें खुद्द महात्माजी सांगून गेले आहेत. तो कुणीहि करून पाहावा आणि जीवनाच्या वाटचालींत भेटणाऱ्या आचारविषयक अडचणी सोडवून घ्याव्यात. माझ्यापुरती तर हीं स्थितप्रज्ञाचीं लक्षणें आचार संहिताच होऊन राहिलीं आहेत. गुरुदेव नित्यानंदस्वामींच्या शब्दांत सांगावयाचें झालें तर ‘स्थिर बुद्धि हेंच शेवटीं गीतेचें सार.’ ही स्थिरबुद्धि या श्लोकांच्या आधारानें जरी प्राप्त होण्यासारखी असली तरी शेवटीं त्या श्लोकांतील अर्थ आत्मसात् करतांना त्या अर्थाची कड गुरुदेवांच्या कृपेनेंच गांठावयाची आहे. संसारी जीवांना हा आनंद लुटावयास मिळावा या सद्भावनेनें सामान्य जनांच्या बोलींत या मूळ संस्कृत श्लोकांचें भाषांतर केलें आहे. गुरुकृपेच्या सावलींत वाढत असतांना जो मला या श्लोकांचा अर्थ समजूं शकला त्यापासून मला प्राप्त झालेला नित्यानंद तुम्हांआम्हां सर्वांना मिळो हीच अनन्य भावना !

केशवा मला सांग स्थितप्रज्ञ कसा असे
कसा चाले कसा बोले तो कसा राहि सर्वदा ॥ १

* * *

पार्था सर्व तो टाकी कामना तो मनांतून ।
आत्म्यारूपीं असे तुष्ट स्थितप्रज्ञ खरा असे ॥ २

* * *

न तो दुःखांत उद्विग्न सुखाची त्या स्पृहा नसे ।
प्रीति क्रोध भयातीत स्थिरधी तो मुनी असे ॥ ३

* * *

नसे जयास स्नेहत्व शुभाशुभ तें प्राप्ततां ।
नसे पावे जयानंद विषादें स्थितप्रज्ञता ॥ ४

* * *

जसा कासव तो अंगें इंद्रियें सर्व ओढुनी
विषयांतुनी खेंचुनी घेई तो स्थितप्रज्ञ खरा असे ॥ ५

* * *

विषयें सोडुनी वागे वासना उरलीच ती
ती सुद्धां लोपली जेव्हां होई त्या ब्रह्मदर्शनें ॥ ६

* * *

कौंतेया ज्ञान पुरुषें तें केलिया बहु प्रयत्न हे ।
बलवत्तरी इंद्रियें ज्याचीं मनें खेंचूनि नेई ते ॥ ७

* * *

आवरोनि इंद्रियें ज्यानें युक्त होऊनि मत्पर ।
इंद्रियें जिंकिलीं ज्यानें तो स्थितप्रज्ञ खरा असे ॥ ८

* * *

विषयें चिंतितां असतां उगवे भोगवासना ।
वासना निर्मितां काम काम क्रोधास जन्मितां ।

* * *

क्रोधात् उद्‌भवे मोह मोहानें स्मृति लोपली ।
स्मृतिभ्रंशें होतसे नाश बुद्धिला तोचि ग्रासुनी ॥ ९

* * *

इंद्रियें होती वश ज्याला रागद्वेष जया नसे।
चरती असा जो पुरुष स्थितप्रज्ञ खरा असे॥ १०

* * *

प्रसादें होतसे ज्याच्या दुःखाचा नाश होतसे।
प्रसन्नहृदयें होता शीघ्रत्वें बुद्धिस्थिरता॥ ११

* * *

नसे बुद्धि अयुक्ताला अयुक्ता ध्यानही नसे।
ध्यानाविण नसे शांती अशांता कोठुनी सुख॥ १२

* * *

इंद्रियें भ्रमतां देई मनाला मोकळीकही।
वायुरेव खेंचुनी बुद्धि नौके नेई उदकीं जशी॥ १३

* * *

तस्मात् इंद्रियें ज्यानें काढिलीं विषयांतुनी।
आवरे इंद्रियें ऐसी त्याची प्रज्ञा स्थिरावली॥ १४

* * *

जिथें असे निशा लोकीं संयमी जागतो तिथें।
जागती लोक जेथेंही तेथें असे रात्र संयमी॥ १५

* * *

स्थितप्रज्ञ हा गीतेचा आदर्श पुरुषविशेष आहे असें विनोबाजी म्हणतात. स्थितप्रज्ञ या शब्दाची निर्मितीसुद्धां गीतेच्या पूर्वीं झालेल्या ग्रंथांत पाहावयास सांपडत नाहीं. मानवजातीसमोर परमेश्वरानें ठेवलेला स्थितप्रज्ञाचा आदर्श खुद्द परमेश्वरानें एकदम अर्जुनाला दाखवून दिला नाहीं. गीतेच्या दुसऱ्या अध्यायाच्या शेवटीं आत्मज्ञानाचें शास्त्र व शास्त्रानुसरण दाखवून दिलेली कला याची कल्पना अर्जुनाला दिल्यानंतरच भगवान् श्रीकृष्ण स्थितप्रज्ञाकडे वळले. किंबहुना भगवान् श्रीकृष्णांनीं अर्जुनाला सांख्यबुद्धीची ओळख पटवून दिल्यानंतर अर्जुनाच्याच तोंडून आलेल्या प्रश्नाला उत्तर म्हणून स्थितप्रज्ञलक्षणें ते

सांगून राहिले. गीतेच्या दुसऱ्या अध्यायांत सुरुवातीला सांख्ययोगाचें घडवून दिलेलें दर्शन व त्याला अनुसरून दाखवून दिलेली कला कीं जी आपण यापुढें अभ्यासावयाची आहे हें पाहिल्यानंतर शास्त्र (theory) आणि त्याचबरोबर कृति किंवा प्रात्यक्षिक (Practical) याचें शिक्षण अर्जुनाला भगवान् श्रीकृष्ण देऊन राहिले होते असें दिसतें. भगवान् श्रीकृष्णांनीं सांख्ययोगाला धरून सांगितलेली ही कला–कीं जी पुढील श्लोकांत सामावून राहिली आहे ती–मानवी जीवनाची अंतिम परिणति करून घेऊं इच्छिणाऱ्या प्रत्येक साधकाला उपकारी ठरावी अशीच आहे. आजच्या अस्थिरतेच्या वातावरणांत स्थितप्रज्ञाचीं हीं लक्षणें प्रत्येकानें आपल्यांत मुरविण्याचा प्रामाणिकपणें प्रयत्न केला तर मानवी मनाचें हें दिवसेंदिवस खुरटत जाणारें रोपटें केवळ तरारेल एवढेंच नव्हे तर तें फळाफुलांच्या रूपानें वर आल्यावांचून राहाणार नाहीं. अखिल मानवजातीला भगवान् श्रीकृष्णाचें युगानुयुगें मार्गदर्शन घडत राहावें म्हणूनच कीं काय अर्जुनाकडून भगवान् श्रीकृष्णांना प्रश्न केला, "बा परमेश्वरा, स्थितप्रज्ञ कसा असतो तें सांग बरं! तो चालतो कसा? तो बोलतो कसा? तो राहातो कसा?"

अर्जुनाच्या प्रश्नाला भगवान् श्रीकृष्णांनीं उत्तर दिलें.

अर्जुनाच्या प्रश्नांत कल्पिलेली 'समाधी' हटयोगी लावीत असलेली समाधी नव्हे हें लक्षांत घेण्यासारखें आहे. प्रश्नांत कल्पिलेली समाधी हटयोग्याच्या समाधीहून भिन्न स्वरूपाची आहे. हटयोग्याची समाधी ठराविक कालापुरती मर्यादित आहे. अशी कृत्रिम मर्यादा या समाधीला नाहीं. ही समाधी म्हणजे अंतःकरणाची समतोल वृत्ति या अर्थानें कल्पिलेली आहे. सुखदुःखाचा सोसाटयाचा वारा सुटला असतां ज्याचा चित्तरूपी दिवा अडोल राहातो अशी समतोल, अविचल वृत्ति धारण करणारा प्रश्नांत कल्पिलेली समाधी लावीत असतो. चित्ताच्या या अचल व शांत अवस्थेलाच समाधी म्हणून सार्थतेनें नांव दिलें आहे.

अर्जुनानें अशा रीतीनें विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देतांना भगवान् श्रीकृष्ण म्हणाले कीं, जो सर्व कामनांचा त्याग करून स्वस्वरूपीं आत्म्यांत संतुष्ट होऊन राहतो त्यालाच स्थितप्रज्ञ असें म्हणतात.

भगवान् श्रीकृष्णांच्या या उत्तरांत स्थितप्रज्ञाचीं दोन लक्षणें पाहावयास सांपडतात. पहिलें लक्षण निषेधक स्वरूपाचें असून दुसरें लक्षण विधायक स्वरूपाचें आहे. जणुं शेतांतील तण उपटून त्या ठिकाणीं भाताचें बीं पेरणें अशा दोन निषेधक व विधायक स्वरूपाच्या क्रिया त्यांत आल्या आहेत. मनांतील सर्व कामना वासना उपटून काढणें आणि त्या जागीं स्वस्वरूपीं मायेनें लोपलासा दिसलेल्या आत्मारामाची प्रतिष्ठापना करणें या लक्षणांनींच स्थितप्रज्ञाची ओळख पटत असते.

मनांतील सर्व कामनांचा त्याग हें निषेधात्मक लक्षण सांगण्याचें कारण असें कीं संकल्पविकल्पांनीं भरलेलें हें मन मनुष्याला निर्णयापासून दूर ठेवीत असल्यामुळें अशा मनाची परिशुद्ध तत्त्वाची ओळख पटण्यास व्हावी तेवढी मदत होऊं शकत नाहीं. स्थितप्रज्ञ यासाठींच बुद्धीला अनुसरून वागत असतो. रोजच्या व्यवहारांत आपले निर्णय अनेकदां मनाच्या लहरीवर घडून येत असलेले आपण पाहतों. बुद्धीनें घेतलेल्या निर्णयाचें पालन करणें हें मनाचें कार्य उलट गतीनें म्हणजे मनानें घेतलेल्या निर्णयाचें पालन बुद्धीकडून व्हावें अशा पद्धतीनें होऊं लागल्यानंतर वर कल्पिलेली चित्ताची समतोलता विघडावयाचीच. तात्पर्य, मनाच्या या वृत्तीमुळें हाडामांसाच्या आंत दडलेला परमेश्वर—चिरंतन तत्त्वाचा दिवा—विसदृश (develops into unlikeness) वनत असतो. व्यक्तिवैशिष्ट्यांची (individualised) भावना हळूहळू आपल्याभोंवतीं धारण करीत असतो. मनाच्या पाशांत अशा रीतीनें अडकल्यानंतर आपलें मूळचें परिशुद्ध स्वरूप तो विसरत असतो. (It cannot find out its original pure state of Being) मनाच्या लहरींप्रमाणें (Vagaries of the mind) ज्याचें वर्तन होऊन

असतें त्याच्या चित्तांतील समतोलपणा केव्हांच नाहींसा होऊन राहिलेला असतो. चित्तांतील साम्यता जिथें विघडली आहे तिथें त्या मनुष्याला हिमालयांत नेऊन ठेवा किंवा आणखी कुठेंहि ठेवा, त्याची एकाग्रता तरी कुठून होणार? भगवान् यासाठींच म्हणतात कीं, मनाला विश्वासांत न घेतां प्रथम मनोनाश म्हणजेच बुद्धीला अनुसरून वागण्याची मनाला संवय लावा आणि अशा रीतीनें हें हट्टी मन हळूहळू बुद्धींत मुरवूं लागा. मनाची हट्टी वृत्ति सर्व कामनांचा मनांतून त्याग करून मोडल्यानंतर आत्मदर्शनासाठीं वाहेरच्या देखाव्यापेक्षां आंतला देखावा पाहाण्यास बद्धपरिकर व्हा. हट्टी मुलाच्या हातांत नको असणारी वस्तु असेल तर ती एकदम काढून घेतल्यानंतर तें अधिकच ओरडत राहाणार तेव्हां हातांत तर ती वस्तु राहणार नाहीं आणि तें ओरडणारहि नाहीं यासाठीं एखादा मार्ग शोधून काढलाच पाहिजे. यासाठींच त्या वस्तूच्या ठिकाणीं बाहुली दिली कीं हळूहळू त्या बाहुलीकडे लक्ष जाऊन नको असणारी वस्तु आपोआपच हातांतून गळून पडावयाची. निषेधक आणि विधायक क्रियांची किमया यांतच सांठून राहिली आहे. यासाठींच भक्तियोगानें स्वीकारलेली आत्मचिंतनाची विशुद्ध प्रक्रिया आत्म्यांत कसें संतुष्ट होऊन राहावें हें शिकवून राहिली आहे.

श्रीकृष्ण भगवान म्हणतात, दुःख प्राप्त झालें असतां उद्वेग वाटूं देऊं नकोस. तसेंच सुख प्राप्त झालें असतां त्याविषयीं हौसहि बाळगूं नकोस. दुःखाची आठवणसुद्धां येऊं नये म्हणून सामान्य मनुष्य नाना तऱ्हेच्या युक्त्या आणि क्लृप्त्या करून राहिला आहे. दुःख हें केव्हांतरी भेटावयाचेंच याची त्याच्या मनाला उपजतच असलेली जाणीव तो अन्य मार्गानें बुजवूं पाहात असतो. आणि यामुळें जेव्हां दुःख प्रत्यक्ष त्याच्या पुढ्यांत येऊन उभें राहातें तेव्हां त्याची गाळण उडते. या उलट ज्या सुखासाठीं तो धडपडत असतो तें सुख त्याला मिळाल्यानंतर तो आनंदी झाल्यासारखा वाटत असतो. वारांगने-

प्रमाणें मनाला भुरळ पाडणारें सुख शेवटीं दुःखाला कारणीभूत होणार याची त्याला नीटशी कल्पना नसल्यामुळें त्या सुखाला सर्वस्व मानून तो स्वतःला—अंतरात्म्याला—विसरत असतो. सुख आणि दुःख या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हें शेवटीं—निवाड्याचा दिवस येतो तेव्हां—त्याला कळत असतें. पण तेव्हां उशीर झालेला असतो. यासाठींच 'दुःख जसें धैर्यानें सोसावें तसेंच सुखहि सावधपणें उपभोग' असा संदेश गीता देऊन राहिली आहे. सुखाबद्दल हळूहळू हाव बाळगत राहिल्यामुळें निर्माण होणारी तृष्णा, तृष्णाशमन न झाल्यामुळें येणारा क्रोध आणि भय या तीन मनाच्या वृत्ती बुद्धीवर आघात करून राहतात म्हणून या तिघांनाहि थारा देऊं नकोस असें गीतेनें सांगितलें आहे. थोडक्यांत मनोनाश (annihilation of mind) झाल्याशिवाय चित्‌शक्तीची ओळख होणें कठीण आहे असें गीतेला सुचवायचें आहे. सुख, दुःख व त्याचे परिणाम तृष्णा, क्रोध आणि भय या सर्वांचा संबंध मनाशीं असून हृदयमंदिरांतील चित्‌शक्तीशीं त्याचा कसलाच संबंध नाहीं याची गीतेनें ग्वाही दिलेली आहे. त्या अंतरात्म्याशीं ओळख करण्यापूर्वी पहिली पायरी म्हणजे मनोनाश—मानसिक शक्तीचा ऱ्हास करणाऱ्या वृत्तींचा नाश करणें हा असल्यामुळें सुखाचें विऱ्हाड मनांत बांधूं नकोस, दुःखाला मनांत थारा देऊं नकोस म्हणजे आपोआप राग, भय आणि तृष्णा या मानसिक शक्तींच्या ऱ्हासास कारणीभूत होणाऱ्या वृत्ती आपलीं डोकीं वर काढणार नाहींत असें सांगितलें आहे.

स्थितप्रज्ञाच्या मानसशास्त्रीय विवेचनांत मनाला प्राधान्य दिलें आहे. कठोपनिषदांत किंवा भगवद्गीतेंत इंद्रियांपेक्षां मन, बुद्धि हीं श्रेष्ठ आहेत असा उल्लेख आहे. (इंद्रियेभ्यः परं मनः, मनसस्तु परा बुद्धिः, यो बुद्धेः परतस्तु सः) एखादी गोष्ट आपण डोळ्यानें पाहातों परंतु त्या घटनेंतील अर्थ शेवटीं मानूनच घ्यावा लागतो. याचाच अर्थ असा कीं

३९३९८ दि. चर्गेग
९०९३ नों. दि. २३/९८



नुसतें शरीर किंवा इंद्रियें यांचा मनाशिवाय वापर करतां येणें सुतराम् अशक्य आहे. मन आहे म्हणून भोंवतालची सृष्टि आहे. मनाशिवाय शरीर हें एक जड यंत्र ठरेल. कुठलीहि गोष्ट लक्षांत घेऊन त्यापासून काढावयाचा तर्क, अनुमान, मनाच्या, बुद्धीच्या प्रगल्भतेवरच शेवटीं अवलंबून आहे. आणि यामुळेंच भारतीय अध्यात्मशास्त्र किंवा अर्वाचीन भौतिकशास्त्र मानलाच अधिक प्राधान्य देतात.

## मन म्हणजे तरी काय ?

हें मन म्हणजे काय आहे--ही एक वस्तु आहे का हें एक विधात्यानें मेंदूमध्यें कुठें तरी रसायन ओतून ठेवलें आहे असा साहजिकच प्रश्न येतो. मानसशास्त्रज्ञांच्या शास्त्राच्या मर्यादा मेंदु व मज्जासंस्थेबद्दल उपलब्ध असणारें विज्ञानशास्त्र या पलीकडे जात नसल्यामुळें मन, बुद्धि, प्रज्ञा वगैरे गोष्टींचा अधिक साकल्यानें विचार करावयाचें कारण त्यांना उरत नाहीं. किंबहुना 'मनोमय कोशांत' फारसा शिरकाव मानस शास्त्रज्ञांनीं केल्याचें आढळत नाहीं.

योगशास्त्रांत मात्र मनाचा या दृष्टीनें अधिक विचार केला आहे. त्या शास्त्रांत मनाऐवजीं चित्त असा शब्द वापरला आहे. मानसशास्त्रांतील जाणीव (Consciousness) या चित्तांत समाविष्ट होऊं शकते. चित्त म्हणजेच अंतःकरण, मन, बुद्धि, अहंकार व जाणीव या सर्व वृत्ती होत. पाश्चात्यांच्या मतें मन, बुद्धि वगैरे चित्तवृत्तींना निरोगी मेंदूचें अधिष्ठान असावें लागतें. परंतु कांहीं पंडितांच्या मतें मेंदू हें जाणिवेचें एक साधन आहे. डॉ. वि. म. भट म्हणतात त्याप्रमाणें मेंदू हें चित्तवृत्तीचें एक साधन, वाहन, आहे.

## मनोविश्लेषण

मनाचें सामर्थ्य एकदां पटल्यानंतर या मनाचा योग्य तो उपयोग स्थितप्रज्ञ कसा करतो याचें विवेचन श्रीकृष्णांनीं केलें आहे. गीतेंत

(अथ केन प्रयुक्तोयं पापं चरति पूरुषः। अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः) बलानें खेंचून नेऊन मनुष्याला इच्छेविरुद्ध पाप करावयास कोण लावतो? असा अर्जुनानें श्रीकृष्णाला प्रश्न केला आहे. आणि श्रीकृष्णांनीं त्याला उत्तरहि असें दिलें आहे कीं कामक्रोध हे रिपू इंद्रियें, मन व बुद्धि यांना मोहांत पाडून पापें करवितात. अमूक अमूक गोष्ट करावयाची किंवा नाहीं हें मनाचें वैचारिक स्वरूप होऊन राहातें. (thought form of the mind) ही गोष्ट चांगली आहे, ही गोष्ट वाईट आहे, अमूक पदार्थ खाऊं नये हा फरक मात्र बुद्धि करीत असते! स्थितप्रज्ञाचा सर्व जोर बुद्धीवरच असल्यामुळें वाईट काय, वरें काय किंवा ज्याला पारिभाषिक संज्ञा 'ग्राह्याग्राह्यतेचा विचार करून निर्णय देणारी बुद्धि' (discriminative intellect) तिलाच स्थितप्रज्ञ अधिक विकसित करूं पाहात असतो. निर्णय घेतांना स्थितप्रज्ञ मनाला दूर ठेवीत असतो. बुद्धीनें निर्णय घ्यावयाचा आणि मनानें तो अमलांत आणावयाचा अशी शिस्तच त्यानें घालून दिलेली असल्यामुळें मन बुद्धीच्या प्रांतांत सहसा गडबड करीत नाहीं. अर्थात् त्यासाठीं स्थितप्रज्ञ सदैव खडा पहारा ठेऊनच राहिलेला असतो.

## आनंद दुःख—मनाचाच खेळ

स्थितप्रज्ञाची मानसिक बैठक अशी असल्यामुळें सुखदुःखाकडे तो समान नजरेनें पाहात असतो. दुःख जसें तो धैर्यानें सोसतो तसेंच सुखहि सावधपणें उपभोगीत असतो. सुखदुःख यांचा उगम मनांतच होत असल्यामुळें, निव्वळ बुद्धीला प्राधान्य किंवा महत्त्व देणारा स्थितप्रज्ञ हा फरक ओळखूनच जीवनाची वाटचाल करीत असतो. कसाहि बरावाईट प्रसंग त्याच्यापुढें येऊन ठाकला तरी त्याच्या मनाचें समतोलत्व (equanimity of mind) कधींच बिघडत नसतें. 'मानसिक समतोलत्व' सांभाळण्याकडे स्थितप्रज्ञाचें सारें लक्ष असल्यामुळें त्याचें

मानसशास्त्रीय विवेचन करतांना भगवान् श्रीकृष्ण म्हणतात कीं, सुख-दु:खाकडे जो समान दृष्टीनें पाहातो, ज्याला आनंद किंवा विषाद ही एकच असतात असा जो पुरुष तोच स्थितप्रज्ञ होय.

कासव एरवीं सारीं इंद्रियें मोकळीं सोडून विहार करीत असला तरी ज्या ठिकाणीं धोका दिसेल त्या ठिकाणीं तो आपलीं इंद्रियें आवरून घेत असतो. स्थितप्रज्ञ सुद्धां एरवीं चारचौघांप्रमाणेंच समाजांत वावरत असला तरी त्या वावरण्यामध्यें कासवाची भूमिकाच भरून राहिलेली असते.

## विषयाचा लाल दिवा

विषयांचा लाल दिवा त्याला दिसला कीं स्थितप्रज्ञ कासवाप्रमाणें इंद्रियांच्या व्यापारांतून आपलें मन बाहेर काढून ठेवीत असतो. इंद्रियांचा व्यापार मनाच्या इच्छेवर अवलंबून असल्यामुळें कित्येक वेळां मनानें घेतल्यानंतर इंद्रियें मनाच्या इच्छेप्रमाणें 'वाऱ्यानें खेंचली जळीं' या न्यायानें हूं कां चूं न करतां मुकाट्यानें वागत असतात. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास कित्येक वेळां इंद्रियें मनाचीं गुलाम ठरत असल्यामुळेंच मनाच्या लहरीवर इंद्रियांची हालचाल अवलंबून राहाते. यामुळेंच मनाला अधिक महत्त्व प्राप्त होत असतें.

## विषय आणि मानसिक जवळीक

मनाचें हें सामर्थ्य कित्येकदां आत्मघातकी ठरत असल्यामुळेंच स्थित-प्रज्ञ ज्या ठिकाणीं धोका दिसेल त्या ठिकाणीं कासवाप्रमाणें वृत्ति धारण करून राहात असतो. मोठमोठ्या विद्वानांना सुद्धां विषय दु:खाच्या गर्तेत ओढून नेत असल्यामुळें अशा विषयांबरोबर मानसिक जवळीक (psychic proximity) नको असेंच वरील श्लोकांत सुचवावयाचें आहे. मानसिक जवळीक नको याचें कारण एवढेंच कीं कित्येकदां ही जवळीक इंद्रियांच्या मदतीनें मनुष्याला भ्रममूलक अशा जगाची वाट दाखवीत असते.

## मानसिक शक्तीच्या वाफेवर चालणारें विषयाचें इंजिन

विषयाचें अस्तित्व मनुष्याच्या मनावरच शेवटीं अवलंबून असल्यामुळें मनानेंच मनापासून ठरविलें कीं आपल्याला या मार्गाला जावयाचेंच नाहीं तर विषय काय करणार? विषयाचें इंजिन मानसिक शक्तीच्या वाफेवर चालत असल्यामुळें मानसिक शक्ति ज्या ठिकाणीं असूं शकत नाहीं, त्या ठिकाणीं इंजिनाला गति तरी कुठून मिळणार? स्थितप्रज्ञाची मानसिक ठेवणच अशी असते कीं मानसिक शक्तीची वाफ विषयांसाठीं तो खर्चीं घालूं इच्छीत नसतो. अशा शक्तीचा वापर तो दुसऱ्या कांहीं चांगल्या गोष्टींसाठीं राखून ठेवीत असतो. आणि म्हणूनच एरवीं तो व्यवहारांत इतरांप्रमाणें वागत असलेला दिसला तरी त्याची मानसिक ठेवण कासवाप्रमाणें असते हेंच या श्लोकांत सांगावयाचें आहे.

विषयापासून दूर राहावयाचें मनुष्यानें ठरविलें तरी वासनांचें त्याच्या मनांतून निर्मूलन झालें असें म्हणतां येणार नाहीं. ज्याच्या मनांतून वासनाच दूर गेली आहे अशा मनुष्यासमोर विषय येऊन उभे राहिले तरी त्यामुळें त्या मनुष्याच्या चित्ताची साम्यता कधींच ढळत नाहीं. साधकाला ही अवस्था येण्यासाठीं विषयांपासून दूर राहण्याचा पहिला मार्ग दाखविला. आतां वासनांचें संपूर्णतया निर्मूलन करण्यासाठीं दुसरी साधना दाखवून दिली आहे.

विषय आणि इंद्रियें यांच्या संयोगानें उत्पन्न होणारे भोग दुःखालाच कारणीभूत होत असतात. ज्ञानी पुरुष हें ओळखून यापासून दूर राहत असतो. बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा विंदत्यात्मनि यत्सुखम्। स ब्रह्मयोगयुक्तात्मा सुखमक्षय्यमश्नुते। ज्ञानेश्वर दृष्टान्ताच्या पद्धतीला धरून सांगतात, 'जो आत्मस्वरूपाला सोडून केव्हांहि इंद्रियरूपी गांवांत येत नाहीं (म्हणजेच इंद्रियांशीं तादात्म्य करीत नाहीं) तो विषय सेवन करीत नाहीं यांत आश्चर्य कसलें? अपरिमित अशा स्वाभाविक असलेल्या आत्मसुखाच्या विपुलतेनें अंतःकरणांतच स्थिर झाल्यामुळें तो

पाऊल टाकीत नाहीं. सांग—कमळाच्या पाकळीच्या पात्रावर जो शुद्ध चंद्र—किरणांचें भोजन करतो तो चकोर पक्षी, वाळंवटांतील दगड चाटीत बसेल काय ? त्याप्रमाणें ज्याला स्वतःच आपल्या ठिकाणीं उत्कृष्ट आत्मसुख प्राप्त झालें त्याला सहज विषय सुटले हें काय सांगावयास पाहिजे ?' (ज्ञानेश्वरी अध्याय पांचवा श्लोक १०५ ते १०९). तात्पर्य, अंतःप्रत्यय आल्यामुळें ब्रह्माशीं समरस होऊन बसलेल्या युक्त पुरुषाच्याजवळ विषय फिरकूं शकत नाहींत. विषय आणि इंद्रियें यांच्या संयोगानें निर्माण होणारे भोग दुःखालाच कारणीभूत असल्यामुळें स्थितप्रज्ञ विषयांपासून दूर राहून अंतरात्म्याशीं समरस होऊन उरलीसुरलेली वासनाहि घालवून टाकीत असतो. विषय आणि इंद्रियें यांच्या जवळ येण्यानें उत्पन्न होणारे भोग व त्यापासून जन्म पावणाऱ्या दुःखाचें स्वरूप ज्ञानेश्वर सांगतात, भुकेलेला दरिद्री पुरुष कोंडा खातो, तहानेनें त्रस्त झालेलीं हरणें भ्रमानें खऱ्या पाण्याला विसरून मृगजळालाच पाणी समजून माळरानावर येऊन थबकतात; त्याप्रमाणें ज्यानें आत्मस्वरूपाचा अनुभव घेतलेला नाहीं, तेच पुरुष अशा रीतीनें विषयांत रंगतात. (ज्ञानेश्वरी अध्याय पांचवा श्लोक ११०,१११).तात्पर्य, ज्याच्या ठिकाणीं स्वरूपानंदाचा अभाव असतो त्याला विषयच सुखरूप वाटत असतात. परंतु हे विषय शेवटीं दुःखालाच कारणीभूत होत असल्यामुळें स्थित-प्रज्ञ या विषयांपासून नुसताच दूर राहात नाहीं तर विषयांतील वासनेचे मनांत उगवलेले तण उपटून काढून स्वस्वरूपीं रममाण होऊन राहातो. मृगजळाला 'जल' समजून धांवत येणारीं हरणें शेवटीं तें 'जल' नाहीं याची खात्री पटल्यावर जशीं दुःखी होतात त्याप्रमाणें विषयांपासून मिळणारें सुख नसून दुःखच आहे याची प्रचीति आल्यावर भ्रममूलक सुखाचें वैय्यर्थक दर्शन घडल्यावर मनुष्य खऱ्या सुखाचें दर्शन घडावें यासाठीं धडपड करीत असतो. विषयांच्या बाह्य स्वरूपाला न भुलतां

आंतील स्वरूप जाणून घेऊन स्थितप्रज्ञ विषयांपासून दूर रहातो एवढेंच नव्हे तर ब्रह्माशीं समरस होऊन मनांत उरलेल्या वासनांची सुद्धां अशा रीतीनें उचलबांगडी करीत असतो. देहसंस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते । आद्यंतवंतः कौन्तेय न तेषु रमते बुधः । स्थितप्रज्ञावस्थेंत प्रवेश करूं इच्छिणारा साधक ब्रह्मरूपीं मनोभावें समरस होऊन मनांतील विषयांचें निर्मूलन करूं शकतो एवढेंच या श्लोकांत सांगितलें आहे.

स्थितप्रज्ञाचें मानसशास्त्रीय विवेचन वरील समश्लोकांत आलें आहे. स्थितप्रज्ञाच्या साधकावस्थेंत साधकाला किती जपून राहणें भाग आहे याचा उल्लेख पहिल्या श्लोकांत आला आहे. विषयाकडे मनाची धांव असली तरी इंद्रियांना विषयांपासून दूर ठेवणें साधकाच्या हातांत आहे. मनाच्या धांवेला आवरून धरणें त्या मानानें कठीण असलें तरी इंद्रियांची धांव थांबवणें साधकाच्या हातीं आहे. इंद्रियें आणि मन यांचें सहकार्य (Co-operation) विषयाच्या बाबतींत होऊं न देण्याबाबत साधकानें जागरूक असलें पाहिजे. कारण मनाच्या धांवेबरोबर इंद्रियांनीं जावयाचें ठरविल्यास अनर्थच ओढवावयाचा. मोठमोठ्या ज्ञात्यांना इंद्रियें आणि मन यांचें सहकार्य ज्ञानाचा विसर पाडण्यास कारणीभूत होतें. आई, बहीण व मुलगी यांच्यापासून दूर राहावयास यासाठींच स्मृति सांगते. एवढ्याचसाठीं आपण पाहिलें त्यांत वरील कल्पनाच अभिप्रेत आहे. इंद्रियांचें दमन करून मनाची झेंप चित्‌शक्तीवर जाऊं द्यावी आणि अशा रीतीनें मानसिक घडण तयार झाल्यानंतर मग पुढचा प्रवास कठीण राहत नाहीं. विषयाचें ध्यान करूं लागल्यानंतर ती एक संवय लागून राहते. त्या संवयींतून काम निर्माण होतो आणि काम हा शेवटीं सुखाच्या दृष्टीनें अपूर्णांकच असल्यामुळें त्यांतून क्रोधाची निर्मिति होते. या क्रोधाला मोहाची जोड मिळाल्यानंतर स्मृति सुद्धां लोप पावते. याचाच परिणाम म्हणजे बुद्धिनाश आणि बुद्धिनाश म्हणजे सर्वांचा नाश. स्थितप्रज्ञाच्या भूमिकेंत

मनापेक्षां बुद्धीला अधिक प्राधान्य दिलेलें असल्यामुळें बुद्धीला ग्रासणारा राहुकेतु ओळखून त्या राहुकेतूची उचलबांगडी करावयास शिकविलें पाहिजे. बुद्धिनाशाला मूलतः जें कारण घडलें त्या कारणाचा शोध करून तें दूर करण्याच्या दृष्टीनें विषयांपासून साधकानें सावध रहावयास शिकलें पाहिजे. मनाची शक्ति फार मोठी आहे, गति वाऱ्यापेक्षांहि जलद आहे. परंतु मनाचें अस्तित्व विचाराव्यतिरिक्त नसल्यामुळें (mind cannot exist apart from thought) विचार मनांत उद्भवला किंवा विचार मनांत न उद्भवला या दोन गोष्टींमुळें निर्माण होणाऱ्या मानसिक प्रक्रिया फार भिन्न होऊन राहातात. नाना तऱ्हेचे तरंग एरवीं संथ दिसणाऱ्या सरोवरांत उठावेत त्याप्रमाणें विचारांची जराशी कुठें सर पडली कीं मनःसरोवरांत उठणारे अनेक तरंग मनाची शक्ति खर्ची करून टाकतात. मनाची शक्ति ओळखून तिचा युक्तीनें वापर कसा करावा याचें तंत्र (technique) वर सांगितलें आहे. मनाची शक्ति मनाच्या खोलींत (chamber of mind) कोंडून ती चित्-शक्तींत रोवून ठेवावयाची. मन अशा रीतीनें एकाग्र (one pointed) झाल्यानंतर विषय आपण होऊनच त्या जागेंतून आपलें पाऊल काढ-तात. हें तंत्र ज्याला साधलें त्याची मनाची शक्ति युक्तीनें वापरली जात असून स्थितप्रज्ञाच्या मार्गावर तो सुखासमाधानानें, आत्मविश्वासानें वाटचाल करीत असतो. चित्‌शक्ति त्याला अणुरेणूंत दिसूं लागल्यानंतर अद्वैताची भावना मनांत वास करावयास येते. सुखदुःखे समे कृत्वा अशा रीतीनें तो आपलें जीवन कंठूं लागतो. प्रसन्नतेचा प्रकाश अशा रीतीनें त्याच्या हृदयाकाशांत डोकावूं लागल्यानंतर त्याला येणारा अनुभव खऱ्या सुखाचा प्रत्यय आणून देणारा असतो. आत्मप्रत्यय किंवा अंतः-प्रबोध ज्याला म्हणतात तो आल्यानंतर त्याला व्यवहारांतील सुखदुःखें तुच्छ वाटतात आणि ही अवस्था प्राप्त होत असतां ओळखावें की साधक स्थितप्रज्ञ होत चालला.

सारी सृष्टि रमणीय वाटते याचें कारण त्या सृष्टींत चित्शक्तीचा अंश सामावून राहिला आहे म्हणून. साधकाच्या मनांत हें ठसल्यावर त्याला प्रत्येक वस्तूंत परमेश्वराची वाहती करुणा दिसूं लागते. चेतन अचेतन अशा प्रत्येक गोष्टींत तो चित्शक्तीचेंच स्वरूप पाहूं लागतो. सुख दुःख, दुष्ट सुष्ट वगैरे भेद कृत्रिम वाटूं लागतात. त्या भेदांपलीकडे जाऊन तो पाहूं लागतो. ढगापलीकडील शुभ्र आकाश जसें पाहावें तसें सांख्ययोगाच्या साधनेनें तो मानवनिर्मित सुखदुःखाच्या ढगांपलीकडे पाहूं लागतो. अशा रीतीनें प्रसन्नता त्याच्या हृदयांत वास करावयास येते. प्रसन्नतेच्या आगमनानें साधकाच्या बुद्धीला आपोआपच स्थिरता प्राप्त होते. ज्ञानेश्वर महाराज या अवस्थेचें वर्णन दृष्टान्तांच्या रूपानें असें करतात कीं, ज्याप्रमाणें अमृताचा झरा ज्याच्या पोटांतच उत्पन्न होतो त्याला तहानभुकेची भीति कधींच नसते. (जैसा अमृताचा निर्झरु। प्रसवे जयाचा जठरु। तया क्षुधेतृषेचा अडवरु। कांहींचि नाहीं) अर्थात् या उलट योगयुक्त नसलेल्या पुरुषाची बुद्धि कधींच स्थिर होऊं शकत नाहीं. कारण तशी त्याला इच्छाच नसते. आणि यामुळेंच त्याच्या चित्तांत सदैव अशांति नांदावयास येते. आणि ज्याला शांति नाहीं त्याला सुख तरी कुठें मिळणार? ज्ञानेश्वर महाराज म्हणतात त्याप्रमाणें विस्तवांत घातलेलें बी जर उगवेल तर शांतिहीन पुरुषाला सुखप्राप्ति होऊं शकेल. (देखें अग्निमाजीं घापती। तियें बीजें जरी विरुढती। तरी अशांता सुखप्राप्ती। घडों शके।) या ठिकाणीं मनाची चंचलता विचारांत घेतली गेली आहे. मनाची चंचलता घालवून ती परमात्म्याच्या ठायीं एकाग्र केल्याशिवाय इंद्रियांचा निग्रह तरी यावा कोठून?

मनाची चंचलता आणि इंद्रियांचा संचार याबाबत दोघांचेंहि सहकार्य विषयाबाबत न घडावें हें चांगलें. मनाची धांव जरी विषयावर गेली तरी इंद्रियांची झेंप जाणें, न जाणें साधकाच्याच हातांत आहे. यासाठींच या दोघांचें सहकार्य नको. इंद्रियांचें कोडकौतुक

पुरवूं गेल्यास मन सुद्धां त्यांच्या मागें जातें आणि शेवटीं नावेला वायूनें ओढून न्यावें, त्याप्रमाणें बुद्धीला हें मन ओढून नेतें. म्हणजेच आपल्या इच्छेप्रमाणें बुद्धीकडून वर्तन करवून घेतें. आत्मनाशाची हीच खूण आहे. म्हणूनच इंद्रियें विषयांतून काढून सर्व प्रकारें त्यांचा निग्रह केल्यानंतर साधकाची बुद्धि आत्मस्वरूपीं आपोआप स्थिर होत असते. साधकाच्या वाटचालींत भगवान् श्रीकृष्ण पूर्णावस्थेला पोहोंचलेल्या पुरुषाचीं लक्षणें सांगतात. सर्व प्राणी ज्या ठिकाणीं निद्रिस्त असतात त्या ठिकाणीं संयमी पुरुष जागत असतो. या उलट ज्या ठिकाणीं सर्व प्राणी जागे असतात त्या ठिकाणीं संयमी पुरुष झोंपी गेलेला असतो जाग आणि झोंप या दोन अवस्था कालदर्शक म्हणून या ठिकाणीं वापरलेल्या नाहींत, हें लक्षांत घेण्याजोगें आहे. आत्मस्वरूपीं सर्व प्राणी निजलेले असतात. देहादि प्रपंचाच्या ठिकाणीं संयमी अर्थातच विषयनिवृत्त होऊन वावरत असतो. तोचि जाणें निरविश्चि । मुनीश्वर। ज्ञानेश्वर महाराजांनीं कल्पिलेला अखंड मुनीश्वर तो हाच होय. अखंड मुनीश्वराचें आणखी एक लक्षण भगवान् श्रीकृष्ण सांगतात. ज्याप्रमाणें समुद्र आपली मर्यादा सोडीत नाहीं, असंख्य नद्या त्याला भेटावयास आल्या किंवा उन्हाळ्यांत एकहि नदी त्यास भेटावयास आली नाहीं म्हणून जसा समुद्र आपला मूळचाच निश्चल स्वभाव धारण करून असतो त्याप्रमाणें स्थितप्रज्ञ वाटचाल करीत असतो. या स्थितीचें वर्णन ज्ञानेश्वर महाराजांनीं फारच बहारदारपणें केलें आहे. महाराज म्हणतात कीं, सूर्याच्या घरीं प्रकाशाला दिवा का लागतो? आणि दिवा लावला नाहीं तर तो सूर्य अंधारानें कोंडून जाईल काय? (सांगे सूर्याच्या घरीं। प्रकाशु काय वातीवेरी। कीं न लाविजे तरी अंधारीं। कोंडेल तो।) अशा रीतीनें आत्मज्ञानानें संतुष्ट झालेला स्थितप्रज्ञ सर्व कामनांचा त्याग करून अहंकाररहित, ममत्वरहित भावनेनें संचार करीत असतो. हीच ब्रह्मविषयक अवस्था आहे. ही प्राप्त झाल्यावर मोह होत नाहीं. अंतकालीं सुद्धां या अवस्थेंत स्थित होऊन तो ब्रह्मानंदाप्रत जातो.


# आरती

जय देव जयदेव जय श्री गुरुनाथा
आरति ओवाळीतां हरली भवचिंता ॥ ध्रु० ॥

सबाह्य अभ्यंतरीं तूं नित्यानंद ।
भक्ता दाखवि ऐसी तूं मजला वाट ॥
प्रसन्न होवोनी करी कृपापात्र ।
जन्ममरणाचें थांबविं हें चक्र ॥ १ ॥ जयदेव जयदेव ॥

निर्मल निश्चल भावें जपतां गुरुदेव ।
विशाल करुनी मन हें दाखवि निजरूप ॥
प्रसन्न होवोनि करी तिमिराचा नाश ।
मी-तूं भेदपणाची मावळुनी रात ॥ २ ॥ जयदेव जयदेव ॥

नित्यानंद जपतां लागलें ध्यान ।
हारपलें मन झालें उन्मन ॥
तद्रूप होतां ऐसे उरलें कैवल्य ।
नित्यानंदस्वरुपीं पावुनि दिनकर ॥ ३ ॥ जयदेव जयदेव ॥




वि:
नों: दि:

# श्री नित्यानंद नामावलि

ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिम् !
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम् ॥
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतम् ।
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥

ॐ नमो भगवते नित्यानंदाय ।

१ ॐ श्री नित्यानंदाय नमः
२ नित्याय नमः
३ नित्यनिर्मलाय नमः
४ नित्यनिश्चलाय नमः
५ नित्यनिरामयाय नमः
६ नित्यनिष्कामाय नमः
७ नित्यनिजावासाय नमः
८ नित्यनिर्लोभाय नमः
९ नित्यनिर्मदाय नमः
१० नित्यनिश्चिंताय नमः
११ नित्यनिरहंकाराय नमः
१२ नित्यनिरंकुशाय नमः
१३ नित्यनिष्कलंकाय नमः
१४ नित्यनिर्गुणाय नमः
१५ नित्यनिर्लेपाय नमः
१६ नित्यनिरुपप्लवाय नमः
१७ नित्यनिरवद्याय नमः
१८ नित्यनिरंतराय नमः
१९ नित्यनिष्कारणाय नमः
२० नित्यनिरांतकाय नमः
२१ नित्यनिष्प्रपंचाय नमः
२२ नित्यनिःसंगाय नमः
२३ नित्यनिर्द्वंद्वाय नमः
२४ नित्यनिराधाराय नमः
२५ नित्यनिरागाय नमः
२६ नित्यनिष्क्रोधाय नमः
२७ नित्यनिष्पापाय नमः
२८ नित्यनिर्भयाय नमः
२९ नित्यनिर्विकल्पाय नमः
३० नित्यनिर्भेदाय नमः

३१ नित्यनिष्क्रियाय नमः
३२ नित्यनिस्तुलाय नमः
३३ नित्यनिःसंशयाय नमः
३४ नित्यनिरंजनाय नमः
३५ नित्यनिरुपमविभवाय नमः
३६ नित्यशुद्धभाविने नमः
३७ नित्यशुद्धबुद्धि परिपूर्ण सच्चिदानंदाय नमः
३८ नित्यज्ञानिने नमः
३९ नित्यसौख्याय नमः
४० नित्यसौख्यदाय नमः
४१ नित्यदुःखहारिणे नमः
४२ नित्यवैरहारिणे नमः
४३ नित्यनिजानंदाय नमः
४४ नित्यमुक्ताय नमः
४५ नित्यमुक्तिप्रदाय नमः
४६ नित्यमुक्तानंदाय नमः
४७ नित्यमुक्तिदायिने नमः
४८ नित्यमूलाधारस्थिताय नमः
४९ नित्यमूलाय नमः
५० नित्यमेघाय नमः
५१ नित्यमेघश्यामाय नमः
५२ नित्यमोक्षाय नमः
५३ नित्यमोक्षदाय नमः
५४ नित्यमौनिने नमः
५५ नित्यमुनिप्रियाय नमः
५६ नित्यमुनिस्तुताय नमः
५७ नित्यमुनिसेवापरायणाय नमः
५८ नित्यमुक्तिनाथाय नमः
५९ नित्यमुक्तिसौख्यदाय नमः
६० नित्यमुक्तप्रेमिणे नमः
६१ नित्यमुक्तरमणीयाय नमः
६२ नित्यमुक्ताधिपाय नमः
६३ नित्यमुक्तप्रियाय नमः
६४ नित्यमुक्तसदोदिताय नमः
६५ नित्यमुक्तनिर्गुणाय नमः
६६ नित्यमुक्तनिरंजनाय नमः
६७ नित्यमुक्तमायाहरणाय नमः
६८ नित्यमुक्तगणेशाय नमः
६९ नित्यमुक्तगुणेशाय नमः
७० नित्यमुक्तनिर्द्वंद्वाय नमः
७१ नित्यमुक्तनिराकाराय नमः
७२ नित्यमुक्तनिराभासाय नमः
७३ नित्यमुक्तोद्धारकाय नमः
७४ नित्यमुक्तमहात्मने नमः
७५ नित्यमुक्तपीडाप्रशमने नमः
७६ नित्यमुक्तमामुद्धराय नमः
७७ नित्यमुक्तपरायणाय नमः
७८ नित्यमुक्तभवभयहरणाय नमः
७९ नित्यमुक्तकारुण्यरूपिणे नमः

८० नित्यमुक्तमंत्रशास्त्रनिपुणाय नमः
८१ नित्यमुक्तमहाभागाय नमः
८२ नित्यमुक्तमायातीताय नमः
८३ नित्यमुक्तमहेशाय नमः
८४ नित्यमुक्तमहिम्ने नमः
८५ नित्यमुक्तमानवाय नमः
८६ नित्यमुक्तमानवेशाय नमः
८७ नित्यमुक्तमानवातीताय नमः
८८ नित्यमुक्तमधुसंभूताय नमः
८९ नित्यमुक्तमहिंद्राय नमः
९० नित्यमुक्तमधुप्रियवादिने नमः
९१ नित्यमुक्तसत्यप्रियवादिने नमः
९२ नित्यमुक्तमधुसूदनाय नमः
९३ नित्यमुक्तमालाकमंडलुधराय नमः
९४ नित्यमुक्तयोगीप्रियाय नमः
९५ नित्यमुक्तिसौख्यदाय नमः
९६ नित्यमुक्तिफलप्रदाय नमः
९७ नित्यमुक्तिमहावीराय नमः
९८ नित्यमुक्तिमंजुभाषणाय नमः
९९ नित्यमुक्तिमहामायिने नमः
१०० नित्यमुक्तिमधुमते नमः
१०१ नित्यमुक्तभिषग्वराय नमः
१०२ नित्यमुक्तभविष्यज्ञाय नमः
१०३ नित्यमुक्तभवबंधविमोचनाय नमः
१०४ नित्यमुक्तभक्तितोषदाय नमः
१०५ नित्यमुक्तिज्ञानगम्याय नमः
१०६ नित्यमुक्तिस्रवणाय नमः
१०७ नित्यमुक्तिज्ञानवते नमः
१०८ नित्यमुक्तगुरोर्गुरवे नमः

श्री नित्यानंद अष्टोत्तरशतनामावलिः समाप्ता ।

31390 दि:
नों: दि:
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

REFBK-0011616

# ती अपूर्व भेट

११८७६

जवळ जवळ एक तप होत आलं या घटनेला. मुंबई विश्वविद्यालयाची एलएल. बी. ची फायनल परीक्षा नुकतीच पास होऊन बाहेर पडलों होतों. व्यावसायिक क्षेत्रांत वकील या नात्यानें प्रवेश करण्यास वय आडवें येत असल्यामुळें एक वर्ष केवळ मार्गप्रतीक्षा करण्यावांचून अन्य मार्ग उरलेला नव्हता. त्या एका वर्षाच्या अवधींत व्यावसायिक कसब अंगीं मुरावें यासाठीं करावयाची साधना एवढाच काय तो विचार मनांत घोळत होता. देशपर्यटनाला निघण्यापूर्वीं गुरूचा आशीर्वाद घेऊन निघण्याचा पूर्वापार चालत आलेला रिवाज व्यावसायिक आयुष्यांत पदार्पण करणाऱ्या व जगाचा अनुभव नसलेल्या एका अजाण बालकाला कसा पाळतां येईल म्हणून सद्गुरूच्या शोधांत होतों. ‘अडक्याला पासरी’ गुरु गांवांत काय थोडे थोडके होते? परंतु मला गुरु असा हवा होता कीं जो माझ्या मनाची तृप्ति प्रत्यक्ष अनुभूतीनें करूं शकेल. आमचें कुळींचें दैवत पंढरपूरचा विठोबा. घराण्यांत चालत आलेला कुलाचार पाळण्याव्यतिरिक्त उपासनेला विशेष स्वरूप असें आलें नव्हतें. मनांत मात्र वाटत असे कीं व्यावसायिक क्षेत्रांत शिरण्यापूर्वीं मनाची घडण अशी कुणीतरी तयार करून द्यावी कीं जेणेंकरून मानसिक शक्ति खच्ची करणाऱ्या मानसिक विकल्पांपासून दूर राहून अंगिकारिलेलें कर्तव्य चांगल्या रीतीनें पार पाडूं शकेन. सद्गुरूच्या कृपेवांचून मानसिक जीवनांत हा फरक कसा पडावा? असें मी वडीलधाऱ्या मंडळींकडून ऐकलें होतें आणि म्हणूनच सद्गुरूचा शोध घेण्यासाठीं मन धडपडत होतें. मनाच्या अशा अवस्थेंत माझे पाय श्री क्षेत्र गणेशपुरी येथें वळले. त्या क्षेत्रीं एक

फार मोठी विभूति वास करीत असल्याचें ऐकिवांत होतें आणि म्हणून ही विभूति एकदां पाहून यावी म्हणून निघालों. गणेशपुरीचें त्यावेळचें स्वरूप नव्यानें जाणाऱ्या भक्ताला बुचकळ्यांतच पाडील. मुंबई शहराची छोटी आवृत्ति दिसणारें गणेशपुरीचें आतांचें स्वरूप पहातां त्यावेळचें स्वरूप बाह्य जगाशीं संबंध तुटलेल्या एखाद्या पोरक्या बालकाप्रमाणेंच वाटावें. गणेशपुरीचें तीर्थी श्री बाबांनीं उगवल्यावर त्यांच्या दर्शनासाठीं येणाऱ्या भक्तांच्या पावलांनीं नकळत निर्माण केलेली पाऊलवाट, वाटेंत लागणारे खांचखळगे, कांट्याकुट्यांनीं भरलेला मार्ग, वाहनांची महर्गता, राहावयास येणाऱ्या भक्तांची न होऊं शकणारी सोय वगैरे त्यावेळचा देखावा व आतां पालटलेलें स्वरूप पाहिल्यावर तीस वर्षांपूर्वी 'बारीक मुंबई होणार' म्हणून या क्षेत्रांत पाऊल ठेवतेवेळीं श्रीबाबांनीं काढलेले उद्‌गार पूर्णांशानें फळास आले हें कोण नाकारील? धन्य श्री क्षेत्र गणेशपुरी कीं जेथें जगाला सत्य, न्याय, नीतीचा मार्ग दाखवून जडजीवांच्या उद्धारासाठीं परमेश्वरी दूत आला! असो. 'श्री नित्यानंद महाराज कुठें राहातात?' सूर्य टाळूवर आला आहे, अंगांतून घामाच्या धारा निघत आहेत अशा स्थितींत मी वाटेंत भेटणाऱ्या प्रत्येकाला विचारीत होतों. 'उधर जो कुंडके पास बोगदा है उसीमें बाबा रहते है' अशा मोडक्यातोडक्या हिंदी भाषेंत एक मंगळूरकडचा भक्त बोलून गेला. बुभुक्षिताच्या तोंडांत आकाशांतून घांस पडावा असा आनंद मला झाला. कुंडाजवळील बोगद्यापाशीं येऊन पोहोंचलों. हीच ती जुनी धर्मशाळा! हळूहळू डोकें वांकवून आंत शिरकाव करून घेतला आणि सभोंवतीं कुणी दिसतें किंवा काय म्हणून पाहूं लागलों. पहिल्या खोलीला असलेल्या मधल्या दरवाजानें आणखी खालीं उतरलों तों एखाद्या रिकाम्या बोगद्यांत शिरावें असेंच वाटलें. पुढें पुढें सरकत होतों तोंच एक काळीकभिन्न लंगोटी लावलेली मूर्ति एक दंडुका घेऊन 'चलो जाव यहाँसे' म्हणून माझ्या पाठीशीं लागली. पळावयास जागाच नव्हती मागें,

तेव्हां बोगद्याच्या भिंतीला टेकून स्वतःचा बचाव करण्याव्यतिरिक्त मला मार्गच नव्हता. इतक्या लांबून निर्मळ व निर्व्याज अंतःकरणानें येणाऱ्या भक्ताचें जो ह्द्गत जाणूं शकत नाहीं तो 'देव' कसला, असा विचार मनांत येऊन क्षणभर खिन्न झालों. सद्‌गुरूचे कृपामार्ग मी तेव्हां कसे जाणावे ? काय होईल तें होवो, इथून हालायचेंच नाहीं अशी मनाची तयारी करून बोगद्याच्या अगदीं टोंकाला असलेल्या कोपऱ्यांत आसन मारून बसलों. हा भक्त कांहीं केल्या ऐकायचा नाहीं याची खात्री पटल्यामुळेंच कीं काय, हातांत काठी घेऊन येराझारा घालणाऱ्या त्या भयंकर दिसणाऱ्या व्यक्तीनें माझा नाद सोडला. जणूं बाजूला कुणीच नाहीं अशा आविर्भावानें मध्येंच स्वतःशीं हसत, मध्येंच स्वतःशीं कांहींतरी पुटपुटत, मध्येंच हातांचीं अणकुचीदार बोटें हाताच्या तळव्याला लावत येराझारा घालण्याचें काम तिनें चालू ठेवलें होतें. तेवढ्या वेळांत मी मात्र त्या व्यक्तीची हालचाल अगदीं बारकाईनें पाहात होतों. जणुं या जगाशीं आपला कुठलाच संबंध नाहीं अशा बेफिकीर वृत्तीनें फेऱ्या घालणारा हा विदेही फकीर निर्भय वाटला. पायाला भिंगरी लावल्याप्रमाणें इतका वेळ झपझप चालणारा हा विदेही हळूहळू गति कमी करून त्या बोगद्याच्या मध्यभागीं एका खोलीला लागून असलेल्या चबुतऱ्यावर विराजमान झाला. मीं अगदीं निरखून त्या व्यक्तीचें पोट भरून दर्शन घेतलें. एकाग्र होऊन मी तिकडे पाहात होतों तोंच 'ए, आंघोळ केला, वज्राबायला गेला !' म्हणून मोडक्या तोडक्या मराठींत उच्चारलेले शब्द एकदम कानीं पडले. कोपऱ्यांतून उठून लवून नमस्कार केला व या मंदिरांत प्रवेश करण्यापूर्वी आंघोळीची व वज्रेश्वरीच्या देवीच्या दर्शनाची रूढी पाळण्याबाबत माझ्याकडून झालेली चूक लक्षांत आली व श्रीबाबांच्या त्या उद्‌गारांत मी ती तपासूनही घेतली व एकदम कुंडाकडे धांव ठोकली. तिन्ही कुंडांत अंग बुडवून वज्रेश्वरी-मातेचें मनांतल्या मनांत चिंतन करून पुनश्च जागेवर येऊन स्थानापन्न

झालों. 'पाण्यांत सल्फर–सल्फर है'—कुंडांतल्या पाण्याचे गुणधर्म श्रीबाबा कथन करूं लागले. श्रीबाबांच्या जवळ जावयाला हळूहळू वाट खुली होत असल्याचें पाहून मी माझी कोपऱ्यांतील जागा सोडून श्रीबाबांच्या समोर येऊन बसलों. श्रीबाबांची व माझी नजरानजर झाली. एरवीं बाहेर रुक्ष दिसणाऱ्या बाबांच्या डोळ्यांत मला कोंवळीक गवसली. गाईची वत्सलता त्यांत आढळली. पक्ष्याची ऋजुता प्रत्ययास आली. चेहऱ्याभोंवतीं एक जिवंत तेजोवलय पाहून आत्म्याचा प्रकाश म्हणतात तो तोच कीं काय म्हणून कित्येक दिवस मन त्या विचारांत बुडी मारून होतें. 'कुठें राहातोस, काय करतोस' म्हणून चौकशी करून 'चल जा आतां तुझ्या कामाला—' म्हणून पुन्हा बाबांनीं दंडा उगारला. नमस्कार करून आशीर्वादासाठीं विनम्र भावानें मी मान खालीं लवविली. 'बाबा, माझ्यावर कृपा करा' भीत भीत मी म्हणून गेलों. तोंच

*'निर्मल मन*
*निश्चल मन*
*विशाल मन'*

असे उद्गार काढून पुन्हा थोडा वेळ थांबून 'Develop your mind and develop your brain power–'

'सद्भावना–स्मृति' असे उद्गार काढून 'चलो जाव अबी' म्हणून पुनश्च सोटा उगारला. मी सुद्धां 'निर्मल मन, निश्चल मन, विशाल मन, सद्भावना, स्मृति' या शब्दपुष्पांची मालिका मनांत ठसवून घरचा रस्ता धरला. श्री बाबांची हीच माझी प्रथम भेट! या भेटींत तीन अध्यात्मबीजें माझ्या मनांत नकळत पेरलीं गेलीं. त्या बीजांना हळू हळू कुणी पाणी घातलें, त्याला कोंब कसे येत गेले याची कहाणी पुढें सांगेनच.

37395 चरित्र
1093 73/207

# ‘देव मागायला कोण आलाय का ?’

श्री बाबांची पहिली भेट झाल्यापासून मनाला श्री बाबांच्या अपूर्व भेटीचा देखावा आठवावयाची एक संवयच जडून गेली. बाबांच्या पहिल्या भेटीची कथा मी फक्त तेव्हां कोणाला सांगितली असेल तर ती माझ्या आईला व माईंना. संतांचें दर्शन घेण्यास कधींहि चुकूं नको, त्यांचें आशीर्वादच तुला कार्यप्रवण करूं शकतील हे माझ्या आईचे उद्‌गार मी अजूनहि आठवतों. बाबांची भेट आठवावी हीच काय ती स्मृति मनाशीं बाळगून मी व्यावसायिक जीवनांत नव्यानें पदार्पण करून वाटचाल करीत होतों. जीवनाचें सिंहावलोकन करीत असतांना अनेक आपत्तींतून मार्ग दाखविणारी व्यक्ति श्री बाबांव्यतिरिक्त दुसरी तिसरी कुठलीच नव्हती याची आतां प्रचीति येत चालली होती. जणुं श्री बाबांची भेट झाल्यावर आतांपर्यंत माझें परिसुप्त मन हांकणारा सारथी माझ्याहून कुणीतरी भिन्नच असावा याची खात्री मी इतरांना कशी पटवावी? असो. त्या पहिल्या भेटीची कथा माईंच्या कानावर घातल्यावर एकदां आपणहि जावें असा माईंनीं आग्रह धरला. झालें. आम्ही निघालों. यावेळेस मात्र मनाला भीति वाटत नव्हती. भीतीऐवजीं प्रेमानेंच जागा घेतली होती. श्री क्षेत्र गणेशपुरीला पोहोंचल्यावर त्या ऐतिहासिक बोगद्यांत निर्भयपणें शिरलों व त्या चौथऱ्याजवळ येऊन आम्ही सर्व-जण ठाकलों. या वेळेस चौथऱ्याला लागून असलेल्या खोलीच्या खिड-कीला टेकून एका फळीवर बसलेली श्री बाबांची पाठमोरी मूर्ति पाहून ‘आई, माई! हेच ते बाबा’ म्हणून मी हलक्या आवाजांत पुटपुटलों. तोंच ‘इधर छोकरे मांगनेको लोक आते है! देव मांगनेको कोई आया है क्या?’ म्हणून रोखठोक सवाल बाबांनीं केला. या प्रश्नाला एकदम

उत्तर देणें धाष्टर्याचेंच होतें. म्हणूनच कीं काय, मनांतल्या मनांत 'आपल्या कृपेशिवाय देव मिळणें प्रायः अशक्यच आहे' असें मी म्हणून गेलों. तोंच पुनश्च 'निर्मल मन, निश्चल मन, विशाल मन' अशा पूर्वीं-च्याच उद्‍गारांची आठवण देऊन 'कॉंसेंट्रेशन, कॉंसेंट्रेशन' म्हणून त्या पुष्पमालिकेंत आणखी एका नव्या पुष्पाची भर घातली. 'जाव अबी,' असें सांगत असतांनाच खेड्यांतील झालेल्या बालविवाहाची एक मिरवणूक खेड्यांतील ताशे नगारे वाजवीत येऊन दाखल झाली. बाबांचा आशीर्वाद घेण्यासाठीं तीं वधूवरें नम्र झालीं तोंच बाबांनीं एवढा वेळ पाठ करून बसलेली आपली मान वळवली व 'ये! लेके जाव सब!' अशी आज्ञा करीत सभोंवार पडलेल्या नारळाकेळ्यांचा ढीग प्रसाद म्हणून त्या वधूवरांना दिला. त्यांनीं तो एका फडक्यांत बांधून पुनश्च नमस्कार करून बाबांचा निरोप घेतला. तोंच पुन्हा 'ये! ये लेके जाव' असें म्हणत एक करकरीत नवें धोतर व नवें लुगडें त्या वधूवरांच्या अंगावर बाबांनीं फेकलें. ज्याची घडी सुद्धां मोडलेली नाहीं अशीं कोरीं करकरीत वस्त्रें तेवढ्या वेळांत कुठून आलीं याचें मनाला आश्चर्य वाटून 'ही जादू तर नाहीं ना?' म्हणून मन पुन्हा बुचकळ्यांत पडलें. तोंच 'अबी जाव यहॉंसे' असें म्हणत श्री बाबांनीं खिडकी लावून घेतली आणि आम्ही परतलों. परतत असतां बाबांनीं या वेळेस उच्चारलेला कॉंसेंट्रेशन हा नवा शब्द व कोरी करकरीत वस्त्रांची जागींच झालेली उत्पत्ति या विचारानें मन उत्सुकतेनें श्री बाबांकडे आकर्षिलें गेलें. या सर्वांची अर्थनिष्पत्ति केव्हां व कुणी केली याची कहाणी यथावकाश सांगेनच. तथापि श्री बाबांनीं मनाला लावलेलें वेड दृढ होत चाललें होतें, याची अनुभूति तेव्हांच येऊं लागली होती.

# कलियुगांत अवतरलेला देव

श्री बाबांचा जन्म कुठें झाला, ते कुठें वाढले, त्यांनीं योगसाधना कुठें केली यासंबंधीं साद्यंत इतिहास उपलब्ध नाहीं. अवतारी पुरुषाच्या जीवनांत भेटणारें हें प्रश्नचिन्ह श्री बाबांच्या बाबतींतहि दृष्टोत्पत्तीस येतें. श्री बाबा तरुणपणीं दक्षिण कॅनरा भागांतील काननगड या गांवापासून थोड्याच अंतरावर असलेल्या 'गुरुबन' नांवानें ओळखल्या जाणाऱ्या भागांत प्रथम दृष्टीस पडले असावेत असें समजतें. निसर्ग-रमणीय अशा या भूमींत जी एक खोल गुहा दृष्टीस पडते, त्या गुहेंत बराच काळ निर्विकल्प स्थितींत श्री बाबा वास्तव्य करीत होते. असें म्हणतात कीं या गुहेंत राहात असतांना श्री बाबांनीं स्वसामर्थ्यानें बसल्या जागीं पाणी निर्माण केलें. हेंच पाणी तोटींतून बाहेर आणलें आहे. या पवित्र तीर्थानें पुनीत होऊन बाहेर येणारा प्रत्येक भक्त पापनाशिनी गंगेचें पावित्र्य आठवत आठवत श्री बाबांच्या लीला गांवकऱ्यांच्या तोंडून ऐकत असतो. 'गुरुबन' या विभागांत कांहीं काळ वास्तव्य केल्यानंतर श्री बाबा तिथूनच अदमासें तीन मैलांवर असलेल्या 'गुहाक्षेत्र' नांवानें ओळखल्या जाणाऱ्या विभागांत आले असावेत. या गुहाक्षेत्राचा थोडक्यांत इतिहास असा. या ठिकाणीं इक्केरी नांवाचा राजा राज्य करीत होता. या राजानें पुढें टिपू सुलतानाचा पाडाव केला असावा असें दिसतें. या ठिकाणीं असलेल्या अखंड डोंगरांत श्री बाबांनीं स्वसामर्थ्यानें जवळजवळ ३९च्या वर गुहा खोदल्या आहेत. या डोंगराच्या माथ्यावर 'अत्तेरी तेरी बत्तेरी' नांवानें ओळखलें जाणारें एक पुरातन दैवत आहे. हें दैवत नवसास पावतें असा अनेकांचा अनुभव असल्यामुळें या ठिकाणीं लोकांची सदैव ये-जा असते. या गुहा क्षेत्रांत श्री बाबांनीं

अष्टसिद्धींना बसण्यासाठीं मांडलेले आठ दगड अजूनहि दृष्टीस पडतात. या ठिकाणीं श्री बाबांनीं असंख्य चमत्कार करून मानवाला सुखा-समाधानाचा प्रत्यय आणून दिला असें सांगणारे हजारों लोक भेटतात. या क्षेत्राचा जीर्णोद्धार श्री बाबांनींच केला असें कृतज्ञतेनें सांगतांना श्री बाबांच्या लीला कथन करणारी भाविक जनता पाहून अंतःकरण अक्षरशः भरून येतें. या क्षेत्रापासून जवळच खुशालनगर म्हणून ओळखला जाणारा एक भाग आहे. या ठिकाणीं आपल्या वास्तव्यांत श्रीबाबांनीं एक विहीर बांधलेली असून या ठिकाणीं सुद्धां आपल्या कृपेचा प्रसाद येथील जनतेला देऊन श्री बाबा ही भूमि पावन करून पुढें गेले. पडब्रिद्री या भागांत ब्रह्मस्थान नांवानें ओळखलें जाणारें एक दाट जंगल आहे. हें जंगल सर्पांनीं भरलेलें असल्यामुळें या विभागाला ‘सर्पजंगल’ म्हणून लोक ओळखीत. या ठिकाणीं असलेल्या वडाच्या झाडावर उभे राहून अवधूत दशेंत श्री बाबा सभोंवतीं जमणाऱ्या रंजले गांजलेल्यांवर पानें ओरबाडून टाकीत असत. ‘हीं पानें खा—बरें वाटेल’ असें सांगत. आणि आश्चर्य असें सांगतात कीं या पानांचा औषधाप्रमाणें उपयोग करणारे अनेक पीडित व्याधिमुक्त होत.

हजारों चत्मकार या ठिकाणीं श्री बाबांच्या येण्यानें घडूं लागल्यामुळें श्री बाबांच्याभोंवतीं थवेच्या थवे जमूं लागले. श्री बाबा एके जागीं असे निश्चित बसून राहात नसल्यामुळें लोकांची गर्दी वाढत चालल्याचें पाहून तेथून ते पळ काढीत असत. श्री बाबांच्या चालण्यांत इतका वेग असे कीं त्यांच्याबरोबर चालण्यांत किंवा बोलण्यांत कुणीहि महाभाग येवो, तो हमखास हरत असे. श्री बाबा मंगलोरहून काननगड या गांवीं पुढें आले. या ठिकाणीं त्यांनीं कांहीं वर्षे वास्तव्य केलें. वर सांगित-ल्याप्रमाणें श्री बाबांनीं या ठिकाणीं स्वकष्टानें ३९च्या वर गुहा एका अखंड डोंगरांत खोदून ध्यानासाठीं साधकांची सोय करून ठेवली. धर्मशाळासुद्धां या ठिकाणीं बांधून श्री बाबांनीं अनेक यात्रेकरूंची

सोय करून ठेवली. या ठिकाणीं बाबांनीं असंख्य चमत्कार करून दाखविले. रंजलेगांजलेल्यांचा श्री बाबांच्या दर्शनासाठीं पूर लोटूं लागला. श्री बाबा आपल्या कृपाप्रसादानें सर्वांना सुखाचा दिलासा प्राप्त करून देऊं लागले. हा भाग पूर्वीं जंगलानें व्याप्त असल्यामुळें हिंस्र श्वापदें यांत निर्भयपणें वावरत असत. श्री बाबा या जागीं आल्यावर बसल्या जागीं बाहेर पडणारे नाग पाहून 'इथें राहूं नका' असें त्यांना उद्देशून सांगत असत. आणि चमत्कार असा घडत असे कीं श्री बाबांची आज्ञा शिरसावंद्य मानून हीं जनावरें निमूटपणें तिथून निघून जात असत. अजून या घटनांची सत्यता कृतज्ञतेनें डोळ्यांत पाणी आणून सांगणारी मंडळी काननगड विभागांत हयात आहेत. श्री बाबांनीं धर्मशाळा वगैरे इमारती बांधलेल्या पाहून तेथील पोलिसांना श्री बाबांविषयीं संशय आला. लंगोटी एवढीच ज्यानें आपली संपत्ति आपल्याबरोबर बाळगली असा हा साधु कुठून पैसे आणतो अशी शंका येऊन पोलीसांनीं श्री बाबांना खडसावून विचारलें. श्री बाबा त्यांना एका दरींत घेऊन गेले व दरींत खोल पाणी असलेल्या जागीं उडी मारून नोटांचीं पुडकीं बाहेर काढून घेऊन आले. पोलीस आश्चर्यचकित होऊन श्री बाबांकडे पाहात राहिले. श्री बाबा हंसूं लागले. पोलिसांना श्री बाबा महापुरुष आहेत याची खात्री पटून ते श्री बाबांच्या पायां पडूं लागले. श्री बाबा कुणालाच पायां पडूं देत नसत. पायाला हात तर लावूंच देत नसत. एखाद्या झाडाखालीं किंवा सरोवराकांठीं जाऊन उभे राहात. दुःखितांचा, पीडितांचा तांडा त्या त्या जागीं लोटत असे. 'बाबा, मला बरें वाटत नाहीं....शरीरव्याधीनें पछाडलों आहें' असें म्हणतांच श्री बाबा हाताला येईल त्या झाडाचा पाला ओरबाडून त्या पीडिताच्या हातीं देत व म्हणत, 'जा, दुधांत घोटून घे.' तेथील जनता फारच गरीब व अशिक्षित होती. 'दूध घरीं नाहीं' असें उत्तर देतांच 'जा, पाण्यांत घोटून घे' असें बाबा सांगत. आणि

चमत्कार असा कीं तसें केल्यावर ताबडतोब गुण दिसूं लागत असे. श्री बाबा तिकिटाविना प्रवास करीत असतांना निलेश्वर स्टेशन-जवळ त्यांना तिकिटकलेक्टरनें खालीं उतरविलें. चमत्कार असा झाला कीं गाडी कांहीं केल्या चालेचना. खूपच प्रयत्न झाले परंतु गाडी जागच्याच जागीं उभी. शेवटीं चौकशी करतां असें आढळून आलें कीं श्री बाबांना खालीं उतरविल्यापासून गाडींत हा बिघाड निर्माण झाला. स्टेशनमास्तर, तिकिटकलेक्टर, गार्ड व ड्रायव्हर सर्वच मंडळी श्री बाबांजवळ आली व क्षमेची याचना करूं लागली. श्री बाबा हंसूं लागले व म्हणाले 'जा, ती गाडी सुरू झाली.' पुढें कासरगोड स्टेशनांत तर श्री बाबांकडे तिकीट नसल्याचें पाहून तेथील तिकिट कलेक्टरानें श्री बाबांना हटकलें. श्री बाबांनीं सहस्रावधि तिकिटांचें पुडकें काढून त्या तिकिट कलेक्टराच्या हातीं ठेवलें. सर्वांनाच या घटनेनें आश्चर्याचा धक्का बसला. बाबा पुढें चालूं लागले. पुढें हले–अंगडी या गांवीं 'कोणी महात्मा आला आहे, महात्मा आला आहे' अशी एकदम गांवांत ओरड सुरू झाली. श्री बाबाच होते ते. एका झाडाखालीं येऊन उभे राहिले. महात्म्याच्या दर्शनासाठीं या ठिकाणींहि हजारों लोकांची गर्दी लोटली. त्यावेळेस गांवीं प्राथमिक शाळेंत शिक्षण घेणारा एक विद्यार्थी (आतां या गृहस्थांचें वय अदमासें ६०-६५ वर्षांचें असून आपलें आयुष्य ते परमार्थ साधनेंत सध्यां व्यतीत करीत आहेत) गांवांतील ही वाऱ्याप्रमाणें पसरणारी बातमी ऐकून श्री बाबांच्या दर्शनाला धांवला. त्या वेळचा विद्यार्थी व आतां जीवनाच्या उत्तरार्धांत पदार्पण केलेला साधक असें सांगतो कीं श्री बाबा ज्या ठिकाणीं उभे राहात त्या ठिकाणीं श्रींच्या कृपेसाठीं हजारों लोकांचा तांडा लोटत असे. भूतपिशाच्चबाधेनें पछाडलेले लोक श्रींच्या समोर येऊन उभे राहिल्यानंतर 'आम्हांला मुक्ति द्या....सोडवा आम्हांला या क्लेशांतून,' असें म्हणत थरथर कांपत असत. श्री बाबांच्या कृपाकटाक्षानें

संचारलेलीं भूतें पछाडलेल्या जीवांना सोडून तिथल्या तिथें निघून जात असत. श्री बाबांच्या दर्शनासाठीं वाढत चाललेली गर्दी पाहून श्री बाबा बोलतां बोलतां पळून जात असत. त्यांना गांठतां गांठतां भक्तांच्या नाकीनव येत असत. याच गांवीं एका सावकाराच्या घरीं श्री बाबा राहावयास गेले होते. श्रीबाबांच्या कृपेनें हा सावकार भौतिक दृष्ट्या खूप श्रीमंत झाला होता. एके दिवशीं या सावकारानें श्रीबाबा प्रत्यक्ष हनुमानाशीं बोलत असतांना पाहिलें. श्रीबाबांच्या हें लक्षांत आल्यावर 'ही घटना कुणाला सांगूं नकोस' असें बजाविलें असतानांहि या गृहस्थानें आपल्या बायकोला ही घटना सांगितलीच. श्रींचा कोप होऊन श्री बाबा तिथून जे निघाले ते तडक पावंजा नदीवर आले. पावंजा नदीच्या पैल-तीराला जाण्यासाठीं कांहीं साधन नसल्याचें पाहून पाण्यावरून चालत जात असतांना श्री बाबांना अनेकांनीं पाहिलें. ऐलतीराला उभे असलेले लोक हा प्रकार पाहून आश्चर्यानें थक्क होऊन गेले. वर म्हटल्याप्रमाणें काननगडच्या वास्तव्यांत श्रीबाबांनीं 'गुरुबन' नांवानें ओळखली जाणारी भूमि पावन केली. त्या ठिकाणीं पाण्याची सोय नसल्यामुळें आपल्या सामर्थ्यानें श्री बाबांनीं डोंगरावरून पाणी आणून गोमुख बांधून त्यांतून तें पाणी बाहेर सोडण्याची व्यवस्था केली. हीच ती पापनाशिनी गंगा. धर्मस्थळ या जागीं तर श्री बाबांनीं हजारों चमत्कार करून दाखविले. श्री बाबांच्या नांवाचा गांवोगांवीं गजर होऊं लागला आणि या महापुरुषाच्या दर्शनासाठीं थवेच्या थवे लोटूं लागले. मुलकी गांवांत तर श्री बाबांनीं हजारों लोकांना अन्न वाटण्यास सुरुवात केल्याचें पाहून हें अन्न आलें कुठून याचें प्रत्येकास आश्चर्य वाटून श्रींच्या सामर्थ्याची खात्री पटली. कुंबळा गांवीं तर श्री बाबांनीं समुद्रकिनारीं खेळत असलेल्या मुलांपैकीं एकाला उचलून समुद्रांत फेंकून दिलें. तेथील मंडळींना या प्रकारानें श्री बाबांचा राग येऊन श्री बाबांना मारण्यासाठीं ती मंडळी धांवली. परंतु श्री बाबा हंसून समुद्राकडे बोट दाखवूं लागले आणि आश्चर्य हें

कीं तें मूल समुद्रांतून धांवत धांवत किनारीं येत असल्याचें सर्वांनीं पाहिलें. याच गांवीं विदेही अवस्थेंत फिरणाऱ्या या अवधूताचा अधिकार न ओळखून एका मूर्ख इसमानें श्री बाबांच्या हाताला फडकीं बांधून त्याला केरोसीन लावून पेटवून दिलें. परिणाम असा झाला कीं थोडक्याच वेळांत तो मूर्ख इसम अंगाला वेदना होऊन मरण पावला. याच ठिकाणीं अप्पय्या नांवाचा एक दुष्ट अवलिया राहात होता. तो आपल्या सिद्धीनें लोकांना उपद्रव देत असे. लग्नसमारंभप्रसंगीं श्री बाबांना कुणी भक्तानें बोलाविलें होतें. भक्ताच्या प्रेमासाठीं श्री बाबा त्या ठिकाणीं गेले. हा दुष्टबुद्धि अप्पय्या तिथें हजर होताच. त्यानें श्री बाबांना तंबाखू खावयास दिला. श्री बाबांनीं अंतर्ज्ञानानें जाणलें कीं हा विषमिश्रित तंबाखू आहे. श्री बाबांनीं तो तंबाखू त्या अप्पय्याच्या पुढ्यांत खाऊनहि टाकला. थोडक्याच वेळांत हा अप्पय्या ओकूं लागला आणि त्यांतच त्याचा अंत झाला. पुढें बंटवाळ या गांवीं आल्यावर श्री बाबांची अवधूत–दशा कांहीं लोकांना समजूं न शकल्यामुळें ते बाबांची निंदा करूं लागले. कुणी त्यांना दगड मारूं लागले, 'वेडा वेडा' म्हणून श्री बाबांना संबोधूं लागले. श्री बाबांनीं निमूटपणें गांव सोडलें. श्री बाबा गेल्यानंतर थोडक्याच वेळांत नेत्रावती नदीला पूर आला आणि निसर्गाचा कोप होऊन तेथील गांवकऱ्यांची बरीच हानि झाली. गांवकरी श्री बाबांच्या शोधांत निघाले परंतु बाबा कुठले थांबायला? तोंपर्यंत ते दुसऱ्या ठिकाणीं पोचले होते. पुढें पडबिद्री या गांवीं श्री बाबा गेले. तिथेंहि अनेक चमत्कार घडले. त्या गांवांतील एका टांगेवाल्यानें रस्त्यांतून श्री बाबा हालत नाहींत असें पाहून त्यांना मारण्यास सुरुवात केली. परंतु आश्चर्य हें कीं चाबकाचे वळ त्या टांगेवाल्याच्याच अंगावर उठले! त्याचें अंग सुजून आलें. उडपी गांवांत तर श्री बाबांच्या लीला पाहून सारा गांव मंत्रमुग्ध होऊन गेला. सुरुवातीला श्री बाबांचा अधिकार न समजून तेथील लोकांनीं त्यांना

उपद्रव दिला. वार्षिक रथोत्सवाच्या मंगल प्रसंगीं श्री बाबांनीं रथावर रेती फेकली आणि चमत्कार असा झाला कीं त्या रेतीचें रूपांतर सोन्या-चांदींत झालें. श्री बाबांचें सामर्थ्य तेथील लोकांना पटलें आणि सारा गांव श्री बाबांच्या भजनीं लागला. काननगड येथें वास्तव्य करीत असतांना असा एक प्रकार घडला कीं जो सांगितल्यावांचून राहावत नाहीं. श्री बाबांनीं ध्यानासाठीं पडीत किल्ल्याला लागून एक भुयार निवडलें होतें. या भुयारी रस्त्याच्या तोंडाशीं श्री बाबा ध्यानस्थ बसत. त्याजवळील विभागांतील फुलझाडांना पाणी घालणारा माळी श्री बाबांना पाहून अद्वातद्वा बोलूं लागला. श्री बाबा गप्पच होते. 'इथून निघून जा' असें तो दरडावणीच्या स्वरांत श्री बाबांना सांगूं लागला. श्री बाबा उत्तरहि देईनात किंवा उठूनहि जाईनात. नाहीं म्हणावयास एकदां त्यांनीं त्याला सांगून पाहिलें कीं आपण या ठिकाणीं कुणालाहि उपद्रव देत नसून केवळ ध्यानस्थ बसण्यासाठीं ही जागा अनुकूल असल्यामुळें निवडली आहे. तो कांहीं केल्या ऐकेना. श्री बाबा जागचे हालत नाहींत असें पाहून तो पोलीसाला घेऊन आला. या माळ्याच्या खाकेंत छत्री होती. शेजारीं पोलीस उभा होता. 'कसला देव आणि कसलं काय? नीघ इथून' असें पुन्हा दरडावणीच्या स्वरांत हा माळी ओरडूं लागला. श्री बाबांच्या सहनशीलतेची परमावधी झाली. रागानें श्री बाबांनीं त्या माळ्याच्या खाकेंतील लोखंडी छत्री ओढून जोरानें त्याच्या पायावर आपटली. 'देवा देवा' करीत तो माळी रडूं लागला. 'आठवला देव आतां' असें बोलत श्री बाबा तिथून चालूं लागले. या माळ्याच्या पायांतून भळभळा रक्त वाहूं लागलें. त्या मोडक्या छत्रीचा लोखंडी पत्रा जखम करून राहिला होता. श्री बाबांवर कोपून त्या माळ्यानें फिर्याद नोंदली. त्यानंतर कांहीं दिवसांनीं श्री बाबा नदीवर गेले असतांना माळ्यानें दाखल केलेल्या फिर्यादीचें समन्स घेऊन पोलीस बजावण्या-साठीं आला. श्री बाबांनीं हें अंतर्ज्ञानानें अगोदरच जाणलें होतें. याच


वेळेस श्री बाबांनीं इतके दिवस कमरेला अडकविलेली लंगोटी सोडून नदीकिनारीं असलेल्या एका खडकावर रागानें आपटली. आणि नग्न स्थितींत संचार करूं लागले. इकडे केस उभी राहावयाची वेळ आली. ज्या न्यायाधिशापुढें ही केस निघणार होती तो आरोपीचें 'श्री नित्यानंद स्वामी' हें नांव पाहून क्षणभर किंकर्तव्यमूढ झाला. कारण त्याला त्याच्या आईनें सांगितलें होतें कीं त्याच्या बालपणीं म्हणजे तो कांहीं महिन्यांचा असतांना श्री बाबांच्या चरणीं त्याला ठेवून बाबांचा आशीर्वाद घेऊन घरीं आणलें होतें. श्री बाबांच्या कृपेनेंच या न्यायाधीशाला उर्जितावस्था प्राप्त झाली होती अशी त्या घराण्याची श्रद्धा होती. अशा सत्पुरुषाला आपल्यासमोर आरोपी म्हणून उभें केलें जाण्याची कल्पनाच त्याला मानवेना. तो न्यायाधीश अस्वस्थ झाला होता. दरम्यानच्या काळांत भक्तांनीं श्री बाबांवर अशी केस चालवूं नये अशा आशयाचा त्यावेळच्या ब्रिटिश राज्यसरकारला दिल्ली मुक्कामीं अर्ज केला होता. काय चमत्कार घडला कुणास ठाऊक! पण ती केस न चालतां श्री बाबा मुक्त झाले.

श्री बाबा त्या वेळेपासून पायीं जे निघाले ते फिरत फिरत मुंबईंत आले. कांहीं दिवस चिराबाजार या विभागांत राहून कुर्ल्याला पाण्याचे पाईप ज्या भागांतून जातात त्या निर्जन ठिकाणीं राहूं लागले. याच सुमारास श्री बाबांचे शिष्य श्री. जनानंद स्वामी मुंबईतील शीव या भागांत श्री बाबूराव खाडे यांच्या निवासस्थानीं आले होते. श्री जनानंदस्वामी आपल्या परमभक्तांना म्हणाले 'अरे! माझा गुरु कुर्ल्याला उतरला आहे. त्याला जाऊन घेऊन ये. तो येईपर्यंत मी कांहीं गोड पदार्थ तोंडांत घेणार नाहीं!' गुरूची आज्ञा शिरसावंद्य मानून श्री. खाडे श्री बाबांच्या शोधांत कुर्ल्याला आले. त्या वेळचें कुर्ल्याचें स्वरूप आणि आतांचें स्वरूप यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे. कुर्ल्यासारख्या ठिकाणीं, विशेषतः ज्या मार्गानें पाण्याचे पाईप नेले आहेत त्या विभागांत, फिरकणें प्रायः अशक्यच. गर्द झाडी, वाहनांची महर्गता, फारशी वस्ती नाहीं अशा


वातावरणांत त्या विभागांत सहजासहजीं कुणी जावयास धजत नसे. श्री. खाडे शोधीत शोधीत निघाले. सांगितलेल्या मार्गानें जातां जातां त्यांना त्या पाईपाच्या मागें श्याम वर्णाची लंगोटी लाविलेली एक व्यक्ति कमलपत्रावर पाण्याचा थेंब हालवत असलेली दिसली. विदेही अवस्थेंत 'जीवन इतकं क्षणभंगुर आहे' असें त्या कमलपत्रावर हालणाऱ्या पाण्याच्या थेंबावरून जीवनाचें मिथ्यात्व पटवून देणारी व्यक्ति श्री बाबाच होत अशी श्री. खाडे यांची खात्री पटली व 'बाबा, मी आपल्याला न्यावयास आलो आहें. श्री जनानंदस्वामी आपण आल्याशिवाय कांहीं उष्टवणार नाहींत' अशी काकुळतीच्या स्वरांत श्री. खाडे बाबांना विनंती करूं लागले. 'त्यालाच वाढ म्हणजे मला पोंचलें. जा आतां' असें सांगून श्री बाबांनीं श्री खाडे यांना परत पाठविलें. श्री. बाबांच्या वास्तव्यांत कुर्ल्याला सुद्धां अनेक चमत्कार घडले. आपल्याभोवतीं पुन्हा गर्दीचें वलय पसरत असल्याचें पाहून श्री बाबा कान्हेरी गुहेंत राहावयास गेले. तेथें कांहीं दिवस राहून श्री बाबा वज्रेश्वरीस आले. वज्रेश्वरीहून ते नंतर श्रीक्षेत्र गणेशपुरी येथें आले. येथें येण्याअगोदर एक विलक्षण घटना घडली होती. श्री क्षेत्र गणेशपुरी येथील वैकुंठाश्रमाला लागून असलेल्या कुंडांजवळ श्री शंकराचें एक पुरातन देवालय आहे. या देवालयासंबंधीं असें सांगतात कीं या देवळांत रात्रौ कुणीहि वस्ती करूं शकत नसे. जो कुणी रात्रौ या देवळांत मुक्काम करीत असे त्याला भयानक स्वप्नें पडत असत; अंगावर कुठूनतरी मोठे वृक्ष पडत आहेत असा भास होत असे. या प्रकारामुळें या देवळांत रात्रौ कुणीहि राहाण्यास धजत नसे. सुमारें १९२७–१९२८ च्या सुमारास या देवळांत एक गुजराथेकडील साधु राहावयास आला होता. हा साधु निर्भयपणें या देवळांत राहूं लागल्याचें पाहून गांवांतील सर्व गांवकऱ्यांना आश्चर्यच वाटलें. या गांवांत वास्तव्य करून असणारी एक वृद्ध गुजराथी बाई या देवळांत येऊन

दिवा लावण्यासाठीं तेल पुरवीत असे. थोडयाच दिवसांत हा साधु गांवांतील सर्वांच्याच श्रद्धेचा आणि चर्चेचा विषय होऊन बसला. एके दिवशीं भल्या पहांटेस हा साधू उठला आणि देवळापासून ते थेट दूरच्या एका घरापर्यंत पांचजन्य करीत ओरडतच धांवू लागला. सर्वांना वाटलें कीं हा साधु बहुधा वेडा झाला असावा. श्री. गांधी नांवाचे गांवांतील एक प्रतिष्ठित वृद्ध नागरिक 'तुला काय हवें आहे?' म्हणून विचारूं लागले. तो साधु पांच मोठे खिळे मागूं लागला. श्री. गांधी यांनीं पांच खिळे आणून दिले. तो साधु त्यानंतर परतला आणि वैकुंठाश्रमाच्या रस्त्यानें एक एक खिळा ठोकत गेला. एक खिळा त्यानें कैलासाजवळहि ठोकला. अशा रीतीनें फर्लांगाफर्लांगावर ते पांच खिळे ठोकले. सर्व गांवकरी हा प्रकार आश्चर्यचकित नजरेनें पाहात होते. शेवटीं हा साधु सर्वांना उद्देशून म्हणाला, 'अरे बाबांनो! या रस्त्यानें पुढच्या वर्षीं एक महापुरुष जाणार आहे म्हणून रस्ता आंखून ठेवतों आहें.' साधूच्या या शब्दांतील भविष्यवाणी त्यावेळीं अर्थातच कुणाला समजूं शकली नाहीं. त्यानंतर तो साधु गणेशपुरी सोडून गेला. दुसऱ्याच वर्षीं अचानकपणें श्री बाबांचें आगमन या गावांत झालें.† श्री बाबा इकडे आल्यानंतर जे स्थायिक झाले ते अजूनहि. जवळजवळ गेल्या तीस वर्षांच्या कारकीर्दींत लाखों जडजीवांचा उद्धार करीत असतांना इतकीं वर्षें उपेक्षिलें गेलेलें तें खेडें शाळा, दवाखाने, हॉस्पिटल, उपाहारगृहें, म्युझियम, यात्रेकरूंच्या सोई करण्यास उत्सुक असलेल्या इमारतींनीं सजविलें. या खेडयांत राहाणाऱ्या आदिवासी आणि कुणबी समाजाला संस्कृतीचा सोनेरी अलंकार घालून भक्तीच्या पाण्यानें त्यांचीं मनें श्री बाबांनींच आपल्या कृपेनें भिजविलीं. आजची गणेशपुरी आणि त्यावेळचें गणेशपुरीचें स्वरूप पाहूं गेलें असतांना

† ही घटना श्री. दादा गांधी यांच्याकडून समजली.



गुरुवनांतील गुहा (पृष्ठ ७)



गुहाक्षेत्र

(पृष्ठ ७)

हिंस्र श्वापदांनीं भरलेले, मलेरियासारख्या दुर्धर रोगराईंनीं पीडलेलें, संस्कृतीनें मागासलेलें, शिक्षणाला विन्मुख होऊन बसलेलें हें खेडें अखिल महाराष्ट्रांत आदर्शवत् करून टाकलें आहे असेच उद्गार प्रत्येकजण हें गांव सोडतांना काढीत असतो. श्री बाबांनीं या खेड्याचा केलेला कायापालट पाहूं जातां शहरांतून या खेड्यांत येणाऱ्या कुणाहि भक्त-अभक्ताला शहराच्या सुखसोईंनीं अद्यावत् असलेलें खेडें जीवनांतील एक श्रद्धास्थान होऊन राहिलें आहे असें वाटतें. पहांटेच्या वेळेला गोड सुरांत श्री बाबांची घरोघरीं चाललेली आरती, 'ॐ नमो भगवते नित्यानंदाय' या भक्तिप्रेमानें न्हाऊन निघालेल्या जपाचा सतत चाललेला उद्घोष ऐकून सर्वांच्याच डोळ्याचें पारणें फिटतें.

सर्व गांवाला वळसा घालून वहाणारी तानसा नदी भक्तिप्रेमानें झुळझुळू वाहात आहे, जागोजागीं उगवलेलीं उष्ण पाण्याचीं कुंडें या सिद्ध भूमीवर अभिषेक करण्यासाठीं जणूं भक्तिप्रेमानें उचंबळून वर उड्या घेत आहेत, संतसत्पुरुषाच्या स्पर्शानें तेजोमय झालेला मंदाग्नि मेरुदंडाप्रमाणें समोर उभा आहे, गांवांत भक्तिप्रेमाची पेठ उघडून प्रेमाचा आणि सौजन्याचा व्यवहार चालू आहे, दूरदूरच्या प्रदेशांतून येणारे भाविक यात्रेकरू शंकराच्या देवळाला लागून असलेल्या कुंडाबरोबर तानसा नदींतील कुंडांतहि आपले त्रिविध ताप बुडवून हलक्या आणि हळुवार मनानें श्री बाबांचें महाद्वार केव्हां उघडतें म्हणून देवाला भेटण्यासाठीं उत्सुक झाले आहेत, महाद्वार उघडायला अजून वेळ आहे असें पाहून भक्तिप्रेमानें आर्द्र झालेला भक्त कुंडाजवळील आश्रमांत ध्यानस्थ बसलेल्या साधुलक्ष्मीच्या दर्शनासाठीं जात आहे. श्री बाबांच्या कैलासाश्रमाच्या प्रदक्षिणेच्या वाटेवर असलेल्या आश्रमांत वास्तव्य करणाऱ्या दयामूर्ति श्री शाळीग्रामस्वामींचें दर्शन घेऊन भक्त पावन होत आहे आणि श्री बाबा कैलासाच्या शिखरावरून डोळे

भरून हा सर्व नियतीचा खेळ पहात आहेत. 'करता करविता तो—मी नव्हे....मी केवळ निमित्त' अशा शब्दांत या सर्व मायारूपी जगाच्या रंगभूमीवर चाललेला खेळ निर्गुण, निराकार, निरामय अशा चिरंतन शक्तीवर सोपवून तटस्थपणें पाहात आहेत. शाश्वत सुखाची आणि समाधानाची अनुभूति घेऊन परतणारा प्रत्येक भक्त श्री बाबांचें अवतारी स्वरूप जाणून कलियुगांत जडजीवांचा उद्धार करण्यास देव आकाशांतून खालीं उतरला अशा आशयाचे कृतज्ञतेचे उद्‌गार काढून परतत आहेत. भारतांत आणि भारताबाहेरीलहि भक्त श्रीक्षेत्र गणेश-पुरी येथें येऊन ओंजळभर स्फूर्ति घेऊन समाधानाचा प्रत्यय आल्याचें परमभाग्य मानून सुखानें परतत आहेत.

देवाकडे देण्यासारखें खूप आहे. अनंत हस्तें कमलावरानें देतां किती घेशिल दो करानें? श्री बाबांचें आत्मज्ञान आणि धगधगीत वैराग्य पाहून आकर्षित झालेला भक्त बाबांची सेवा करण्यास उत्सुक झाला आहे. श्री बाबांनीं ज्या आपल्या अमर तत्त्वज्ञानानें मानवाला सुखाचा शोध लावून दिला त्या अमर तत्त्वज्ञानाचा सुगंध अखिल जगांत दरवळो! अखिल जगांत शीत युद्धाच्या तणातणींत स्वसंरक्षणासाठीं शस्त्रीकरणाचें समर्थन केलें जात असतांना सारें जग भीतीनें व्याकुळ झालें आहे. अणुबॉम्बसारख्या अण्वस्त्रांचे शोध लागले. विज्ञान पुढें गेलें. अध्यात्म मागें राहिलें. विज्ञान आणि अध्यात्म यांच्या मीलनानेंच जागतिक शांति प्रस्थापित व्हावयाची आहे. अशा मीलनासाठीं आजच्यासारखा अन्य सुमुहूर्त नाहीं हें जगांतील एका कोपऱ्यापासून ते दुसऱ्या कोपऱ्यापर्यंत अखिल मानवजातीला पटलें आहे. 'शांततामय सहजीवन' हा आदर्श आतां शब्दाच्या गोषांतून बाहेर पडून जगांत उघड्या तोंडानें नांदावयास बाहेर आल्याशिवाय जागतिक शांति ही केवळ घोषणाच ठरणार आहे. शांति का युद्ध? यांपैकीं एकाची निवड मानवजातीला या सुमारास

करावयाची आहे. निर्णय घ्यावयास आतां वेळ नाहीं. अशा वेळीं शांति आणि समाधानाचा प्रत्यय आणून मानवाला आत्मनिष्ठ बनवून आत्मसाक्षात्काराचा किंवा आत्मप्रबोधाचा प्रत्यय आणून देणारा श्री बाबांचा अविस्मरणीय ध्वनि भारताबाहेरहि पोंचावयास हवा. त्यासाठीं तनुत्याग करणारे आत्मसाक्षात्कारी सेवक हवेत. अशा सेवकांचें श्रीबाबा स्फूर्तिस्थान असून त्यांना 'जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती' या न्यायानें हात धरून पृथ्वीगोलावर फिरविण्यास श्री बाबा समर्थ आहेत. अखिल मानवजातीच्या उद्धारांतच चंदनाप्रमाणें देह झिजविणाऱ्या भक्ताची सेवा श्री बाबांच्या चरणीं रुजू होणार आहे. अखिल मानवजातीचें दास्य आणि दैन्य पाहून कळवळणारा देव कैलासावर बसून चारी दिशांना अहोरात्र सुख आणि शांति यांनीं तुडुंब भरलेलीं आपल्या दोन्ही डोळ्यांच्या कडांना असलेलीं सरोवरें रितीं करीत आहे. मानवा! चल—पुढें चल! अजून वेळ गेलेली नाहीं....!

# परमश्रेष्ठ अवधूतच !

ऋषीचें कुळ आणि नदीचें मूळ शोधण्यांत कुठलाच फायदा नसतो. श्री बाबांचा जन्म कुठें झाला, ते कुठें वाढले, त्यांनीं शिक्षण कुठें घेतलें, योगशास्त्राचा अभ्यास कुठें केला, वगैरेविषयीं प्रश्न साहजिकच मनांत येतात. परंतु या प्रश्नांचा विचार करण्याऐवजीं श्री बाबांचें खरें स्वरूप काय ? थोडक्यांत बाबा ही व्यक्ति आणि कार्य याचा विचार करणें यांतच भक्ताचें खरें हित आहे असें मला वाटतें. श्री बाबांच्या बाबतींत मीं जें पाहिलें किंवा ऐकलें तें जसेंच्या तसें वर सांगितलें असलें तरी केवळ तेवढ्यावरून बाबांच्या व्यक्तिमत्वाची उंची मोजूं जाणें केव्हांहि अशक्यप्रायच आहे. श्री बाबांच्या मुखांतून जे कांहीं शब्द बाहेर पडतील ते टिपून त्यांतून बाबांच्या मानसिक खोलीचा तळ गांठतां येतो किंवा काय म्हणून पाहावयास जावें तर ते शब्द हा तळ गांठण्यासाठीं एखाद्या सिद्धपुरुषाची मदत अटळ आहे असेंच दाखवून देतात. बरें, बाबा सतत बोलत राहातील असेंहि नाहीं. बोलले जरी नाहीं तरी न बोलतां असंख्य भक्तांचें रक्षण गणेशपुरींत राहून करीत असल्याचें प्रत्ययास येऊन बाबा आहेत तरी कोण याची मनाला भ्रांत पडून राहाते.

बाबांच्या एका भक्ताला व माझ्या एका फार जुन्या मित्राला दादर येथें अपघात झाला तेव्हां गणेशपुरीला ध्यानस्थ असतां 'अरे अपघात झाला' असे उद्‌गार काढून त्या व्यक्तीच्या समाचारास गणेशपुरीहून तात्काळ एका माणसाला रवाना केल्याचें माझ्या माहितींत आहे. भुताटकीच्या दुकानांत होणारी आदळआपट ऐकून भिऊन पळूं पाहाणाऱ्या दुसऱ्या एका भक्ताला 'भिऊं नकोस, तिथेंच रहा' म्हणून

सांगून झाल्यावर तीनच दिवसांत प्रत्यक्ष बाबा आपलें रक्षण करीत आहेत असा त्या भक्ताला अनुभव येऊन भुताटकीचा प्रकार एकदम बंद पडल्याचें त्या भक्तानें सांगितल्याचें लेखकाला माहीत आहे. रान-मांजराच्या रूपानें दर्शन देऊन रक्षण केल्याचें सांगणारा दुसरा एक भक्त लेखकास ठाऊक आहे. गुरुचरित्राचें पठण करीत असतांना शेजारीं उभ्या असलेल्या नागाला तटस्थपणें जागच्या जागीं श्री बाबांनीं उभा करून त्या भक्ताचें रक्षण केल्याचेंहि लेखकानें ऐकलें आहे. अशीं असंख्य उदाहरणें देतां येतील कीं ज्यावरून मौनव्रत धारण करूनहि आपल्या पिलांचें केवळ दृष्टीनें पोषण करणाऱ्या कांसवीप्रमाणें श्री बाबा आपल्या भक्तांचें रक्षण करीत आहेत. प्रत्यक्ष लेखकाला असे कित्येक वेळां अनुभव आले आहेत कीं ज्यावेळीं अंतर्मनाला कुणीतरी व्यक्ति मार्गदर्शन करीत आहे, एवढेंच नव्हे तर ती शक्ति चहूंबाजूंनीं रक्षण करीत आहे याची अनुभूति आली आहे. कधीं रागावून, कधीं हंसून, कधीं मौनव्रत धारण करून, प्रसंगीं शिव्या मोजून जडजीवांचा उद्धार करीत असलेले बाबा आहेत तरी कोण, त्यांचें दूतकर्म तरी काय याची कल्पना येण्यासाठीं कोणा सिद्धपुरुषाची गांठ पडावी असें वाटत असतांनाच पू. मुक्तानंद-स्वामी यांची गांठ पडली.

गणेशपुरीपासून फर्लांग दोन फर्लांगांवर असलेल्या गांवदेवी विभागांत असलेल्या आश्रमांत वास्तव्य करणारा हा सिद्धपुरुष बाबांची ओळख करून द्यावयास समर्थ आहे याची खात्री पटली. तीस वर्षांपूर्वी नाशिक जिल्ह्यांतील येवलें या गांवीं 'मंदर मंदर, मठमठ' करीत आलेला एका सोळा सतरा वर्षांचा बालयोगी थोडक्याच दिवसांत सोन-गिरीकराच्या मठाकडे हजारों लोकांचे पाय वळवूं लागला. अंगीं अस-लेल्या गुणांनीं साधुत्वाचें वलय पसरावयास वेळ असा लागलाच नाहीं. सुकीच्या एका शेतकऱ्याच्या बायकोला विहिरीचें पाणी काढीत असतांना झालेल्या मारुतीच्या दृष्टान्तानंतर सोनगिरीचा मठ सोडून सुकी गांवांत

आपली तपस्याभूमि करून हजारों लोकांना आपल्या साधुत्वाचे विविध अनुभव देऊन चाळीसगांवीं ब्रह्मराक्षसानें वेढलेल्या भूतखाना नांवाच्या वाड्यांत वास्तव्य करून तिथेंहि हजारों जडजीवांचा उद्धार करून अनेक तीर्थांवर तपश्चर्या करीत करीत सद्गुरुशोधनार्थ फिरत असतां तो बालयोगी नशिराबादला एका साधूकडे येऊन ठाकला. त्या साधूचें नांव झिप्रुअण्णा. गुरूपदेशासाठीं आपण चहूंकडे फिरलों, रमणमहर्षींना सुद्धां भेटलों, अनेक तीर्थांवर मान्यता पावलेल्या ऐंशी ते नव्वद साधूंना भेटलों, परंतु मनाची तृप्ति व्हावी तशी होत नाहीं असें सांगतांच विदेही अवस्थेंत जीवन व्यतीत करणारे झिप्रुअण्णा बोलले कीं, तुझा गुरु वज्रेश्वरींत आहे. श्री मुक्तानंद महाराज जे निघाले ते तडक वज्रेश्वरींत आले. श्री बाबांची व त्यांची भेट होतांच 'युगन युगनकी तृषा बुझाती' या न्यायानें कित्येक वर्षांची तहान भागली, मन निववलें गेलें.

ज्या साधूंना नग्नावस्थेंत तीस वर्षांपूर्वीं मंगळूर शहरांत पाहिलें होतें तेच साधु आपल्यासाठीं नियतीनें नियुक्त करून ठेवल्याचें पाहून त्यांना भरतें आलें. श्री बाबांनींच आपला शक्तिपात घडवून आणला असें कृतज्ञतेनें सांगून, बाबारे! हा एक परमश्रेष्ठ अवधूत गणेशपुरींत लीला खेळून आहे असें गहिंवरून श्रीस्वामी सांगतात. प्रेमळ शब्दांत सर्व भक्तांची विचारपूस करून सर्वांचे संशय दूर करतांकरतां ज्ञानामृत पाजणारी भक्तांची आई होऊन श्रीस्वामी राहिले आहेत. श्री बाबांच्या व्यक्तिमत्वाची ओळख पटवून घेत असतांना एका बुद्धिवादी परंतु दृढ श्रद्धावादी भक्तानें सरळ प्रश्न विचारला कीं चार भिंतींनीं व्यापलेल्या खोलींत साधना करणारे श्रीबाबा बाहेर येऊन हरिजन कॉलनी किंवा भंगी कॉलनींत अज्ञानानें आणि गरिबीनें ज्यांच्या जीवनांत एक तऱ्हेचें वैफल्य आलें आहे अशा गोरगरिबांचा उद्धार कां करीत नाहींत? त्यांच्या साधनेंचा बाह्य जगाला काय उपयोग? श्रीस्वामी म्हणाले कीं या प्रश्नामध्यें तुम्ही असें गृहीत धरून

चालतां कीं श्री बाबा खोलींत केवळ तटस्थ वृत्तीनें स्वतःचीच उन्नति करून राहिले आहेत. श्री बाबा जगाच्या उद्धारार्थ करीत असलेल्या प्रार्थनेचा बाह्य जगावर होणारा परिणाम गुप्त व अदृश्य असला तरी बाबांच्या दर्शनानें आपलें मन निववीलें गेलें अशी भावना व्यक्त करून परतणाऱ्या हजारों जीवांचें सुख तरी दृश्य आहे ना ? ही काय कमी सेवा झाली ? जें हजारों व्याख्यानांनीं किंवा पुस्तकें लिहून व वाचून होऊं शकत नाहीं तें केवळ बाबांच्या एका कृपादृष्टीनें होऊं शकतें हा हजारों लोकांचा अनुभव तर दृश्य आहे ना ? मग आणखी सेवा ती कुठली शिल्लक राहते ?

पण बाबा जमलेल्या भक्तांना उपदेश असा कां करीत नाहींत ? पहिल्या प्रश्नाला मिळालेल्या उत्तरानें समाधान होऊन तो भक्त दुसऱ्या एका विषयाला चालना देऊन राहिला."

"उपदेश करीत नाहींत म्हणण्यापेक्षां व्याख्यान कां देत नाहींत" असाच प्रश्न आपला आहे ना ?"

"हो."

"यतीयतीमध्यें अनेक प्रकार असतात. प्रकार अनेक असले तरी कार्य एकच असतें. श्री बाबा जरी सामान्यतः मौन धारण करीत असले तरी सूचक शब्दांनीं, आचारांनीं स्वप्नांत जाऊन देत असलेले 'आदेश' व्याख्यानापेक्षां प्रभावी नाहींत, असें म्हणण्याचें कोण धाष्टर्य करील ?"

'बाबांचें आपण कसें वर्णन करूं शकाल'—मी

'बाबांना तुमच्या आमच्यासारखी व्यक्ति मानली तर बाबांचें वर्णन करतां येईल. परंतु श्री बाबा परमात्म्याच्या रूपांत संमिश्र होऊन शुद्ध अवस्थेंत शरीर धारण करीत आहेत हें पटल्यावर श्रीबाबा वर्णनातीतच ठरतात. तरी सुद्धां मानवी मनाच्या समाधानासाठीं असें सांगतां येईल कीं श्री बाबा हे परमश्रेष्ठ अवधूत आहेत. शंकराचार्यांच्याच शब्दांत श्रीबाबांचें अशा रीतीनें वर्णन करतां येईल.—

मौने मौनी गुणिनि गुणवान् पंडिते पंडितो वा
दीने दीनः सुखिनि सुखवान् भोगिनि प्राप्तभोगः ।
मूर्खे मूर्खो युवतिषु युवा वाग्मिनि प्रौढवाग्मी
धन्यः कोऽपि त्रिभुवनजयी योऽवधूतेऽवधूतः ॥

श्रीबाबा सर्वांच्या विश्रांतीचें स्थान होऊन राहिले आहेत. त्यांच्यापुढें विकार निर्विकार होतात. किंबहुना लय पावतात. मनाचे संताप तेथें नांवालाहि शिल्लक राहात नाहींत. फार काय, मन शांत होतें. निवतें. एखाद्या सरोवराकांठीं थकल्याभागल्या पामरानें जाऊन बसावें व शांत होऊन परतावें तसाच कांहींसा हा प्रकार. पाण्याची निर्मलता तापलेल्या मनाला शांत करते. निर्मलता स्वयंप्रचारकच. श्रीबाबांची परब्रह्म-स्थितीहि अगदीं तशीच आहे.

गरिबांपासून ते अमीर उमरावांपर्यंत उभ्या भारतांतील, फार काय परदेशांतील, मंडळीसुद्धां बाबांचें दर्शन घेऊन परतत असतांना 'हरवलें तें गवसलें,' अशी भावना घेऊन 'आनंदे गदारोळें' नाचत जातात ही केवढी मोठी सेवा? वस्तुतः पाहूं गेल्यास बाबांचें शरीर-दर्शन इतर शरिरांहून भिन्न नाहीं. हाडामांसानें लिंपलेल्या इतर देहमूर्ती-पेक्षांहि कृष्णमूर्ति शरीर शास्त्रानें दाखवून दिलेल्या शरीरयष्टीपेक्षां वेगळी नाहीं. परंतु ह्या देहमूर्तीसमोर उभा ठाकलेला कुणीहि भक्त अभक्त जी अनुभूति संपादन करतो ती पाहिल्यावर या आनंदाचा झरा या शरिराच्या पोतडींत कुठें दडला आहे याचा विचार करतां करतां अंतर्मुख होतो. त्या शरिरांत लपलेलें चैतन्य हाच तो झरा नव्हे काय? आणि तेंच चैतन्य अंवतीं भंवतीं दिसणाऱ्या सृष्टींत पूर्णत्वानें भरलेलें आहे याची पुरती ओळख पटल्यामुळें 'अवघें विश्वचि माझें घर' म्हणून बुद्धीचा झालेला स्थायी भाव हाच त्याला कारणीभूत नाहीं काय? जो कुणी श्रीबाबांच्या दर्शनासाठीं जातो तो परत येतेवेळीं श्रीबाबांना आपल्या जीवीचें जीवन मानून परततो. आपल्या आशाआकांक्षा

श्री बाबांच्या चरणींच फलद्रूप होतील अशी भावना घेऊन तो परततो. वस्तुतः बाबा आणि दर्शनपिपासु भक्त यांच्या दरम्यान दृश्य व्यवहार असा कांहींच नाहीं. कांहीं देणें नाहीं, कांहीं घेणें नाहीं. दर्शनपिपासु भक्त आणि त्याच्या श्रद्धेची व भक्तीची निरामय निर्विकार अशी श्रीबाबांची देहयष्टि ! दोघांच्या दरम्यान दृश्य व्यवहार असा कांहींच नाहीं. परंतु केवळ दर्शनानें तृप्त होऊन सुखाचा शोध लागल्यागत परतणारा भक्त अखंड सुखाचा चिंतामणि–कृष्णमणि–घेऊन परततो हा नित्याचा अनुभव आत्मप्रत्ययच आणून देत नाहीं काय ?

श्री बाबा चार भिंतींच्या आंत राहून केवळ आत्मोन्नति करून राहिले आहेत हा केवळ आभासच म्हणावा लागेल. केवळ अज्ञानामुळें महापुरुषाचें कार्य समजूं शकत नाहीं. सूर्यचंद्र स्वस्थानींच राहून साऱ्या विश्वाला प्रकाशमान करतात, हें तर खरें ना ? अमृत शिंपणारा शीतल चंद्र आपली जागा सोडून का घरोघरीं थंडावा शिंपत जातो ? गंगा आपल्या स्थानींच राहून येणाऱ्या जाणाऱ्या पांथस्थांना प्रेमाची पाणपोई उघडून देते ना ? महापुरुषाचें कार्य गंगेच्या पवित्र पाण्याप्रमाणें आहे. हें कार्य ओळखण्यासाठीं भक्ताच्या हृदयांत भावनिर्मिति व्हावयास हवी. पारमार्थिक चक्षु त्यासाठीं हवेत. 'भावे हि विद्यते देवो न पाषाणे न मृण्मये ॥ भाव तेथें देव। बहिणी म्हणे भावा इच्छा फलदानी। पावते निर्वाणी मोक्षपद ॥ भावनेची चंद्रज्योत अंतःकरणांत पेटल्याशिवाय अनुभवाचा सडा कसा पडावा ?

# संसारी जीवांसाठीं श्री बाबांचा संदेश

कोणीहि बाबांकडे जावो आणि कृपेची याचना करो, कीं 'आप-आपलें कर्म करा, उद्योग करा' अशा आशयाचा संदेश ठेवलेलाच. माणूस कांहीं आकाशांतून पडलेला नाहीं. त्याच्याहि पाठीं प्रवाह हा आहेच. प्रवाह हाच त्याचा स्वधर्म कीं जो अबाध्य आहे. स्वधर्माची अबाध्यता टाळूं म्हटलें तरी टाळूं जाणें अशक्य आहे. स्वधर्म हा आचरलाच पाहिजे. त्यांतूनच माणसानें आपली उर्जितावस्था गांठली पाहिजे असें श्री बाबांचें कळकळीचें सांगणें आहे.

संसारयात्रेंत देहाबरोबरच कर्म चिकटून आलें आहे. त्यांतून कोणाचीहि सुटका नाहीं. कर्मच मनुष्याला बंधनांत टाकण्यास कारणीभूत होत असतें आणि कर्मच मनुष्याला मोक्षाची वाट दाखवून देत असतें. एका बाजूनें पाहावें तर कर्म केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. दुसऱ्या बाजूनें पाहूं जावें तर कर्म मनुष्याला बंधनांत टाकून जन्ममरणाच्या फेऱ्यांत जखडून टाकीत आहे. मग अशा परिस्थितींत संसारी जीवानें काय करावें? कर्तव्याकर्तव्याचा बोध न झाल्यामुळें गोंधळलेल्या जीवाला श्री बाबा 'त्यागी गीता, त्यागी सीधा,' अशा सांकेतिक भाषेंत सुखाचा मार्ग दाखवून देतात. गीता त्याग शिकवते. फलत्याग शिकविते. आपण करीत असलेलें कर्म निरभिमानी, निरहंकारी आणि निरासक्त वृत्तीनें केलें असतां तें बंधनास कारणीभूत होऊं शकत नाहीं हाच गीतेचा महिमा, सामान्यांच्या बोलींत श्री बाबा सांगत असतात. फलत्याग करावयास शिकविणारा संदेश संसारी जीवाच्या हृत्पटलावर ठसवीत असतांना श्री बाबा पुन्हा पुन्हा सांगत असतात कीं गीता त्याग शिकविते. त्याग म्हणजेच फलासक्तीचा त्याग. फलासक्ति न टाकतां कर्म

करूं जाल तर पडाल परंतु फलासक्ति टाकून फळ उपभोगाल तर वर चढाल. देहाबरोबरच कर्म चिकटून आलें असल्यामुळें आहे ह्या परिस्थितींत संसारी जीवाच्या वांटयाला आलेलें कर्म निरहंकारी आणि निरासक्त वृत्तीनें पार पाडण्यांतच मानवी जीवनाचें सार्थक आहे हा श्री बाबांचा संदेश किती स्फूर्तिदायक आहे ?

नश्वर शरिराबद्दल आसक्ति बाळगून आत्म्याचें अमरत्व विसरून शरिराच्या रोगटपणाबद्दल कुणी तक्रार करूं लागला कीं 'शरीर मट्टी आत्मा अखंड,' असें सांगून श्रीबाबा शरिराची नाशिवंतता परंतु त्याचबरोबर या हाडामांसाच्या आंत कैद केलेल्या परंतु अमर असलेल्या चैतन्याची—आत्मतत्त्वाची—ओळख पटवून देतात. शरिराची ही खोळ आणि त्यांत लपलेला हा जीवात्मा यांची ओळख करून देतांना श्रीबाबा भगवान् श्रीकृष्णानें गाइलेला सांख्ययोगाचा महिमा समजून—नव्हे, उमजून–भागण्याव्यतिरिक्त अन्य मार्ग नाहीं असें दाखवून देतात.

गीतेच्या दुसऱ्या अध्यायांत दाखवून दिलेल्या सांख्ययोगाची इमारत तीन स्तंभांवर उभारली आहे. देहाची नाशिवंतता, आत्म्याची अमरता किंवा अजरामरता आणि स्वधर्मांची अबाध्यता, हेच ते तीन स्तंभ. जणुं जीवनयात्रेंत काळोख्या रात्रीं मार्गदर्शन करणारे दीपस्तंभच! साडेतीन हातांचा देह कीं ज्याचा भरंवसा नाहीं, हाडमांसरुधिर यांनीं भरलेला, मलमूत्रांनीं वाहून राहिलेला, बालपण, तारुण्य आणि वृद्धावस्था अशा अवस्था जगून शेवटीं सुकलेल्या पानाप्रमाणें एके दिवशीं गळणारा, कातडीनें आच्छादिलेला असा क्षुद्र देहाचा पापुद्रा, त्याचे चोचले तरी किती पुरवायचे ? जीवात्मा ज्या रथांतून चालला आहे त्या रथाची डागडुजी करणें जरी कर्तव्यरूप ठरत असलें तरी त्या रथाबद्दल आसक्ति ठेवून रथ हांकणाऱ्या सारथ्याचा विसर पडूं द्यावा हें शेवटीं दुःखासच कारणीभूत होत नाहीं काय ? 'आधीं पलंगीं झोपती। शेवटीं गोवऱ्यांची संगती। एकमेकाचीं दहनें पाहाती। परि शहाणे न

होती ॥' हे श्री तुकाराममहाराजांचे बोल शरिराच्या फुटणाऱ्या मातीच्या मडक्याची नश्वरता पटवून देणारेच नाहींत काय? मरतुकड्या शरिरावरच अमरत्वाचा आरोप अज्ञानानें करून रडणाऱ्या माणसाला हें कळत नाहीं कीं देह ज्या दिवशीं निर्माण झाला त्या दिवशींच तो मृत्यूचें भातुकें होऊन राहिला. मरे एक त्याचा दुजा शोक वाहे । अकस्मात तोही पुढें जात आहे ॥ हें अज्ञानानें विसरूं पाहाणाऱ्या माणसानें शरिराची नश्वरता ओळखावयास शिकण्यांतच त्याचें खरेंखुरें हित आहे. गीतेंत महायुद्धाच्या प्रसंगीं अर्जुनाला जो संभ्रम निर्माण झाला होता तो हाच कीं माझ्यासमोर ठाकलेल्या माझ्या काकामामांना मारून मी पापाचा धनी कशाला होऊं? शरिराची हत्या घडण्यामुळें आत्म्याची अमरता भंगूं शकत नाहीं. फार काय, नैनं छिन्दन्ति शस्त्राणि । नैनं दहति पावकः ॥ या न्यायानें आत्मा हत्येचा विषय होऊं शकत नाहीं, अग्नीचें भक्ष्यहि होऊं शकत नाहीं, पार्थिव साधनांनीं त्याचें अमरत्व नष्ट होऊं शकत नाहीं हें दाखवून देऊन अर्जुनाचा मोह दूर करून त्याला कर्तव्यप्रवृत्त करण्यासाठींच भगवंतांनीं गीता गाइली. मनुष्य विश्वनियामक शक्तीच्या हातांतील केवळ बाहुलें असून त्या सूत्रधाराच्या इच्छेनें या बाहुल्यांची हालचाल होत असल्यामुळें मी करतों किंवा तो करतो ही भाषाच अज्ञानमूलक आहे. विश्वशक्तीच्या कराल वदनांत सर्व जग बसलेलें असल्यामुळें तुझ्या क्षत्रियवृत्तीला धरून केलेलें धर्मयुद्ध तुला पापाप्रत नेईल ही भीति केवळ काल्पनिक आहे असें अर्जुनाला निमित्त करून प्राणिमात्रांच्या हितासाठीं भगवंतांना दाखवून द्यावयाचें होतें म्हणूनच युद्धाच्या निमित्तानें ही गीता गाइली.

देहाची नश्वरता संसारी जीवाला आकलन व्हावी यासाठीं वेळोवेळीं शरिराकडे पाहून 'शरीर मट्टी' असे उद्गार वरचेवर बाबा काढीत असतात. श्री बाबांचे हे उद्गार संसारी जीवाला अंतर्मुख करीत असतात. गुण आणि इंद्रियें यांनीं साठविलेली ही चामड्याची पिशवी,

कफ, पित्त, वात यांनीं परिपूर्ण भरलेली आणि सर्व सुखदुःखांचें माहेरघर होऊन राहिलेली ही देहाची खोळ पूर्वकर्मांचीं फळें भोगून संपविण्याकरितां जीवाला धारण करावी लागली. पित्याच्या रेतापासून ज्या शरिराच्या अस्थि, शिरा आणि मज्जा तयार झाल्या, मातेच्या शोणितापासून ज्या शरिराची त्वचा, मांस, रुधिर, निर्माण झालें असें हे देहाचें बिढार अखेर मातींतच मिसळून जावयाचें, याची संसारी जीवाला खात्री पटावी आणि देहासक्ति टाकून तो आत्मनिष्ठ व्हावा यासाठीं अंतःकरणाच्या तळमळींतून बाहेर पडणारे श्री बाबांचे बोल सत्यार्थानें खरे नाहींत काय?

मनुष्य जन्माला आल्यावर कर्म टाळीन म्हणूं जाईल तर तें कदापिहि शक्य नाहीं. दैनंदिन जीवनांतील शारीरिक क्रिया हीं कर्मेंच नव्हेत काय? तीं जिथें तो टाळूं शकत नाहीं तिथें कर्मशून्यत्वाची कल्पना संभवावी कशी? परमेश्वरानें मानवाच्या कर्माचे आरंभ मांडून ठेवले आहेत. आई जशी निवडावयाचें शिल्लक राहूं देऊं शकत नाहीं तसा स्वधर्म मनुष्याला चिकटूनच येत असतो. तो स्वधर्म निष्कामतेनें पार पाडण्यांतच कर्मयोगाची गुरुकिल्ली आहे. परधर्म जरी कितीहि मोहांत पाडणारा असला तरी स्वधर्माला सोडून परधर्माच्या मागें जाणें भयावह आहे असें भगवंतांनीं सांगितलें आहे. सजन कसाई मांस विकून आपलें भरणपोषण करीत असे. सांवता माळी 'कांदामुळाभाजी अवघी विठाबाई माझी' म्हणून गात गात स्वतःच्या वांट्याला आलेल्या स्वधर्मांतच परमेश्वराची करुणा पाहात असे. त्रिगुणाची करुनी मूस। आंत ओतीला ब्रह्मरस' म्हणत म्हणत नरहरि सोनार स्वतःच्या उद्योगांत परमेश्वराची ओळख पटवून घेत असे. 'आम्हीं वारीक वारीक करूं हजामत बारीक' असें म्हणत दुसऱ्याच्या डोक्यांतील मळ काढतां काढतां स्वतःची अंतःशुद्धि करूं पाहाणारा सेना न्हावी देवाचा अनुभव आणून देण्यासाठीं स्वधर्म सोडावयाला नको याचा आत्मप्रत्यय घेऊन राहिला होता. तात्पर्य, स्वधर्माचरण—स्वकर्माचरण अबाध्य असून तें निर्मोही वृत्तीनें

आचरलें असतां बंधनास कारणीभूत होऊं शकत नाहीं हें दाखवून देण्यासाठीं 'कर्म कर....कर्म कर' असें बाबा हाकारून सांगत असतात.

कर्म हें बाह्य स्थूल क्रिया करून अर्थातच भागण्यासारखें नाहीं. त्या कर्मांत प्राण ओतला पाहिजे. मनाचा त्यापाठीं सहकार हवा. हें मनाच्या सहकाराचें विशेष कर्म तेंच विकर्म म्हणून गीता ओळखते. विशेष कर्म करीत असतांना मोहितपणा टाकून देऊन, लिंपायमान न होतां अनासक्त वृत्तीनें तें सुंदरपणें पार पाडण्यानेंच मनुष्य मोक्षाप्रत जाऊं शकतो. योगः कर्मसु कौशलम् । कर्मसु याचा अर्थच असा कीं स्वधर्माख्येषु कर्मसु । स्वधर्माचें कौशल्यानें पालन करण्यांतच कर्म–विकर्माची परिणति अकर्मांत होत असते. लांकडाचा ओंडका जर डोक्यावर ठेवला तर तें ओझेंच ठरावयाचें. परंतु त्या ओंडक्याची चिमूटभर राख ओझें म्हणून मानूं गेल्यास तें हास्यास्पदच ठरेल. कर्माची विकर्मानें अशी राख केल्यानंतर ती बंधनाला कारणीभूत कशी व्हावी? जीवनांत कर्मयोग कसा आचरावा याबद्दल सांगतांना बाबा नेहमीं संयमाची आवश्यकता दाखवून देत असतात. Brake to the mind 'मनाला ब्रेक लावा' म्हणजेच 'संयम बाळगा' म्हणून बाबा सांगत असतात. संयमाची महति पटवितांना परवां श्री मुक्तानंद बाबांनीं सांगितलेली गोष्ट इथें शोभूनच दिसेल. गर्भवती हरिणी वाघाच्या पाठलागामुळें भयभीत होऊन गर्भ बाहेर टाकून पंचत्वाप्रत गेली. सरोवराकाठीं पाणी पिण्यासाठीं गेलेला ऋषि लुसलुशीत अशा कोवळ्या पाडसांना पोटाशीं धरून भरल्या अंतःकरणानें आश्रमांत परतला. त्या पाडसांना लहानांचीं मोठीं करून मरतेवेळीं त्यांचेंच चिंतन केल्यामुळें शेवटीं पुढच्या जन्मीं हरणाच्या पोटींच आला. ही गोष्ट जर कशाची द्योतक असेल तर ती याचीच कीं दयेचें पालन करीत असतांना पाठीशीं उपाधी लावून घेण्यांत संयमविरहित असेंच कृत्य त्यानें केलें. तात्पर्य, दया-क्षमा हे सद्गुण जरी असले तरी त्या सद्गुणांच्या

पालनांत अतिरेक न होऊं देतां संयमित मर्यादेंत त्यांचें पालन करण्यांतच कर्मयोगाचें रहस्य सांठून राहिलें आहे. जीवनांत संयम नांदावयास आल्यानंतर जीवन सुंदरच व्हावयाचें. योग योग तरी काय? मोजकें खाणें, मोजकें बोलणें, मोजकी निद्रा घेणेंच ना? जीवनाचा प्रवाह संमयाच्या चाकोरींतून वाहूं दिला कीं होणारें कर्म निर्दोषच होणार नाहीं काय? यासाठींच श्रीबाबा मनाला लगाम घालण्यास सांगतात. या मनाला संयमाची वेसण जर घातली नाहीं तर हें मन कुठें वाहात जाईल त्याचा नेम नाहीं. ब्रेक नसलेली गाडी किंवा सुकाणूं नसलेलें जहाज दगडावर आपटूनच फुटावयाचें. मनाचा हा संयम अर्थात् बाह्य वस्तूच्या आधारानें यावयाचा नाहीं. तो आंतूनच यावयाचा आहे. अंतर्मुख होऊन मनानेंच मनाचा उच्छृंखलपणा थांबवावयाचा. त्यासाठीं मनुष्याच्या नैसर्गिक किंवा स्वाभाविक वासना मारावयास नको. सर्व जें कांहीं करावयाचें तें मर्यादेच्या कुंपणांत राहूनच. मनाचें मनपण अशा रीतीनें मोडून मनाची आणि जीवात्म्याची मैत्री झाल्यावर मोक्षाचा पल्ला गांठावयास कितीसा अवसर लागावा? संसारी जीवाला श्री बाबा देत असलेला निष्काम कर्मयोगाचा संदेश जितका व्यवहार्य आहे तितकाच तो आध्यात्मिक स्वरूपाचाहि ठरतो. अर्थात् संपूर्ण निर्दोष कर्म मनुष्याच्या हातून घडणें मानवी मर्यादा लक्षांत घेतां प्रायः अशक्य आहे. अग्नीसभोंवतीं धूर असावयाचाच या न्यायानें कर्माला लागून कांहीं दोष हे यावयाचेच. परंतु श्रीगुरुदेवांना अनन्यभावें शरण गेल्यानंतर 'नष्टो मोहः स्मृतिर्लब्ध्वा' अशी अवस्था प्राप्त होत असल्यामुळें जीवनयात्रेंत कर्तव्यकर्म श्री बाबांच्या शिकवणुकीला धरून पार पाडीत असतांना कर्म दोषरहित कां पार पाडतां येऊं नये? निष्काम कर्मयोगाची साधना दोषरहित पार पाडून देवाचा कृपाप्रसाद प्राप्त करून घेण्यासाठीं श्री बाबांच्या चरणींच विनम्र व्हावें हाच खराखुरा मार्ग नव्हे काय?

# गुरुदेवांचें अमर तत्त्वज्ञान

सर्व सुखदु:खाचें आगर शेवटीं मनच होय. मनाच्या मार्गानेंच ब्रह्म-प्राप्ति व्हावयाची. मनाच्या रस्त्यानेंच ब्रह्मपद गांठावयाचें. मोक्षपद गांठून देणारें शेवटीं मनच ठरत असल्यामुळें या सूक्ष्मतर सूक्ष्मतम अशा इंद्रियाकडे दुर्लक्ष करून चालण्यासारखें नाहीं. साधनेचें मूळ मनच ठरत असल्यामुळें 'मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचें कारण' असें सत्य सर्व शास्त्रांनीं उद्घोषिलें आहे. प्रसन्न या शब्दांत शुचिता, स्थिरता हे गुण एकोप्यानें नांदत आहेत. श्री बाबा यासाठींच सांगतात कीं मन निश्चल करा. संकल्प आणि विकल्प यांनीं भरलेलें हें मन संकल्परहित करा म्हणण्याऐवजीं अशुभ संकल्परहित करा असें श्री बाबांचें सर्वांना सांगणें आहे. मनाच्या निर्विकल्प आणि शांत अशा स्थितींत सत्य-साक्षात्काराची अनुभूति अभिप्रेत असल्यामुळें मन निश्चल करा असें बाबा कळवळून सांगत आहेत. शांत सरोवरांत चंद्राचें तेज स्वच्छ दिसावें परंतु त्याच सरोवरांत तरंग उठतांच त्याच तेजाचें विद्रूप स्वरूप दिसावें, कंदिलाच्या कांचेवर काजळी चढल्यामुळें स्वच्छ प्रकाश लोपलासा भासावा तशीच अवस्था मनाच्या बाबतींत होत नाहीं काय? आत्म्याचें तेज मनाच्या चंचल हालचालीमुळें दृगोचर कसें व्हावें? मनाच्या अनिवार ओढी संयमानें थांबवून धरल्या पाहिजेत. श्री मुक्तानंदमहाराज विवेचन करतांना नेहमीं सांगत असतात कीं बाह्य जगा-पासून थोडा काळ दूर राहून अंतर्मुख होऊन पाहूं लागा म्हणजे असें आढळून येईल कीं शरिरांतर्गत असा एक बिंदु आपण जाणीवेनें ओळखाल कीं ज्या ठिकाणीं विचारांची उत्पत्ति होत आहे. जुने विचार लय पावत आहेत, नवे विचार उदित होत आहेत. ज्या ठिकाणीं ही



अत्तेरी तेरी बत्तेरी देवस्थान (पृष्ठ ७)



अष्टसिद्धीस्थान (पृष्ठ ८)

३९३१७ ९३९३ चरीश ९३/१०
घडामोड चालू आहे तो सूक्ष्म बिंदु ओळखा आणि त्या ठिकाणीं एका साधनेला प्रारंभ करा. नवा विचार उदित होऊं देणार नाहीं आणि उदित झालेल्या विचारांचा लय त्या ठिकाणीं करण्यांत कधीं कसूर करणार नाहीं. डोळ्यांत तेल घालून अशा रीतीनें मनाचें परीक्षण केल्यावर एक वेळ अशी येईल कीं 'निश्चल मन' ही अवस्था सहजसुलभ होऊन बसेल. ही झाली पहिली पायरी.

निश्चल मन झाल्यानंतर दुसरी पायरी म्हणजे त्यावरील मलिनता दूर करण्यासाठीं बद्धपरिकर व्हावयाचें. काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर या रिपूंनीं ज्या मनावर मलिनतेचीं पुटें चढविलीं आहेत तीं पुटें कां साबणानें थोडींच जावयाचीं ? मनाची मलिनता मनानेंच धुवून काढावयाची.

जीवाच्या कल्पित बंधमोक्षास कारणीभूत होऊन राहिलेलें हें मन इंद्रियांचा राजाच ठरतें. सदैव बाह्य विषयांकडेच या सूक्ष्मतर सूक्ष्मतम अशा इंद्रियाची धांव. बाह्य विषयांवर झेप घेण्यासाठीं आसुसलेलें हें मन मानवाच्या सुखदु:खाला कारणीभूत होऊन राहिलें आहे. मनाचें वर्णन करीत असतांना श्री बाबा म्हणत असतात, 'कल्पना हेंच मन' (mind is thought), भूतकाळाचीं खरकटीं काढीत राहावयाचें आणि भविष्यकाळाच्या कल्पित अडीअडचणींचा डोंगर उभा करावयाचा हाच या मनाचा उद्योग. वर्तमानकाळाचा विचार त्या मानानें कमी किंवा केव्हां केव्हां मुळींच नाहीं. मनाच्या या स्वाभाविक प्रवृत्तीमुळें जीवाठायीं इच्छा, आशा व भय यांची निर्मिति होत असते. बुद्धीनें एखाद्या गोष्टीचा निर्णय घ्यावयास जावें तर मन त्या निश्चयाला ठोकर देण्यासाठीं सदैव तयार. मनाच्या या चंचल हालचालीमुळें बुद्धीची सुद्धां कशी फसवणूक होते, मन बुद्धीला पाठीं घालून कसें फिरवीत असतें याबद्दल शेवटीं एवढेंच सांगावेसें वाटतें कीं मानवाला चित्त-वृत्तीच्या निरोधानेंच निरंतर सुखप्राप्ति व्हावयाची आहे. यासाठींच श्री बाबा म्हणत असतात, 'योगाविना स्थिरता नाहीं. योगाविना

संशयनिवृत्ति नाहीं. योगसाधनेशिवाय सुख नाहीं. इकडे तर्क, सवाल नाहीं....' श्री बाबा आपल्या अमर वाणींतून श्रीकृष्णानें अर्जुनाला 'तूं योगी हो' हा जो अमर संदेश गीतेंतून दिला तोच संदेश श्री बाबा आपल्या भक्ताला वरील सांकेतिक शब्द उच्चारून देत आहेत.

साधनांत जी अंतिम प्राप्ति अभिप्रेत आहे ती मोक्षप्राप्ति योगाव्यतिरिक्त अन्य उपायानें मिळण्यासारखी नाहीं असें म्हणूं जाणें जरी धाष्टर्याचें असलें तरी योगाशिवाय अन्य खात्रीचा व या जन्मांत प्राप्त करून घेतां येण्याजोगा जवळचा आणखी मार्ग नाहीं हें सत्यार्थीनें कुणालाहि कबूल करावें लागेल.

'चित्तवृत्तींचा निरोध' म्हणजेच योग. अंतःकरणाच्या वृत्ति लगाम ज्याप्रमाणें सारथी आपल्या हातांत ठेवीत असतो त्याप्रमाणें आवरून धरणें आणि ज्या चिरंतन तत्त्वावर आपल्या चित्ताची धारणा करावयाची आहे त्याव्यतिरिक्त अन्य वस्तूंवर किंवा विषयांवर वृत्ति पसरूं न देणें यालाच योग म्हणतात. अंतःकरणचतुष्टय म्हणून जो शब्द वापरला जातो त्यांत मन, बुद्धि, अहंकार व चित्त यांचा समावेश होत असतो. यांपैकीं मन हें सूक्ष्म इंद्रिय मानवाला आपल्या चंचल हालचालीमुळें दुःखाच्या गर्तेत लोटत असतें. बुद्धीच्या मदतीनें मानवाला पापपुण्य-बरेंवाईट याबाबत निर्णय घेतां येत असतो. संकल्प विकल्प निर्मिति मनाच्या टांकसाळींत होत असली तरी ती बुद्धीच्या कप्प्यांत आल्यानंतर तिला निश्चयात्मक वृत्तीचा आकार मिळत असतो. चित्त म्हणजेच चिंतनाचा छंद, आणि अहंकार म्हणजेच ज्या हृदयांत उठणाऱ्या लाटेशीं वासना झोंबी घेण्यास उत्सुक असते ती वृत्ति. निरोध काळांवाचून अन्य वेळीं या वृत्तींच्या तादात्म्य रूपानें आत्मा वावरत असतो. (वृत्तिसारूप्यमितरत्र—पातंजलयोगसूत्रम् ।। ४ ।।). निरोध काळीं अर्थातच आत्मा चिन्मात्रस्वरूपानें असतो. (तदा द्रष्टुः स्वरूपेऽवस्थानम् ।। पा. यो. ।। ३ ।।).

चित्ताच्या वृत्ती एकंदर पांच आहेत. या वृत्तीच मानवाच्या सुख-दुःखास कारणीभूत आहेत. या पांच वृत्ती १) प्रमाण, २) विपर्यय ३) विकल्प ४) निद्रा ५) स्मृति या होत. 'प्रमाणें' तीन प्रकारचीं आहेत. १) प्रत्यक्ष २) अनुमान आणि ३) आगम. (तत्र प्रत्यक्षानुमानागमाः प्रमाणानि ॥७॥) प्रत्यक्ष प्रमाण म्हणजे एखाद्या पदार्थाविषयीं इंद्रियाचा संबंध येऊन चित्ताची जी एक निश्चयात्मक वृत्ति होते त्यालाच थोडक्यांत प्रत्यक्ष प्रमाण म्हणतां येईल. अनुमान म्हणजे एखाद्या गोष्टीच्या अस्तित्वामुळें दुसरी गोष्ट हमखास असलीच पाहिजे उदा. जिथें धूर दिसत आहे तिथें अग्नि हा असलाच पाहिजे असा निश्चय करून देणारी एक वृत्ति. सत्यवादी व्यक्तीच्या शब्दावर विसंबून जी एक चित्ताची वृत्ति तयार होत असते त्याला आगम प्रमाण म्हणून म्हणतां येईल. खरें नसतांना खरें असल्याचा केवळ भास होत असतो अशा प्रकारच्या खोटया ज्ञानास विपर्यय म्हणतां येईल. उदा. अंधाऱ्या रात्रीं दोरीला साप समजून भीतीनें गाळण उडणें या चित्ताच्या वृत्तीच्या बुडाशीं खोटें ज्ञानच कारणीभूत नाहीं का? (विपर्ययो मिथ्याज्ञानमतद्रूपप्रतिष्ठम् ॥८॥) ज्या शब्दांपासून मनाला बोध होतो परंतु प्रत्यक्षांत तशी वस्तु कोठें आढळत नाहीं अशा मनाच्या वृत्तीला 'विकल्प' म्हणून म्हणतात. उदा. वंध्येला पुत्र (शब्दज्ञानानुपाती वस्तुशून्यो विकल्पः ॥९॥) ज्या वृत्तींत मनुष्याला कोणत्याहि पदार्थाचें भान असें राहात नाहीं अशी जी एक चित्ताची वृत्ति तिला 'निद्रा' म्हणतात. (अभावप्रत्ययालम्बना वृत्तिर्निद्रा ॥१०॥). 'मला काल फार गाढ झोंप लागली होती....कुणाचीच कसलीच आठवण नव्हती....असें जेव्हां आपण म्हणतों त्यावेळेस पर्यायानें जें सुख आपण अनुभविलें त्या सुखाची आपल्याला आठवण ही असतेच. ही आठवण म्हणजेच 'स्मृति' (अनुभूतविषयाऽसंप्रमोषः स्मृतिः ॥११॥).

अशा या चित्तवृत्तींचा निरोध केल्याशिवाय योग सिद्ध झाला असें

कसें म्हणावें ? या चित्तवृत्तींचा निरोध मग कोणत्या साधनांनीं करावा ? शाश्वत सुखाच्या प्राप्तीसाठी साधक जेव्हां गुरुदेवांकडे जातो तेव्हां श्री बाबा सांगत असतात—'गुरु काय देणार ? ज्ञान आणि वैराग्य. अन्य काय ?' या दोन शब्दांतच चित्तवृत्तीचें निरोधन करूं शकणारें साधन दाखवून दिलें आहे. 'अभ्यासवैराग्याभ्यां तन्निरोधः' असें सूत्र आहे. अभ्यास आणि वैराग्य या दोन साधनांनींच चित्तवृत्तींचा निरोध व्हावयाचा आहे. अन्य कशानेंहि नाहीं.

आतां, अभ्यास अभ्यास तो कुठला ? चित्ताची एकाग्रता करावयास प्रवृत्त करणारा जो यत्न किंवा प्रयत्न तोच अभ्यास. राजस आणि तामस वृत्ती वगळून जी शुद्ध सात्त्विक भावनेची धार वाहूं द्यावयाची आहे, ही वृत्ति टिकवून धरण्यासाठीं जी एक तळमळ, कळकळ अंतः-करणांत बाणून श्री गुरुदेवांच्या कृपासाऊलींत जें अनुष्ठान करावयाचें आहे तोच 'अभ्यास—मस्तक ज्ञान, पुस्तक ज्ञान नव्हे' असें श्री बाबा जें म्हणत असतात तें या अभ्यासाच्या संदर्भांतच नव्हे काय ? हा अभ्यास निश्चयात्मक वृत्तीनेंच पक्का व्हावयाचा आहे. यासाठींच श्री बाबा सांगत असतात 'निश्चयमुक्ता—निश्चयभक्ता—निश्चयविना कांहीं नाहीं....निश्चय भावना....निश्चयच मोक्ष....निश्चयच मुक्ति.... निश्चयाशिवाय कांहींएक साधना नाहीं....निश्चयच पुढें वाढत जातो.... मग सिद्धार्थ, मग वैराग्य, मग ज्ञान हीच गुरुकृपा...' श्री बाबांचे हे सांकेतिक शब्द चित्ताच्या एकाग्रतेविषयीं जो अभ्यास करावयाचा आहे तो दीर्घप्रयत्नांनीं, सतत चालविल्यानेंच पक्का व्हावयाचा आहे असें सुचवितात. वैराग्याचें लक्षण म्हणजे विषयांविषयीं द्वेषहि नाहीं आणि प्रीतीहि नाहीं. थोडक्यांत उदासीनता. वैराग्य आणि वैताग यांत मात्र फरक करावयास श्री बाबा नेहमीं सांगतात. विषयाचें मिथ्यापण पटल्यामुळें जी निर्मोही वृत्ति साधकाला प्राप्त होत असते ती निर्मोही वृत्तीच वैराग्याला जन्म देत असते. निर्मोही वृत्तीचें वर्णन करतांना

श्री बाबा म्हणतात 'निर्मोही वृत्ति म्हणजे कुठल्याहि वस्तूंत प्रवेश नाहीं. तटस्थ.' विषयांविषयीं ही जी एक वृत्ति साधक अंतःकरणांत बाणवतो त्यालाच वैराग्य म्हणतात. वैराग्यांत सुद्धां आणखी दोन भेद आहेत. एक परवैराग्य आणि दुसरें अपर वैराग्य. पाहिलेल्या आणि ऐकलेल्या विषयांविषयीं निरिच्छ अशी जी एक निश्चयात्मक वृत्ति तिलाच अपर-वैराग्य म्हणतां येईल. आत्मसाक्षात्कारानें संपूर्ण गुणांविषयीं निरिच्छ होणें याला परवैराग्य म्हणतां येईल. अभ्यास आणि वैराग्य या दोन साधनांनीं राजस आणि तामस वृत्तींचा निरोध करून योग्यास निरोध-समाधीची प्राप्ति होण्यास अवकाश लागत नाहीं.

अभ्यास आणि वैराग्य या साधनांनीं प्राप्त होणारा चित्तवृत्तीनिरोध हा जरी 'योग'च असला तरीसुद्धां ज्याचें चित्त वारंवार चंचल होतें अशा साधकांसाठीं क्रियायोग दाखवून दिला आहे. 'तपःस्वाध्यायेश्वर-प्रणिधानानि क्रियायोगः' असें सूत्र आहे. तप, अध्यात्मशास्त्राचा अभ्यास, सर्व लौकिक वैदिक कर्मे ईश्वरार्पण करणें यांतच क्रियायोगाचें साफल्य सांठून राहिलें आहे. क्रियायोगापासूनहि समाधीची प्राप्ति होऊं शकते. चित्तांतील मलिनता जसजशी नष्ट होत जाईल तसतसा क्रियायोग जवळ येत जाईल. यथावकाश समाधीहि सिद्ध होईल. जीवनांतले क्लेशहि या क्रियायोगानें संपुष्टांत येतील.

यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधी याप्रमाणें योगाचीं आठ अंगें आहेत. अहिंसा, सत्य, अस्तेय ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह या पांचांस 'यम' अशी संज्ञा आहे. शौच, संतोष, तप, स्वाध्याय आणि ईश्वरप्रणिधान असे पांच नियम आहेत. (तत्राहिंसासत्यास्तेयब्रह्मचर्यापरिग्रहा यमाः), (शौचसंतोषतपःस्वाध्याये-श्वरप्रणिधानानि नियमः). 'आसन' हें योगांतील तिसरें अंग आहे. 'स्थिरसुखमासनम्.' यांत सिद्धासन, पद्मासन, सिंहासन, भद्रासन, वीरासन, स्वस्तिकासन समाविष्ट होतात. 'प्राणायाम' हें योगाचें चवथें

अंग आहे. आसनजय झाल्यानंतर बाहेरच्या वायूचा प्रवेश आंत न होऊं देणें व आंतील वायूस बाहेर न जाऊं देणें यास प्राणायाम म्हणतात. (तस्मिन्सति श्वासप्रश्वासयोर्गतिविच्छेदः प्राणायामः—साधनपाद ॥४९॥) बाहेरचा वायु नाकावाटें घेऊन पोटांत सांठविणें याला पूरक म्हणतात. पोटांतील वायूला नाकावाटें सोडणें याला रेचक म्हणतात व वायु कोंडून धरणें या क्रियेला कुंभक म्हणतात. या क्रियेला स्तम्भवृत्ति म्हणून योगसूत्रांत म्हटलें आहे. हा प्राणायाम स्थल, काल व संख्या यांच्या विचारानें दीर्घ व सूक्ष्म असा आहे. प्राणायामाची सिद्धि झाल्यानें निर्मल अशा बुद्धितत्त्वावर आलेलें क्लेशरूप आवरण दूर होतें. (ततः क्षीयते प्रकाशावरणम् ॥ योगसूत्रें साधनपाद. ॥५२॥) त्यानंतर मन निर्मल व निश्चल होत असल्यामुळें त्यास ज्या ज्या विषयावर ठेवावें तिथें तिथें तें आपोआपच स्थिर होत असतें (धारणासु च योग्यता मनसः ॥५३॥). त्यानंतर अष्टांगयोगांतील पांचवी पायरी प्रत्याहार. इंद्रियें आपापल्या विषयांचा परित्याग करून चित्तस्वरूपाचा आकार घेऊं लागलीं कीं प्रत्याहार सिद्ध होत असतो. (स्वविषयासम्प्रयोगे चित्तस्वरूपानुकार इवेन्द्रियाणां प्रत्याहारः ॥५४॥). तात्पर्य, इंद्रियें निरुद्ध होऊन विषय सेवन करण्याचें सोडून देतात. प्रत्याहारांत इंद्रियजय सिद्ध होत असतो. (ततः परमा वश्यतेन्द्रियाणाम् ॥५५॥). अष्टांगयोगांतील हीं पांच साधनें बहिरंग स्वरूपाचीं आहेत. आतां साक्षात् उपयोगी पडणारीं तीन साधनें यापुढें पाहावयाचीं आहेत. पातंजलयोगसूत्रांत विभूतिपाद या भागांत त्यांचें वर्णन आलें आहे. अंतरंग साधनांतील पहिलें साधन 'धारणा'. ज्या देवतेचें आपण ध्यान करावयाचें त्या देवतेच्या ठिकाणीं चित्तवृत्ति ठेवणें यालाच धारणा म्हणतात. नाभिचक्र इत्यादि विशेषस्थळीं चित्त स्थिर करणें यालाच धारणा म्हणतात. ('देशबन्धश्चित्तस्य धारणा). ज्यावर चित्ताची धारणा केली असेल तेथेंच त्याची एकाग्रता होऊन दुसरीकडे न जाऊं देणें या क्रियेस 'ध्यान'

म्हणतात. (तत्र प्रत्ययैकतानता ध्यानम्). या ध्यानक्रियेनें साध्य होणारें योगाचें मुख्य अंग म्हणजेच समाधी. या अवस्थेंत ध्यानच ध्येयाचा आकार घेत असतें. व 'मी चिंतन करतों' अशी भावनाच उरत नसते. ध्याता, ध्येय आणि ध्यान या तिघांचें वेगवेगळें भान न राहातां ध्यान ध्येयाचा साज घेऊन जणूं अवतरतें. हीच समाधी. (तदेवार्थमात्रनिर्भासं स्वरूपशून्यमिव समाधिः) योगसोपानाची समाधी ही अंतिम पायरी असून त्या अगोदरच्या सात पायऱ्या चढून त्याची परिणति समाधींत करून घ्यावयाची आहे. शरीरांतर्गत सूक्ष्मतर सूक्ष्मतम अशा मनरूपी इंद्रियावर ताबा ठेवून पिंडीं तेंच ब्रह्मांडीं अशा ब्रह्मांडांतील मनाशीं योग करावयाचा हेंच राजयोगाचें अंतिम ध्येय आहे. या अंतिम ध्येयमंदिरांत चढून जाण्यास ज्या वर आठ पायऱ्या दाखवून दिल्या आहेत त्यामुळें या योगाला अष्टांगयोग अशी रूढ संज्ञा दिली आहे.

तात्पर्य काय तर चित्तवृत्तीचें निरोधन करणें म्हणजे योग साधण्यासारखें आहे. चित्ताचें निरोधन म्हणजेच चित्तसरोवरांत विविध मनोलहरी न निर्माण होऊं देण्याची खबरदारी घेणें. मी आज उघड्या डोळ्यानें पाहात आहें असें जेव्हां आपण म्हणतों तेव्हां केवळ पार्थिव डोळा पाहाण्याची क्रिया करून राहिला आहे असें नव्हे. कारण केव्हां डोळा उघडा असूनहि सभोंवतीं चाललेली एखादी क्रिया तो पाहात नसतो. याचा अर्थ काय ? डोळे आपणहून पाहात नाहींत. मेंदूंतील 'नर्व्ह-केंद्र' (Nerve Centre) व मनुष्याचें मन यांची युति होत असते तेव्हांच डोळ्याच्या द्वारें पाहाण्याची क्रिया घडत असते. झोंपलेल्या माणसाचे डोळे केव्हां केव्हां सताड उघडे असतात परंतु डोळे उघडे असूनहि तो पाहात आहे असें म्हणतां येईल काय ? नाहीं. कारण मेंदूंतील गोलक व मन यांच्या संयोगानें डोळ्यांच्या द्वारें जी बाह्य सृष्टि पाहाण्याची क्रिया घडली जात असते ती झोंपलेल्या मनुष्याच्या ठायीं संभवत

नाहीं म्हणून. अशा इसमाच्या बाबतींत मन, मेंदूंतील ब्रेनसेंटर व पार्थिव डोळा या तिघांची एक सांखळी झालेली नसते.

बाह्य सृष्टीकडे दृष्टि फेकल्यावर मनावर जी एक प्रतिक्रिया घडते ती प्रतिक्रिया मन सदसद्विवेकबुद्धीला नेऊन अर्पण करते. बुद्धीची जी प्रतिक्रिया त्यावर घडते ती प्रतिक्रिया आणि मनाची प्रतिक्रिया हा एक युद्धाचा प्रसंगच जणुं उभा राहातो. या दोन्हीहि प्रतिक्रिया अंतरात्म्याकडे म्हणजेच पुरुषाकडे जातात. अंतरात्मा निरामय, निर्विकार व सर्वसाक्षीभूत असल्यामुळें तो या आघात प्रत्याघातापासून दूर राहून तटस्थतेनें निरीक्षण करीत असतो. इंद्रियें, मन, बुद्धि, अहंकार, हीं या आघात प्रत्याघातांतील पात्रें आणि अंतरात्मा किंवा पुरुष हा प्रेक्षक. इंद्रियें, मन, बुद्धि, अहंकार मिळून जो एक समुदाय होत असतो त्यालाच 'अंतःकरण' अशी संज्ञा आहे. त्यालाच 'चित्त' म्हणून ओळखलें जातें. या चित्तांत ज्या असंख्य लहरी क्षणोक्षणीं उठत आहेत त्यांनाच 'वृत्ति' असें नामाभिधान दिलें जातें. 'वृत्ति' म्हणजेच चित्तसरोवरांत उठणाऱ्या विचारलहरी. विचार ही एक शक्ति आहे. निसर्गांतून मनुष्य ज्या ज्या शक्तींचा संचय करतो ती शक्ति विचारांच्या रूपानें परिस्फुट पावत असते. ही विचारशक्ति अन्नांतून मिळते. अन्नांतून शरिराचें पोषण आणि विचारांच्या द्वारें मनाचेंहि पोषण होत असतें. मनाच्या स्वभावामुळें चित्तसरोवरांत ज्या असंख्य लहरी क्षणोक्षणीं उठत असतात त्यामुळें चित्तसरोवराचा तळ गांठणें अशक्यच होऊन बसतें. जीवनांत मनुष्य ज्या शांतीकरितां, समाधानाकरितां धडपडत असतो ती धडपड चित्तसरोवराच्या स्तब्धतेनेंच पुरी व्हावयाची आहे. एरवीं कशानेंहि नाहीं. यासाठींच श्री बाबा सांगतात 'निश्चल मन' करा. सुविचारांचें-शुद्ध भावनांचें बीजारोपण निश्चल मनांत झाल्यानंतर सूक्ष्मांत सूक्ष्म अशी जी अंतर्यामीं ज्योत आहे तिची ओळख पटावयास वेळ असा लागावयाचा नाहीं. यासाठींच

श्री बाबा सांगत असतात कीं सद्भावना-शुद्धभावना ठेवा. चैतन्य आत्मा-परमात्मा हेंच निर्विकार परमसत्य असल्यामुळें या आत्मप्रत्ययाची किंवा आत्मप्रबोधाची अनुभूति असत्‌भावना बाळगून कशी यावी? असत्‌भावनेचे तण मुळासकट उपटून काढून त्याजागीं सद्‌भावनांची, शुभभावनांची प्रतिष्ठापना करणें यांतच साधकाचें खरेंखुरें हित आहे. ही झाली दुसरी पायरी.

निश्चल मन आणि निर्मल मन केल्यानंतर तिसरी पायरी 'विशाल मन.' विशाल मन मनाची व्याप्ति दाखवून देतें. मी आणि माझें कुटुंब अशी वृत्ति विशाल मनाची द्योतक नाहीं. एखाद्या महासागरांत आपापल्या विहिरी बांधून विहिरींतील पाणी तेवढेंच माझें हें म्हणणें जितकें हास्यास्पद आहे तितकेंच मी—माझें कुटुंब—माझा समाज—माझा प्रांत-माझा देश असें म्हणून स्वतःभोंवतीं मर्यादेचें कुंपण घालूं जाणें विशाल मनाची अनुभूति आणून देण्यास असमर्थ आहे. किंबहुना जोंपर्यंत अणुरेणूंत परमात्मा संमिश्र होऊन राहिला आहे अशी अनुभूति येत नाहीं तोंपर्यंत मन जरी निश्चल आणि निर्मल झालें असलें तरी तें सत्यार्थानें अपूर्णच मानावें लागेल. मानवी मनाची प्रक्रिया विशाल मनानेंच पुरी व्हावयाची आहे.

'विश्वची माझें घर' ही अनुभूति जोंपर्यंत साक्षात्काररूपानें मनाला झालेली नाहीं तोंपर्यंत परमात्म्याची ओळख पुरती पटली असें म्हणतां येणार नाहीं. श्री बाबा यासाठींच 'विशाल मन' ठेवा म्हणून सांगत असतात. मानवतेचा साक्षात्कार घडवून आणून अखिल मानवजातींतील भेदाभेद अमंगल असल्याचें सुचविणारे श्री बाबा मानवजातीचे पुजारीच ठरत नाहींत काय?

मनाला आलेली किंवा येणारी ही अनुभूति टिकून राहाण्यासाटीं श्री बाबा सांगतात कीं 'स्मृति' ठेवा. स्मृति महान् कार्य करूं शकते. ज्या व्यक्तीची आपण स्मृति ठेवतों त्या व्यक्तीशीं निकट सहवास स्मृतीच

प्राप्त करून देते. व्यक्तीबाबत हा नियम जितका खरा आहे तितकाच तो समष्टीबाबतहि खरा ठरूं शकतो. हरि येथें रे हरि तेथें रे। हरिवांचूनी रितें नाहीं रे। अशी जेव्हां अनुभूति येते तेव्हां हृदयांत फुललेला, बहरलेला समत्वबुद्धीचा भाव टिकवून धरण्यासाठीं स्मृति ठेवणें—आठवण सदैव ठेवणें हाच एक मार्ग नव्हे काय?

निर्मल मन, निश्चल मन, विशाल मन, सद्भावना आणि स्मृति या पांच शब्दांत श्रीबाबांचें सारें तत्त्वज्ञान समाविष्ट झालें आहे. मानवतेचा साक्षात्कार घडवून आणण्यास हे पांच शब्द आचरणांत आणण्याचा प्रयत्न केला तरी पुरे आहे. इतका जरी पुरुषार्थ दाखविला तरी त्याची फलप्राप्ति करून देण्यास श्री गुरुदेव समर्थ आहेत. मानवतेच्या मंदिराच्या या पांच पायऱ्या चढत जाऊन शेवटीं मानवतेच्या गाभाऱ्यांत प्रवेश करून मानवतेचें विशाल दर्शन घडावयाचें आहे. या विशाल दर्शनासाठीं उत्सुक असलेल्या साधकाला या वाटचालींत समतेची आणि ममतेची कावड घेऊन थकल्याभागल्या जीवाला प्रेमाची पाणपोई उघडून प्रेमानें पाजणारे श्री गुरुदेव आणि अंधाऱ्या रात्रीं चांचपडत असणाऱ्या भक्ताला मार्गदर्शन करणारे श्री बाबांनीं लावून ठेवलेले पांच दीपस्तंभ साधकाला खऱ्या सुखाचा मार्ग दाखवून देण्यास पुरेसे नाहींत काय?

अनुक्रमांक 39395 दि:
क्रमांक 9093 नोंद दि: 23/9/

# स्मृति — मंजूषा

१ 'बाबा ! मला एक नवा धंदा सुरू करावयाचा आहे. काय नांवानें सुरू करूं?'—एक भक्त

—नामसे क्या ? कर्म से सब—श्री बाबा

२ 'बाबा, मला शारीरिक व्याधीनें फार पछाडल्यामुळें त्रास होत आहे. काय करूं मी ?'—एक भक्त

'गुरुको तकलीफ अर्पण करना '—बाबा

'पण त्यामुळें माझा त्रास आपल्याला होईल त्याचें काय ?'

'गुरु क्या ? गुरु भोगता—गुरु अग्नि' श्री बाबा

३ श्री बाबांचा एक भक्त शरिरानें लोटांगण घालीत घालीत येत असल्याचें अंतर्ज्ञानानें जाणून श्री बाबा म्हणतात,

'शरीर लोटनेसे क्या ? देह लोटनेसे क्या ?
देही लोटना अंदर ब्रह्मरंध्रतक'.

४ श्री बाबा माझ्या स्वप्नांत अलीकडे कां येत नाहींत, म्हणून व्याकुळ झालेल्या एका विदुषीस श्री बाबा सांगतात—

'स्वप्न स्वप्न क्या ? स्वप्नांतून जागृतींत गेलं पाहिजे.'

५ मला अजून साक्षात्कार होत नाहीं म्हणून तक्रार करणाऱ्या एका भक्तास बाबा सांगतात—

'साक्षात्कार साक्षात्कार काय ? मानसिक समाधान—मानसिक शांति हाच संसारांतील साक्षात्कार. अन्य कांहीं नको.'

६ गीतेवर बोलतांना श्री बाबा म्हणतात, 'शेवटीं गीतेचें सार काय? गीतेचें फलित काय ? स्थिरबुद्धि.'

७ गीतेवर बोलतांना बाबा म्हणतात,

—'गीता काय शिकविते? त्यागी गीता—गीता त्यागी—त्यागी गीता—त्यागी सीधा. गीता त्याग शिकविते— त्याग कोणता? त्याग–फलत्याग—फलत्याग करून निश्चय पकडून सरळ जावयाचें. —दुसरें काय?'

८ भारतांत विखुरलेल्या अनेक धार्मिक क्षेत्रांच्या ठिकाणीं जो एक घृणास्पद देखावा दिसतो त्यामुळें सामान्य भक्त केव्हां केव्हां खिन्न अंतःकरणानें 'नको तें जाणें....दुरूनच या तीर्थांची शोभा पाहावी' असें म्हणून परततो. पंढरपुरास गेल्यावेळीं किंवा काशीला गेल्यावेळीं धर्माच्या नांवावर कोण्या भोळ्या भाबड्या धर्मभोळ्या जनतेला लुटण्याचे जे प्रकार आपण पाहतों तें पाहून सामान्य जन जरी दुःखी होत असला तरी अशा क्षेत्रांच्या ठिकाणीं गेल्यानंतर जी एक सहज शांति प्राप्त होत असते ती प्राप्त करून घेण्यासाठीं हजारों यात्रेकरू क्षेत्रासारख्या ठिकाणीं नित्यनेमानें जाण्याचें कांहीं केल्या सोडीत नाहींत. अशा ठिकाणीं इतकें दोषास्पद वातावरण असूनहि माणसाला समाधान कसें लाभतें, असा प्रश्न एकदां बाबांना करतांच बाबा चटकन् उद्गारले,

'स्थानमहिमा हेंच त्याचें कारण—दुसरें कांहीं नाहीं.'

९ गुरुचरित्राची पोथी श्री बाबांच्या पुढ्यांत वाचणाऱ्या एका भक्ताला बाबा म्हणतात,

'कॉन्सेंट्रेशन होना—कॉन्सेंट्रेशन होनेसे हाथमें पोथी वृत्ति तटस्थ—गुरुप्रेम—गुरुसेवन होनेसे कॉन्सेंट्रेशन.'

१० संसारी जीवाला सुख कसें प्राप्त होईल असें विचारतांच बाबा म्हणतात—

'कर्म स्थिर करून ध्यान—हाच एक मार्ग–अन्य मार्ग नाहीं.'

११ 'बाबा, ईश्वराचा अनुभव मला कसा येईल?'—एक भक्त. 'श्रवण-मनन-निदिध्यास'—बाबा.

१२ 'बाबा, गीतेवर कांहीं तरी सांगा ना?'

'क्या बोलना ! गीता—निर्मोही-संशयनिवृत्ति-हीच फलप्राप्ति'—श्री बाबा.

१३ श्री बाबा 'शरीर' आणि 'शरीरी' यांतील भेद स्पष्ट करून सांगतांना म्हणतात:

'शरीर क्षेत्र—जो जाणतो तो क्षेत्रज्ञ-दोघांतील भेद जाणणें हेंच ज्ञान—हें जाणतो तो ज्ञानी'— बाबा.

'सब भोगता कोण ? जीव-वायु जीवोत्तम-हरि सर्वोत्तम-माया सर्वोत्तम—शरीरच गुहा—गुहेंत वास—सुखकष्ट शरिराला—स्वरूप इंद्रिय विरहित–अलिप्त—गूढतत्त्व—-गूहतत्त्व.

१४ श्री बाबा पुढें म्हणतात,

'हृदयाकाशे चित्तं—चित्ताकाश-चिदाकाश-शुद्धाकाश—'

१५ स्थिरबुद्धि हेंच गीतेचें फलित सांगितल्यानंतर श्री बाबा म्हणतात—'बुद्धीच शक्ति—बुद्धीच आत्मा—आत्मबुद्धि—सुषुम्नेंत राहाते ती–'

१६ दृढ विश्वासाशिवाय सर्व फुकट आहे हें दाखवून देतांना श्री बाबा म्हणतात—

'एक तप–एक चित्त–एक वृत्ति–
ध्याननिष्ठा–योगनिष्ठा–योगमुक्ति–
परचिंता–परम चिंता–तव चिंता–तत्त्व चिंता'

१७ श्री बाबांनीं वापरलेल्या 'चिंता' या शब्दाची फोड करतांना बाबा पुढें म्हणतात,

'चिंता–ध्यानचिंता–साधनचिंता.'

१८ गुरुकृपा म्हणजे काय हें समजावून सांगतांना श्री बाबा म्हणतात—

'निश्चय बिना कांहीं नाहीं—निश्चयी भावना–विचार केला पाहिजे–विवेक ठेवला पाहिजे—निश्चयच मोक्ष–निश्चयच मुक्ति–निश्चयाशिवाय

कांहीं साधना नाहीं – निश्चयच पुढें वाढत जातो – मग सिद्धार्थ – वैराग्य –ज्ञान–निश्चय तत्त्व–निर्मल तत्त्व–निर्मोही तत्त्व–निर्मोही तत्त्व म्हणजे कुठल्याहि वस्तूमध्यें प्रवेश नाहीं–तटस्थ–यानंतर जीवन्मुक्ति–हीच प्राप्ति–हीच गुरुकृपा—'

१९ सगुण भक्तीच्या उपासकानें देवदेवतांची पूजा करतांना कुठलीं फुलें वापरावींत हें सांगत असतांना श्री बाबा म्हणतात—

'देवीला सुवर्णचंपा—विष्णूला तुळशी —गणपतीला दुर्वा. गण-पती—गणोदेव. गुणोदेव—'

२० सर्व धर्मांचें सार शेवटीं काय हें सांगत असतांना श्रीबाबा इंग्रजींत उद्‌गारले,

'वन् नॉलेज् (one knowledge)

'वन् पीस्' (one peace)

'ऑल रोड्स् टु पीस (All roads to peace)

'ऑल् आर अलाइक्' (All are alike)

२१ विचाराशिवाय मनाला अस्तित्वच नाहीं हें समजावून सांगतांना श्री बाबा इंग्रजींत म्हणाले,

'फिझिकल् बॉडी—फायनर बॉडी—माईंड इज् थॉट्—थॉट् इज् माईंड—डिस्ट्रॉय् थॉट्—नो माईंड' (physical body–Finer body–Mind is thought-thought is mind-Destroy thought-no mind)

२२ योग्याची वृत्ति कशी असते हें सांगतांना श्री बाबा म्हणतात,

'योग्याची वृत्ति अंतर्मुख—'

२३ शरिराची व्याप्ति सांगतांना श्री बाबा म्हणतात,

'मानेपर्यंत शरीर – उपरी सब आकाश.
नाडी शुद्धी होनेसे मालूम पडता.'

२४ गुरुचरित्रावर बोलतांना श्री बाबा म्हणतात,

‘गुरुचरित्र – अमृत वाणी – अमर्त्य वाणी – अमृत भाग्य – गुरु अमृत भाग्य – अमृत शब्द – गुरूपदेशमाला पठण – ज्ञानवैराग्य फलित.’

२५ गुरूसारखा पाठीराखा असल्यावर कसली काळजी, असें सुचवितांना श्री बाबा पद्य गुंफून म्हणतात,

‘सद्‌गुरूसारखा असता पाठीराखा
सर्वांमध्यें एकभावें एकात्मभाव पांडुरंग.’

२६ अतृप्त वासनाच जीवात्म्याला जन्ममरणाच्या फेऱ्यांत लोटीत असते हें पटवून देत असतांना श्री बाबा म्हणतात,

‘वासना रखनेसे जन्म – ऋषी होनेकी वासना रखनेसे ऋषी कुलमें – भिन्नभिन्न वासना – वासना – छोटी – मोठी – तात्कालिक वासना, आशा – भूक लगनेसे खाया – तात्कालिक आशा – आशापूर्तीसे शांती – रात्रंदिन कोई वासनाका चिंतन होनेसे दीर्घ वासना – दीर्घ वासना रखनेसेही पुनर्जन्म.’

२७ मंत्रतंत्र, पशुबलि वगैरे कर्मकांडावर बोलतांना श्री बाबा म्हणतात,

‘मंत्रतंत्रानें कुणाला शांति मिळाली आहे काय? मंत्रतंत्र, स्मशानविद्या वगैरे मिळून शेवटीं शांति नाहीं, समाधानहि नाहीं. भूतसेवा – भूतमात्रकी सेवा – हाच खरा पुरुषार्थ —’

२८ मनुष्य हा केवळ निमित्तमात्र आहे, ईश्वराच्या इच्छेनुसार सर्व कांहीं घडत असतें, करता करविता शेवटीं परमेश्वरच हें ओळखावयाला शिकलें पाहिजे असें सांगत असतांना श्री बाबा म्हणतात,

‘कालप्राप्ति–कालसिद्धि. वेळ येतांच सर्व कांहीं घडतें. दरम्यानच्या काळांत स्फूर्ति वाढवावी–एक निश्चय होण्यानेंच स्फूर्ति वाढते–एक निश्चय होण्यानेंच समाधान—शांति.’

२९ डॉ. टागोरांच्या गीतांजलीवर बोलतांना श्री बाबा म्हणतात—

‘टागोरांची गीतांजलि—सगुण रूपावरील काव्य नव्हे. निर्गुण रूपावरील काव्य—संस्कृतीवर—निसर्गावर काव्य.’

३० ऑर्डरबरहुकुम असंख्य कायदे तयार होत असल्याबद्दल खेद व्यक्त करून एक बुद्धिवादी भक्त श्री बाबांना म्हणाला, 'बाबा! कायद्याची तयारी जनतेच्या मनांतून अगोदर जोंपर्यंत होत नाहीं तोंपर्यंत कायद्यांची निर्मिती काय कामाची! अशानें फार तर कायद्यानें निर्माण होणारें राज्य होईल, कायद्याचें राज्य कसें म्हणावें बाबा? आपल्याला काय वाटतें?'

'एका अर्थीं खरें आहे. शरिरावर कायदे, मनावर कायदे. फाजील बंधनें तोडण्याची मानवांत एक सहजप्रवृत्ति आहे. हें ओळखूनच कायदे व्हावेत. राजाजींचे विचार या दृष्टीनें व्यवहार्य आहेत.'


३१ प्रचलित कुळकायद्यानें छोट्या मालकांवर अन्याय होत असल्याबद्दल दुःख व्यक्त करून 'आपल्याला काय वाटतें?' असा श्री बाबांना प्रश्न करतांच बाबा म्हणाले,

'महाराष्ट्रांतील मालक गरीब—सर्व पैसाअडका शेतजमिनींत ओतला. आतां काय? कुळांना जमिनी गेल्या. मालकाला नाममात्र नुकसानभरपाई दिली. मालकालाहि मुलेंबाळें आहेत, संसार आहे. कायदा करतांना समत्वबुद्धि ठेवायला हवी होती.'

३२ भारताच्या शांततामय सहजीवनाच्या धोरणाचा उल्लेख करून एक भक्त श्री बाबांना म्हणाला, 'बाबा, सगळं जग शांततेची भाषा फक्त तोंडानें बोलत आहे. अंतःकरणांत मात्र युद्धाचे व्यूह रचले जात आहेत. संरक्षणाच्या गोंडस नांवाखालीं शस्त्रीकरणाचें समर्थन केलें जात आहे. अशा परिस्थितींत भारताचें पंचशीलतत्त्वज्ञान केवळ ध्येयवादी, यापलीकडे काय? भारत व्यवहार्य धोरण ठेवत नसल्यामुळें चीनकडून दिवसेंदिवस आक्रमण होत आहे, काश्मीरप्रश्न सुटण्याची अजून आशा नाहीं, पाकिस्तानची भीति आहे तशीच आहे, पोर्तुगालप्रश्न सुटण्याची दीर्घकाल आशा दिसत नाहीं, अशी भारतसरकारच्या परराष्ट्रीय धोरणावर टीका केली जाते.



पडबिद्री येथील वडाच्या झाडावर अवधूत दशेंत श्रीगुरुदेव (पृष्ठ ८)



हाच तो पडबिद्रीचा इतिहासप्रसिद्ध कल्पवृक्ष (पृष्ठ ८)

आपल्याला या बावतींत काय वाटतें? भारताला उर्जितावस्था केव्हां येणार?'

'—भारताच्या परराष्ट्रीय धोरणांत सहिष्णुता आहे. भारताला उर्जितावस्था यावयास वीस वर्षांचा काळ हवा.'

३३ साधकानें ध्यान कसें करावें? ध्यान करीत असतांना जें पुढें पुढें ज्ञान प्राप्त होत जातें त्याची सांकेतिक शब्दांत ओळख करून देतांना श्री बाबा म्हणतात—

'ध्यान आंत—अंतर्मुख होऊन—योग्याची वृत्ति अंतर्मुख—विंदु—अंदर्भवितं बिंदु—बिंदुर्भवितं वायु—वायुर्भत्रितं अग्नी—जठराग्नी.'

३४ शस्त्रवेद हिंदुस्थानांत सुद्धां होते—किंबहुना शस्त्रवेदावरील आमचें पुरातन ज्ञान पाश्चात्य राष्ट्रें घेऊन गेलीं, यासंबंधीं बोलतांना श्री बाबा म्हणतात—

'शस्त्रवेद हिंदुस्थानांतूनच पाश्चात्य राष्ट्रांत गेला. जर्मन लोकांनीं त्याचा उपयोग करून शोध लावले. इतर राष्ट्रांनीं सुद्धां. धर्मवेद आणि शस्त्रवेद आमच्यापाशीं होतेच. आत्मज्ञान करून देण्यास शस्त्रवेद असमर्थ ठरत असल्यामुळें प्राचीन ऋषींनीं त्यांवर भर न देतां धर्म दाखवून देणाऱ्या वेदांवरच अधिक भर दिला.'

३५ आपले अनेक जन्म यापूर्वीं होऊन गेले परंतु आपल्या मूलाधार चक्रांखालीं झोंपलेली कुंडलिनी शक्ति किंवा चितीशक्ति अजून झोंपेंतच आहे. सद्गुरूच्या कृपाकटाक्षानें ती जागृत होऊन इडा, पिंगला या दोन नाड्यांच्या मध्यभागीं असलेल्या सुषुम्ना नाडींतून तिचा पुढील प्रवास सुरू होत असतो. या प्रवासांत वाटेंत भेटणाऱ्या षड्चक्राचा भेद करून शेवटीं ती सहस्रार चक्रांत येते व तेथें ब्रह्मकमलाची कळी उमलून त्यांत वास करतां करतां ब्रह्मांडांतील चित् शक्तीशीं (Cosmos) एकरूप होते. पिंडीं तें ब्रह्मांडीं हें ओळखून परब्रह्माचें कोडें अशा रीतीनें उलगडतें. मानवाच्या खऱ्या कर्तव्याची हीच खरी

परिणति आहे. त्यासंबंधीं सांकेतिक शब्दांत सांगतांना श्री बाबा म्हणतात—

'मस्तकमें स्थिरता—मस्तकांत मस्तक—ब्रह्मकमल—निराकार चित्तवृत्ति—निरामय—निर्गुण आत्मा—मनोमंडल आकाश—चिदाकाश—जडाकाश—शक्तींत शरण व्हावें—सर्व साक्षीभूत—अंतर्वृत्ति.

'स्पायनल कॉर्ड—सुषुम्ना नाडी—आंत छोटी बिंदु नाडी—या नाडींतून कुंडलिनीला गति—तिचें मुख फिरवावें—ब्रह्मरंध्रातक जावें. 'इडा पिंगला सुषुम्ना—यमुना गंगा सरस्वती—त्रिवेणी संगम.'

३६ श्री बाबांचें स्वरूप भक्ताला कसें आकलन होणार असें विचारतांच श्री बाबा म्हणाले,

'साधनेंतूनच माझें स्वरूप ओळखतां येणार.'

३७ भूतमात्रांची सेवा हीच भूतेशाची सेवा म्हणून लोकसेवा करा, जनसेवा करा, असें सांगत असतांना श्री बाबा म्हणतात—

'अनेक रूपांत एक रूप पाहायला शिका.'

३८ मानवाला स्थिरता कशी प्राप्त होईल असें विचारतांच श्री बाबा म्हणतात—

'योगाशिवाय स्थिरता नाहीं. कर्म स्थिर करून ध्यान करण्याशिवाय अन्य मार्ग नाहीं. कर्मस्थिरतेशिवाय संशयनिवृत्ति नाहीं. इकडे तर्क नाहीं, सवाल नाहीं. हाच पुरुषार्थ, हाच मनिषार्थ. मनिषार्थ व्यापृत व्हावयास पाहिजे. हेंच देवार्थ तत्त्व.'

३९ 'वेदाचें मूलतत्त्व कोणतें हें सांगतांना श्री बाबा म्हणतात—

'—वेदाचें मूलतत्त्व योगी.'

४० संन्याशाची वृत्ति कशी असावी हें सांगतांना श्री बाबा म्हणतात—

'वृत्ति निर्मोही—कुठल्याहि वस्तूंत प्रवेश नाहीं. तटस्थ. भूमीसे उपरी वास—आकाशांतच राहातो.'

११५९६

४१ गुरु शिष्याला ज्ञानाचे डोळे देऊन त्याचा अंतर्बाह्य कायापालट करून टाकतो असें नेहमीं सांगण्यांत येतें. या विषयावर बोलतांना श्री बाबा सांगतात—

'गुरु काय देतो? ज्ञान—वैराग्य.'

४२ परमेश्वर अणुरेणूंत भरून राहिला आहे. अशा ब्रह्मतत्त्वाची ओळख लहानसहान दृष्टान्तांतून श्री बाबा सदैव देत असतात. सुईच्या अग्रावर राहील एवढीसुद्धां जागा नाहीं कीं ज्या ठिकाणीं परमतत्त्वाचें वास्तव्य नाहीं. जिव्हेंतील गोडीमुळेंच बाह्य पदार्थाला अमृतत्व येतें. एखादें फळ खात असतांना मनाला जो एक आनंद प्राप्त होतो त्या आनंदाच्या बुडाशीं फळांतील गोडीपेक्षां जिव्हेंतील गोडीच कारणीभूत नाहीं का? एके दिवशीं भक्तगणांना 'उसाचा रस प्यावयास द्या' म्हणून सांगतांना श्री बाबा म्हणतात,

'ब्रह्मरस प्या—ब्रह्मतत्त्व प्या.'

४३ दैनंदिन जीवनांत व्यवहार करीत असतांना एखाद्या व्यक्तीच्या मनाविरुद्ध बोलण्याचा किंवा करण्याचा प्रसंग ओढवतो. न्यायमूर्ति झाल्यावर पुढें आलेल्या केसमध्यें निर्णय देत असतांना कुठल्या तरी एका पक्षकाराच्या मनाविरुद्ध निकाल कर्तव्यबुद्धीनें द्यावाच लागतो. अशा वेळेस कर्तव्याची कांस धरून सदसद्विवेकबुद्धीला पटेल तें बोलावेंच लागतें. तिऱ्हाईत व्यक्तीच्या बाबतींत आपण जितकें स्पष्ट आणि उघडपणें बोलूं शकतों तितक्या मोकळेपणानें ज्या व्यक्तीचा आपला ऋणानुबंध आहे अशा व्यक्तीविरुद्ध बोलत असतांना मनुष्य अडखळतो. अशा प्रसंगीं उडणाऱ्या मनाच्या गोंधळांतून बाहेर कसें पडावें अशा आशयाची चर्चा चालू असतांना श्री बाबा म्हणतात.

'—कर्तव्य हें बजावलें पाहिजेच. पोलिस अधिकाऱ्याला आरोपी कोण याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्याला स्पष्ट रिपोर्ट हा करावा लागतोच.

न्यायाधिशाला खरा अपराधी कोण हें निर्णीत करावें लागतेंच. असें करीत असतांना त्या अधिकाऱ्याच्या किंवा न्यायमूर्तींच्या मनांत सूड-बुद्धि नसावी. द्वेष नसावा. अंतःकरणांत प्रेम बाळगून कर्तव्य, मग तें अप्रिय कां असेना, बजावावें.

# कृपाप्रसाद

'निश्चय तत्त्व, निर्मल तत्त्व, निर्मोही तत्त्व, जीवन्मुक्ति—हीच दीक्षा —हीच गुरुकृपा' अशा सांकेतिक भाषेंत श्री बाबा जीवनाचें साफल्य कशांत आहे याची पुसटशी कल्पना साधकांना देत असतात. फार काय, मानवी जीवनाची प्रक्रिया जीवन्मुक्तीनेंच पूर्ण व्हावयाची आहे. यासाठीं शक्तिपातावांचून मोक्षाची प्राप्ति नाहीं असें साधनेंत पुढें सरकणाऱ्या साधकाला श्री बाबा सुचवितात. ज्ञाननिष्ठो विरक्तोऽपि धर्मज्ञो विजितेंद्रियः । विना देहेन योगेन न मोक्षं लभते विधे ॥ असा शास्त्रार्थ दाखवून श्री गुरुदेवांनीं शक्तिपात केल्यावांचून मोक्षप्राप्ति दुर्लभ असें पूज्य मुक्तानंदस्वामीहि कळकळीनें सांगत असतात. पुण्य-संचयामुळें सिद्धाची संगती प्राप्त होते परंतु त्यानंतर सिद्धानें केलेली कृपा म्हणजेच शक्तिपात साधकाला जीवन्मुक्तीचा मार्ग मोकळा करून देत असते.

मानवाचे अनेक जन्म झाले परंतु मानवाच्या मूलाधार चक्रस्थानीं परिसुप्त असलेली प्राणशक्ति कुंडलिनी निजूनच आहे. मूलाधार चक्राच्या ठिकाणीं लीन झालेली ही प्राणशक्ति सद्‌गुरूच्या कृपेनें स्पर्श, दृष्टि किंवा संकल्पानें जागृत होत असते. श्री विष्णुतीर्थ यांनीं 'देवात्मशक्ति' या ग्रंथांत म्हटल्याप्रमाणें 'Shaktipat is in a way an injection of shakti. The master injects in the astral body of the initiated a current of psychic power, or a doze of astral fluid of a high potentiality by the touch of his hands, by casting a look or by speaking out to him some word or words called mantras or any one of God's holy names or simply by a mere thought. When the

Divine power is thus transmitted she acts in such a way that the dormant power of Kundalini is awakened or we may say that fire of Kundalini is ignited & set into flames throughout the nervous system which ultimately opens the door of Sushumna & rises up to cerebrum (सहस्रार) piercing through the six centres of the spinal passasge along with the nervous centres in the medula oblangata.' (पहा–देवात्मशक्ति पृष्ठ १४३–४४).

कुंडलिनी जागृत झाल्यावर साधकाच्या बाबतींत आपोआप आसनें, बंध, प्राणायाम इत्यादि क्रिया घडूं लागतात. त्यानंतर पाठीच्या कण्यांत ज्ञानतंतूंचे जे दोन रज्जू आहेत (इडा व पिंगला) या दोन रज्जूंमध्यें असलेली पोकळ नाडी किंवा जिला सुषुम्ना म्हणतात या सुषुम्नेच्या मार्गांतून ही कुंडलिनी आपला प्रवास सुरू करते. वाटेंत तिला मज्जा-तंतूचीं जीं सहा जाळीं भेटतात (plexuses) त्या चक्रांचीं नांवें. १) मूलाधार–गुद, मलद्वार व जननेंद्रिय यांच्या शिवणीवर हें चक्र आहे. (coccygeal) २) स्वाधिष्ठान—कटिस्थानाजवळ हें चक्र आहे. (pelvic) ३) मणिपूर चक्र–नाभिस्थान व बेंबीच्या मागें आहे. (Hypogastric) ४) अनाहतचक्र–हृदयाजवळ आहे. (cardiac) ५) विशुद्धीचक्र–कंठा-जवळ आहे. (pharyngeal) ६) भ्रूमध्यांत आज्ञाचक्र (Frontal) आणि शेवटीं सहस्रार चक्र कीं जें मेंदूंत आहे (Brain). कुंडलिनीवर्णन, ती जागृत कशी होते, जागृत झाल्यानंतर साधकाच्या शरिरावर काय परिणाम होतात वगैरेविषयीं विवेचन ज्ञानेश्वरमहाराजांच्या तोंडूनच ऐकावें. अध्याय ६ वा—यांत सर्व विवेचन विस्तृतपणें आलें आहे.

केशरानें न्हालेलें नागाचें पिलूं वेढे घेऊन जसें निजावें त्याप्रमाणें साडेतीन वेढयांची ती कुंडलिनीरूपी नागीण खालीं तोंड करून निज-लेली असते. ही कुंडलिनी शक्ति जागृत झाल्यावर सरळ वरतीं तोंड पसरते. त्यानंतर हृदयकोशाच्या खालच्या बाजूस जो वारा भरलेला

असतो त्या वायूस ती खाऊन टाकते. त्यानंतर ती मांसाचे घास खावयास लागते. ज्या ज्या ठिकाणीं मांसल भाग सांपडेल त्या त्या ठिकाणीं वरच्या वरच ती लचका तोडून खावयास सुरुवात करते. रक्त, मांस खाऊन झाल्यावर नखांचें सत्व देखील काढून घेण्यास ती मागेंपुढें पाहात नाहीं. हाडांच्या नळ्या निरपून घेते व शिरांच्या काड्या ओरपून घेते. त्यानंतर सप्तधातूंचा समुद्र एका घोटांत पिऊन टाकते. शरिरांत त्यामुळें खडखडीत उन्हाळा होतो. अशा रीतीनें पृथ्वी व जल हीं दोन्ही भूतें खाल्ल्यावर तिची तृप्ति होते आणि मग ती सुषुम्नेजवळ सौम्य स्वरूपांत असते. या वेळीं तृप्त होऊन समाधान पावल्यावर ती तोंडांतून जें गरळ ओकते त्या गरळांतील अमृताच्या योगानें प्राणवायु जगत असतो. या वेळेस गात्रांना शक्ति येऊं लागते. कुंडलिनीनें सुषुम्नेंत प्रवेश केल्यावर ज्ञानेश्वर महाराज म्हणतात;

मार्ग मोडती नाडीचे। नवविधपण वायूचे।
जाय म्हणवुनी शरिराचे। धर्म नाहीं ॥
इडापिंगला एक वरती। गांठी तिन्ही सुटती।
साही पदर फुटती। चक्रांचे हे ॥

साधकाच्या शरिरावर होणारे परिणाम वर्णितांना श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात—

मग कास्मीरीचे स्वयंभ। कां रत्नबीजा निघाले कोंभ।
अवयव कांतीची भांब। तैसी दिसे।
तरी संध्या रागींचे रंग। काढूनी वाळिलें तें अंग
कीं अंतर्ज्योतीचें लिंग। निर्वाळिलें.
कुंकमाचें भरीव। सिद्ध रसाचें वोतीव।
मज़ पाहतां सावेव। शांतिची तें ॥
तें आनंद चित्रीचें लेप। नातरी महासुखाचें रूप।

कीं संतोष तरूचें रोप । थांबलें जैसें ।
तो कनकचंपकाचा कळा । कीं अमृताचा पुतळा ।
नाना सासिंनला मळा । कोंवळीकेचा ।
हो कां शारदीयेचेति वोलें । चंद्रबिंब पाल्हेलें ।
कां तेजचि मूर्त बैसलें । आसनावरी ।।
तैसे शरीर होये । जे वेळीं कुंडलिनी चंद्र पिये ।
मग देहाकृती बिहे । कृतांतु गा ।।
वार्धक्य तरी बहुडे । तारुण्याची गांठीं विघडे ।
लोपली उघडे । बालदशा ।।
वसया तरी येतुलें वरी । एऱ्हवीं बळाचा बलार्धु करी ।
धैर्याची थोरी । निरुपमु ।।
कनकद्रुमाच्या पालवी । रत्नकलिका नित्य नवी ।
नखें तैसी वरवी । नवीं निघतीं ।।
दांतही आन होती । परि अपाडे सानेजति ।
जैसी दुबांहीं बैसे पांतीं । हिरे यांची ।।
माणि कुलियांचिया कणिया । सावियाची अणुमानिया ।
तैसिया सर्वांगी उधवती आणिया । रोमांचिया ।।
करचरण तळें । जैसी कां रातोत्पळें ।
पाखाळींव होती डोळे । काय सांगो ।।
निडाराचेनि कोंदाटे । मोतियें ना वरती संपुटें ।।
मग शिवणी जैसी उतरें । शुक्ती पल्लवांची ।।
तैशी पातियांचिये कवळीये न समाये ।
दिढी जाकळोनी निघो पाहे ।
आधिलीची परी होये । गगना कवळिती ।
आइके देह होय सोनियाचें । परि लाधक हें वायूचें
जे आप आणि पृथ्वीचे । अंश नाहीं ।।

जागृतीमुळें ज्या शक्ती–सिद्धी प्राप्त होतात त्यांचें वर्णन करतांना श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात--

मग समुद्रा पैलीकडील देखे। स्वर्गीचा आलोचु आईके।
मनोगत ओळखे। मुंगियेचे।
पवनाचा वारिका वळघे। चाले तरी उदकीं पाऊल नलगे।
येणें येणें प्रसंगे। येती बहुता सिद्धि॥

हृदयचक्रांत कुंडलिनी आल्यावर होणारे परिणाम कथन करतांना श्री ज्ञानेश्वर महाराज सांगतात--

हें असो ते कुंडलिनी बाळा। हृदया आंत आली।
अनुहताची बोली। चालली ते॥
देखे साधक निघोनी जाये। मागां पाऊलांची ओळ राहे।
तेथें ठायीं ठायीं होये। आणिमादिक॥

हृदयचक्रांतून कुंडलिनी पुढें जेव्हां प्रवास करूं लागते तेव्हां तिचें कुंडलिनी हें नांव जाऊन तिला 'मारुत' असें नांव प्राप्त होत असतें. पुढें तरी ब्रह्मरंध्रांत शिरल्यावर 'मग ब्रह्मरंध्रीं स्थिरावोनी। सोहं भावाच्या बाह्या पसरोनी। परमात्म लिंग धांवोनि। आंगा घडे॥ असें सांगून श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, 'पुढती जाणणें हें नाहींचि। म्हणोनि असो किती हेंचि। बोलावें आतां वायांचि। धनुर्धरा॥ ऐसें शब्दजात माघौते सरे। तेथें संकल्पाचें आयुष्य पुरे। वाराही जेथ न शिरे। विचाराया। (ज्ञानेश्वरी अ. ६ वा) कुंडलिनी अशा रीतीनें सहस्रारांत जाऊन आपला प्रवास पुरा करीत असते.

ब्रह्मरंध्राचे ठिकाणीं स्थिर होऊन 'तें ब्रह्म मी' या भावनारूप बाहू पसरून त्वरेनें ब्रह्मरूप लिंगाशीं ऐक्य पावते. पंचमहाभूतांचा पडदा नाहींसा होऊन शक्ति आणि परमात्मा यांचें ऐक्य होतें. या ऐक्यांत मूर्ध्नि आकाशासकट सगळ्यांचा लय होतो. हें एकत्व जणुं समुद्राच्या ऐक्याप्रमाणें होय. या ठिकाणीं साधक मुक्त होत असतो. यापुढें साधकाला

मिळवावयाचें असें कांहींच शिल्लक राहिलेलें नसतें. साधक थोडक्यांत महाज्ञानी होऊन कृतकृत्य होत असतो. 'भिद्यते हृदयग्रंथी। छिद्यंते सर्व संशयाः ॥ क्षीयंते चास्य कर्माणि। तस्मिन् दृष्टे परावरे ॥ अशी स्थिति झाल्यावर पुन्हा वासनेच्या ताब्यांत जाण्याची भीति उरत नाहीं. तुकाराम महाराजांच्या भाषेंत सांगावयाचें तर 'बीज भाजुनी झाली लाही। आतां जन्ममरण नाहीं ॥' जीवन्मुक्त अशा रीतीनें होऊन, 'राहिलों उपकारापुरता,' या न्यायानें मानवजातीला सुखाचा दिलासा देण्यासाठीं असा महापुरुष जगांत नसून जगांत वावरत असतो. श्री बाबा अशाच अवस्थेंत आज आहेत. अखिल मानवजातीला सुख आणि शांति प्राप्त करून देण्यासाठीं श्री क्षेत्र गणेशपुरी येथें वास्तव्य करीत असलेले श्री बाबा सर्वसुखाचें आगर होऊन राहिले आहेत. त्यांना अनन्यभावानें शरण जाऊन आपला उद्धार करून घेण्यांतच आपलें हित नाहीं का? शुद्धचैतन्याची अनुभूति एरवीं कशी येणार? हठयोग, राजयोग, ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तियोग, लययोग, मंत्रयोग, यंत्रयोग, तारकयोग किंवा कुंडलिनी योग ह्या या सर्वांच्या मुळाशीं चित्तवृत्तींचा निरोधच अभिप्रेत आहे. मानवी मनाला विश्वात्मक मनाशीं एकरूप करणें हीच या सर्व योगांची फलप्राप्ति होऊन राहिली आहे. सकल इंद्रियांसह चित्त श्री बाबांमध्यें अर्पून श्री बाबांची जो भक्ति करतो तो भक्तच खऱ्या अर्थानें परम योगी आहे अशी माझी श्रद्धा आहे. श्री बाबांच्या मानवी आकृतीच्या द्वारें चैतन्यशक्तीची ओळख पटवून घेऊन जे वाटचाल करून राहिले आहेत किंवा करावयास उद्युक्त झाले आहेत ते खऱ्या अर्थानें श्री नित्यानंदप्राप्तीला पात्र होऊन राहिले आहेत असेंच नाहीं का?

# श्री बाबा आणि चमत्कार

साधुसंतांकडे चमत्कार पहावयास जाणारे भाविक भक्त अधिक आढळतात. संतांकडे जाणाऱ्या भाविकांत बहुसंख्य वर्ग असा असतो कीं जो संताच्या सान्निध्यांत सिद्धीचे चमत्कार पहावयाची मनांत तीव्र इच्छा धरून असतो. संतांच्या कार्यांत अभिप्रेत असलेल्या मानसोन्नती-कडे फारसें लक्ष न पुरवतां केवळ सिद्धीच्या जोरावर माझें भलें कसें होईल याकडे दृष्टि ठेवून संतचरणीं लागणारे भाविक थोडेथोडके नाहींत. श्री गोंदवलेकर महाराज अशा भक्तांची कानउघाडणी करण्यास मागेंपुढें पहात नसत. अशाच एका भक्ताला उद्देशून श्री बाबा म्हणाले होते कीं इथें जादूचे खेळ नाहींत. सहवासांत रहा मग कळेल काय आहे तें. असो. कित्येक वेळां असें दिसून येतें कीं विशिष्ट स्वरूपाची एक मानसिक शक्ति प्राप्त करून तिच्या जोरावर छोट्यामोठ्या प्रमाणांत चमत्कार दाखवून गरीबभोळ्या भाविकांना आपल्या जाळ्यांत पकडून आपला कार्यभाग उरकणारे दांभिक साधू बहुसंख्येनें आढळतात. बसल्या जागीं मूर्ति दिली, हातांत कुंकू येऊन पडलें, फूल ओटींत पडलें अशा किंवा तत्सम चमत्कारांनीं हुरळून जाणारे भक्त जेव्हां आढळतात तेव्हां परमेश्वरा! हे भक्त कुठें वाहात जात आहेत, या कल्पनेनेंच मन विषण्ण होतें. परमेश्वराच्या रूपांत संमिश्र झालेल्या सिद्धाच्या पाठीं ऋद्धिसिद्धि हात जोडून उभ्या असतीलहि व त्या नकळत व निर्हेतुक असे चमत्कार करून दाखवीतहि असतील; परंतु प्रत्येक छोटामोठा चमत्कार पाहिल्या-वर चमत्कार दाखविणारा मनुष्य सत्पुरुष असलाच पाहिजे असा पर्याय काढूं जाणें धाष्टर्याचें आहे असें वाटतें. खरा सत्पुरुष आपल्या केवळ दृष्टिपातानें येणाऱ्या भक्ताच्या मानसिक जीवनांत बदल घडवून

आणतो व सत्य–न्याय–नीतीचीं बीजें त्याच्या मानसिक भूमींत पेरून त्याचें जीवन धर्ममय, यज्ञमय करून टाकतो हा चमत्कार मोठा का केवळ क्षुद्रसिद्धीचे जादूचे प्रयोग दाखवून स्वार्थांधतेनें त्या भक्ताला ज्याचें रूपांतर अश्रद्धेंत होऊं शकेल अशा वातावरणांत नेऊन सोडतो तो चमत्कार मोठा ? श्री मुक्तानंद स्वामी परवां म्हणाले कीं, आकाशांत उडणारा पक्षी व पाण्यांत राहाणारा मासा हा निसर्गाचा केवढा चमत्कार ? या उलट हठयोग्यानें केवळ कष्टसायासें मिळविलेल्या सिद्धीनें बसल्या जागेपासून कांहीं इंचांवर किंवा फुटांवर देह उचललेला पाहून मनुष्य चमत्कार चमत्कार करून त्याला ईशपद द्यावयाला मागेंपुढें पाहात नाहीं. कुंभक क्रिया शिकून जमिनींत पुरून घेणारा हठयोगी पाहून केवळ तेवढ्या क्रियेवरून सामान्य मनुष्य खुशाल त्याच्या भजनीं लागून स्वतःची फसवणूक करून घेतो. निसर्गाचा चमत्कार नित्यांतला असल्यामुळें त्याच्याविषयीं आश्चर्य वाटत नाहीं. या उलट केवळ क्षुद्रसिद्धीच्या बळावर दाखविणारे चमत्कार पाहून सामान्यजन मोहरून जातो. खरा साधु सिद्धीच्या मागें नसतो व अशा साधूचा भक्तसुद्धां चमत्काराच्या मागें नसतो. उलट सिद्धीच खऱ्या साधूच्या मागें असते. श्री बाबांच्या सान्निध्यांत सिद्धीचे चमत्कार पाहिलेले अनेकांच्या पाहाण्यांत आहेत. प्रस्तुत लेखकाच्या पाहाण्यांतसुद्धां आहेत. परंतु श्री बाबा सिद्धीच्या मागें नसून सिद्धि श्री बाबांच्या मागें आहे हें कुणीहि प्रामाणिक साधक कबूल करील. क्षुद्रसिद्धि अनर्थकारक असून खऱ्या साधुत्वाला चिकटून येणारी सिद्धि परमार्थकारक आहे हे पू. मुक्तानंद स्वामींचे बोल सत्यार्थानें श्री बाबांच्या बाबतींत सिद्धच होतात. साधुत्वाला वरणारी सिद्धीच क्षुद्रसिद्धीवर मात करूं शकते.

साधुत्वाला अनुस्युत असणाऱ्या सिद्धीचें महन्मंगल स्तोत्र गात असतांना श्री मुक्तानंदस्वामी एकदां अगदीं सहज म्हणाले कीं मंत्रतंत्रसिद्धी-विशारद श्री दलाईलामा निःसंशय थोर. तथापि त्याची सिद्धि चीनविरुद्ध

उपयोगी पडली नाहीं. उलट सत्य आणि न्याय यावर अधिष्ठित झालेली नेहरूंची सिद्धि खुद्द दलाई लामालाच तारूं शकली. यावरून कुठली सिद्धि श्रेष्ठ हें समजणें सहज शक्य नाहीं का? सत्य, न्याय व नीति यांचीं बीजें भक्तांच्या चित्तांत पेरून भक्ताला सत्प्रवृत्त करणारा श्री गणेशपुरीचा अवधूत क्षुद्र सिद्धीचे खेळ करून न दाखवितां त्याच्या सान्निध्यांत येणाऱ्या भक्ताच्या शरिरांतर्गत मनांत नवे किरण सोडून त्याला माणुसकीचा धर्म शिकवितो हाच श्री बाबा करीत असलेला मोठा व खरा चमत्कार आहे असें मी मानतों. या घडामोडींत छोटेमोठे चमत्कार जरी झाले तरी त्यांची वाच्यता केलेली श्री बाबांना आवडतहि नाहीं व खऱ्या भक्ताला ती मोहांतहि पाडीत नाहीं. चमत्कारामागची ही भूमिका लक्षांत घेऊन श्री बाबांनीं भक्ताच्या प्रेमासाठीं केलेले चमत्कार उद्धृत करणें हितावह वाटतें. साधुसंतांच्या सान्निध्यांत घडणाऱ्या चमत्कारांत एक तऱ्हेची सार्वत्रिक एकरूपता आढळून येते. यामुळेंच हे चमत्कार भ्रममूलक ठरूं शकत नाहींत. आध्यात्मिक वाटचालींतील ते जणुं देखावेच. गाडींतून प्रवास करीत असतांना उतारू खिडकींतून डोकावून बाजूला सरकत जाणारे देखावे पाहात असतो तसेच जणुं हे अनुभव साधक अध्यात्मवाटचालींत अनुभवीत असतो. एखादा देखावा चित्ता-कर्षक वाटला तर उतारू गाडींतून उडी घेत नाहीं कारण त्याला मुक्कामाला पोंचायचें असतें. तद्वत् हे अनुभव अनुभवीत असतांना साधकाचें लक्ष मुक्कामींच लागून राहिलेलें असतें. आत्मविश्वास या अनुभवांनीं दृढ होत असतो आणि श्री गुरुदेवांबद्दल अंतःकरणांत जागृत झालेला भक्तिभाव टिकून राहाण्यास मदत होत असते आणि म्हणूनच हे अनुभव आध्यात्मिक वाटचालींत अखेर साधनरूपच ठरतात.

१ × × × एक विद्यमान व्यापारी—पंधरासोळा वर्षांपूर्वी घडलेली घटना. श्री बाबा तेव्हां जुन्या धर्मशाळेंत राहात असत. उन्हा-ळ्याचे दिवस होते ते. मे महिन्याचा दुसरा पंधरावडा. उन्हाळा फारच

जाणवत होता. वाऱ्याचें जणुं नांवच नाहीं. सर्व लोक जणुं भाजून निघत होते. श्री बाबांचे हे भक्त बाबांना म्हणूं लागले कीं 'बाबा, मला हा उन्हाळा सहन होत नाहीं. मी परत जातों. दोन दिवस झाले मला येऊन. मी उन्हाळ्यानें अगदीं अस्वस्थ होत आहें. झाडाचं पानसुद्धां हालत नाहीं. वाऱ्यानं जणुं रुसवाच धरलेला दिसतो. मी आणखी थोडा वेळ या जागीं राहिलों तर उष्माघातानें मी इथेंच आटपायचों. जातों मी. रजा द्या मला.' 'जाऊं नकोस–इथेंच रहा,' वैकुंठ आश्रमांतील हॉलमध्यें बसल्याजागीं बाबा उद्गारले. त्या भक्ताची अडचण अगदीं खरी होती. परंतु श्री बाबांची लीला और होती. म्हणूनच त्या भक्तानें जाण्याचें नांव काढतांच 'जाऊं नकोस, इथेंच रहा' अशी बाबांची आज्ञा शब्द-रूप घेत होती. होतां होतां त्या आपणाला काढता पाय घेणें अशक्य असल्याचें पाहून त्या भक्ताच्या डोळ्यांत अक्षरशः पाणी उभें राहिलें. भक्ताची कसोटी पाहणारा देव तो देखावा पाहून विरघळला कीं काय न कळे! श्री बाबांनीं मांडी घालून बसल्या स्थितींत दोन्हीहि हात मांडीवरचे उचलून पंख्यानें वारा घालावा त्याप्रमाणें हाताचीं बोटें हालविलीं आणि मोठ्यानें हंसूं लागले. क्षणाचा अवधी गेला असेल नसेल, तोंच समोरील झाडांचीं पानें सळसळा हालूं लागलीं. धूळ आकाशांत उडूं लागली. सोसाट्याचा वारा सुरू झाला. तो भक्त श्री बाबांच्या तोंडाकडेच पाहूं लागला. भगवंताची लीला अगाध आहे असें म्हणून तो नतमस्तक झाला.

२ × × × विद्यमान व्यापारी, भुलेश्वर—हेच व्यापारी कांहीं वर्षां-पूर्वीं डोळ्याच्या दुखण्यानें आजारी झाले. डोळ्याचे तज्ज्ञ डॉक्टर रत्नाकर यांनीं त्यांच्या डोळ्याची स्थिति पाहून 'हा डोळा जवळजवळ गेला' असा अभिप्राय देऊन घरीं पाठविलें. या सद्गृहस्थांच्या एका डोळ्यांतील दृष्टि वयपरत्वें अगोदरच गेली होती. आतां दुसरा डोळाहि निकामी झाल्याचें पाहून त्यांना अतिशय दुःख झालें. त्यांच्या दुःखाला पारावर